म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ६३९

मराठी ग्रंथ संग्रहालय
निबंध ८०२

८०२

गांधी साहित्य पुष्प १ लें

दा. क्र. ६३६५

# अखंड भारत

REFBK-0006365

महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरू,
मौलाना आझाद इत्यादींचे स्फूर्तिदायक विचार

गांधी जयंती १९४३

किंमत १॥ रु.

: प्रकाशक :

महाराष्ट्र ग्रंथ भांडार—मुंबई ४.

# अखंड भारत

## प्रथमावृत्ति १९४३

जोपर्यंत आमच्यावर ब्रिटीश सत्ता चालूं आहे तोपर्यंत हा हिंदु-मुस्लीम प्रश्न कायम राहाणार आहे. हा प्रश्न कायमचा सोडविण्याचे जे जे प्रयत्न होतील त्यांत हा तिसरा पक्ष नेहमींच अडथळे आणणार; म्हणूनच या मोठ्या खेळांत जिना आणि इकबालसारखें लोक जर त्यांच्या हातांतील खेळणीं बनले नाहींत तरच त्यांत आश्चर्य आहे. जो कोणी ही परकीय सत्ता नष्ट करील, तोच हा प्रश्न सोडवूं शकेल.

ज्याला मशिदीच्या बाहेर थोडासुद्धां आवाज झालेला खपत नाहीं, अगर एखाद्या झाडाची फांदी तोडलेली खपत नाहीं; तो कोणत्या प्रकारचा धर्म आहे बरें ? ज्यावेळीं पेशावरमध्यें लष्करी कायदा पुकारलेला होता व वेळोवेळीं मशिदीपुढें बिगूल वाजविला जात होता तेन्हां हे धर्मरक्षक कोठें होते ? विरोध करण्यासाठीं नुसतें तोंड उघडण्याचेही धैर्य त्यांच्या अंगीं नव्हतें. मुसलमानांना त्यावेळीं प्रार्थनेकरितां मशिदींत जाऊं दिलें जात नव्हतें आणि सशस्त्र सैनिक ठरल्यावेळीं आपला बिगुल फुंकीत असत. ब्रिटीशांनीं केल्यावर तें सत्य ! आणि हिंदूंनीं केल्याबरोबर ताबडतोब तो गुन्हा ठरतो ! अशा रितीनें तुम्ही आपला धर्म आचरितां ! धर्माच्या नांवाखालीं लोकांना वेडे आणि रक्तपिपासु बनविणाऱ्या धर्मवेड्यापासून सावध रहा ! मी गीता आणि पवित्र कुराण दोन्हींही वाचलीं आहेत; दोन्हींत धर्म म्हणजे प्रेमच होय.

**—खान अबदुल गफार खान.**

: प्रकाशक :
**शंकर वामन कुलकर्णी,**
महाराष्ट्र ग्रंथ भांडार
मुंबई ४

: मुद्रक :
**शांताराम नारायण सापळे,**
नवयुग प्रिंटिंग प्रेस
दादर, मुंबई १४

# उपोद्घात.

अनेक प्रकारांनीं अतुलनीय अशा विशिष्ट गोष्टी हल्लीं घडून येत आहेत आणि अशा कालांत आपण राहात आहोंत. घोर अंधार मृत्यु आणि आपापसांतील हे आपले पाश आमच्यावर बराच काळपर्यंत टाकीत आहेत. अत्याचार आणि पाशवी सामर्थ्य यांचा सर्व जगावर पगडा असून त्यांचा मानवजातीच्या हलक्या मनोवृत्तीवर तीव्रतर परिणाम झाला आहे. यांचा तात्पुरता विजय झाल्यासारखा दिसत आहे.

हिंदुस्थानही यापासून बचावलेला नाहीं. दुसऱ्या ठिकाणाप्रमाणेंच येथेंही कुत्र्यांच्या छत्र्याप्रमाणें पुढाऱ्यांची प्रचंड वाढ होऊन जे आपल्या समाजाचीच नव्हे, तर अखिल मानवजातीची उन्नति करण्यास आपण तत्पर आहोंत असें सांगतात असें कवडी मोलाचे स्वार्थ परायण लोक पुढें आले आहेत.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या न्याय्य व योग्य मागणीच्या विरुद्ध ब्रिटीशांचें जर कोणतें म्हणणें असेल तर तें हेंच कीं, हिंदुस्थान हें एकराष्ट्र नसल्यामुळें बहुसंख्य लोकांच्या जुलुमापासून अल्पसंख्यांकांचें संरक्षण करण्याकरितां ब्रिटीश सत्ता येथें असणें अवश्य आहे. आणि याला पाठिंबा देणारे पुष्कळसे हिंदी गृहस्थही आहेत.

यांत थोडाही सत्यांश नाहीं; ही गोष्ट फारच सुलभ रितीनें आपल्याला समजेल. हिंदुस्थानांतील एकी ही इतकी उघड वस्तुस्थिति आहे, कीं ती आहे हें सिद्ध करणें; किंवा तिच्या उलट परिस्थिति नाहीं असें सांगणें हें अवास्तव असून चमत्कारिक किंबहुना वेडेपणाचें सुद्धां आहे. परंतु सत्य जरी नष्ट झालें नाहीं तरी झाकलें जाऊं शकतें. जरी सर्व काल नाहीं तरी बराच काल कां होईना अविरत प्रचारानें लोकांची दिशाभूल करणें अगदीं शक्य आहे. असें संकट ज्यावेळीं येण्याचा संभव असतो त्यावेळीं मानव जातीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें अशा प्रकारच्या असत्य मूलक शक्तींचा पूर्ण नाश होईपर्यंत स्वस्थ बसतां कामा नये, हेंच त्यांचें खरें कर्तव्य आहे.

येथें जो मजकूर एकत्र केला आहे, त्यावरून हिंदुस्थानच्या अविभाज्यतेची कल्पना येईल. ज्यांच्या मनांत संशय असतील ते घालविण्यास याची मदत होईल; आणि भौगोलिक, वांशिक, आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक, सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक, तात्वज्ञानिक, धार्मिक या सर्व दृष्टींनीं हिंदुस्थान एकच आहे अशी त्यांची पुन्हां खात्री होईल.

# प्रस्तावना

## हिंदी जीवनक्रम.

हिंदी जीवनक्रमाचें प्रमुख लक्षण म्हणजे हिंदी लोक आयुष्याचा साकल्यानें विचार करतात हेंच होय. हिंदी विचाराच्या दृष्टीनें आयुष्य हें पूर्ण एकत्व आहे; आणि म्हणूनच हिंदी मनुष्य आपल्या ध्येयाकडे संकलित रीतीनें जातो. अनेकामध्यें एकत्व पाहाणें हें प्राचीन हिंदी ऋषींचें एकमेवाद्वितीयं असें ज्ञान आहे. सर्व जीवन एकच असून ज्याप्रमाणें उत्क्रान्त त्याचप्रमाणें अति नीच अशा प्राण्यामध्यें एकच आत्मतत्व भरलेलें आहे असा सार्वत्रिक चिरकालीन व दृढ विश्वास हिंदी लोकांच्या मनांत आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळें आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन, सहिष्णुता, परोपकार बुद्धी आणि मानवी बंधुत्वाची दृढतर भावना व इतर आनुषंगिक गुण हे हिंदी सत्य दर्शनाचीं अपरिहार्य मूलतत्वें आहेत.

## अनेकत्वांत एकत्व.

वरवर पाहाणाऱ्या मनुष्याला किंवा ज्याचा हेतु दुसराच आहे अशा मनुष्याला; हिंदुस्थानांत परस्परविरोधी धर्म आणि धर्मपंथांची खिचडी आहे असें वाटेल. वरवर हिंदुस्थानांत एक प्रकारचा गोंधळ दिसेल; परंतु ज्याप्रमाणें अवयव भिन्न असले तरी शरीरयंत्राच्या एकत्वाला बाध येत नाहीं, त्याचप्रमाणें एकत्वाच्या भावनेलाही बाध येत नाहीं. ज्याप्रमाणें भिन्न भिन्न अवयवामुळें एकच शरीरयंत्र बनतें त्याप्रमाणें निरनिराळ्या पंथामुळें संकलित दृष्टिकोन निर्माण होतो. शरीराचे निरनिराळे अवयव आपापलीं भिन्न भिन्न कामें करून सर्व शरीराचे कार्य शेवटीं साधतात. त्यांचा सर्व शरीराशीं असलेला संबंध तोडून टाकला; तर त्यांना निराळें असें स्वतंत्र अस्तित्वच राहात नाहीं. सत्य एकमेवाद्वितीयं असलें तरी त्याचे मार्ग भिन्न आहेत; त्याचप्रमाणें जे आपापल्या प्रकाशांत याच सत्याचा अनुभव घेतात त्यांच्याशीं हिंदी जीवनक्रमाचा विरोध येत नाहीं. एखाद्या बागेंतील फुलें भिन्नत्वाची कल्पना निर्माण करतील;

परंतु त्या भिन्नतेंतच बागेचें सौंदर्य आणि अभिवृद्धी प्रकट होत असते. अशा तऱ्हेनें अनेकत्वांत एकत्व, भिन्नतेंत अभिवृद्धि हेंच हिंदी जीवन परंपरेचें वैशिष्ठ्य होय.

## ऐतिहासिक तत्व.

अनंत कालापासून बाहेरील लोकांचे थव्यावर थवे हिंदुस्थानांत आले आहेत. भारतानें त्यांचें फक्त स्वागतच केलें असें नसून त्यांना आपले सुपुत्र बनविले. ज्याप्रमाणें समुद्र भिन्न भिन्न नद्या आपल्यांत घेतो त्याप्रमाणें हिंदुस्थाननें भिन्नभिन्न लोक आपल्यांत घेऊन शेवटीं आपलें एकत्व कायमच ठेविलें आहे. मूलभूत ऐक्य आणि सांस्कृतिक परिवर्तन यामध्यें दृढ विश्वास असल्यामुळें हिंदुस्थान परक्याला आत्मसात् करून परिस्थित्यानुरूप वागण्यांत नेहेमींच यशस्वी ठरलेला आहे. नैसर्गिकरित्या हिंदुस्थान हा विश्वबंधुत्वाची प्रयोगशाळाच बनलेला आहे. विद्यमान आणि नव्या आंत येणाऱ्या शक्तींच्या द्वारा हिंदुस्थानची संपन्नता वाढतच गेली आहे. ज्यावेळीं नवीन लोक येतात; तेव्हां थोडासा त्रास सहन करावा लागतो हें निर्विवाद आहे. परंतु ही भूमी आपल्या सूक्ष्म जादूचें जाळें त्यांच्या भोवती पसरत असते; त्यामुळें भांडणांचें रूपांतर सहकार्यांत होऊन अखंडत्वाची सीमा गांठली जाते.[१]

## हिंदु व मुस्लीम धर्मांतील हिंसा आणि अहिंसा

मूलतः सर्व धर्म एकसारखेच असल्यामुळें हिंदु आणि मुसलमान या दोन्हीही धर्मांत ईश्वर एकच आहे ही कल्पना ग्रथित केलेली आहे. परंतु प्रचारकांनीं इस्लाम आणि हिंदुधर्म दोन निरनिराळ्या टोकाला आहेत असें दाखविण्याचा अट्टाहास केला असून हिंदुधर्म अहिंसा मानतो तर इस्लाम धर्माला त्यांचें वावडें आहे असें सांगणें हा त्यांचा आवडता युक्तिवाद आहे. या म्हणण्याचा आपण थोडक्यांत विचार करूं.

" जो तुम्हांला हाकलून देतो त्याला शोधून काढा, जो तुमच्यापासून हिरावून घेतो त्याला द्या; जो तुम्हांला इजा करतो त्याला क्षमा करा; कारण ईश्वराच्या पूर्णत्वाचीं बीजें आपण आपल्या अंतःकरणांत पेरावीं अशी त्याची इच्छा असते. "

हा इस्लामचा एक महत्वाचा आदेश आहे. हा हिंदुधर्मांतील अहिंसेच्या तत्वाहून भिन्न आहे काय ? दोन्हीमध्यें हिंसेचें स्थान एकच आहे. हिंदुधर्माप्रमाणें अशक्त, निराधार, ब्राह्मण, गाय आणि स्त्रिया यांच्या संरक्षणाकरितां हिंसेची सूट आहे. फक्त क्षत्रियच युद्ध करूं शकतात; व युद्धनियमही बऱ्याच विस्तृत प्रमाणावर सांगितले आहेत. हीच गोष्ट इस्लामची आहे. त्यांत पैगंबर महंमदानें युद्धापेक्षां तह करण्यास सांगितलें आहे; आणि जर युद्ध करवयाचेंच असेल तर तें सत्कार्यासाठींच असावें असें त्याचें म्हणणें आहे. कुराणांतही परमेश्वराच्या दृष्टीनें मनुष्याचें जीवित आणि प्राण्याचें जीवित एकाच प्रकारचें सांगितलें आहे.

## आजचा हिंदुस्थान

असा प्रकार असल्यामुळें हिंदु आणि इस्लामी हे एकमेकापासून फारच भिन्न असल्यामुळें हिंदु आणि मुसलमान हे एकमेकापासून शेंकडों मैल दूर आहेत असें सिद्ध करण्याचा कोणताही प्रयत्न फसल्याशिवाय राहाणार नाहीं. परंतु स्वार्थी पक्षांनीं आणि लोकांनीं हिंदुस्थान हा विभागलेला आहे अशी कल्पित कथा शोधून काढली आहे. हिंदुस्थानची मूलभूत एकी ही संशयातीत आहे. हीं जीं पृष्टें याठिकाणीं छापलीं आहेत त्यांचा हेतु हल्लींच्या या भयंकर त्रासाच्या कालांत या सत्याचा अपलाप होऊं नये हा आहे. जर निर्मिता एकच आहे तर निर्मिती कधींतरी भिन्न होईल काय ? अशा रितीच्या दुष्ट प्रचाराला हिंदुस्थान बळी पडेल काय ? हिंदुस्थानांत एकी नाहीं ही गोष्ट खरी आहे काय ? या व अशा सारख्याच दुसऱ्या प्रश्नांचीं उत्तरें सोबतच्या पानांत मिळतील. महात्मा गांधी, मौलाना अझाद, पंडित नेहरू यांच्यासारख्या मोठ्या लोकांच्या लिखाणांतील थोडेसे उतारे येथें देऊन आम्ही समाधान मानलें पाहिजे. ते असे.

( १ ) " कितीही उलट आश्वासनें दिलीं असलीं तरी साम्राज्यशाहीचा नाश अद्यापि झाला नसून ती जोरांत आहे. "

( २ ) " परकीय सरकार हें अन्तर्गत एकीला कधींच प्रोत्साहन देणार नाहीं; कारण बेकीमुळें त्यांची सत्ता कायम टिकत असते."

( ३ ) " दुहीच्या बीजांची लागवड व वर्धन आमच्यांत केले गेलें आणि आतां आम्हांलाच त्याबद्दल टोमणे देण्यांत येतात......परंतु कितीही

संकटें आलीं तरी आम्ही धैर्यानें योग्य मार्गावर पाऊल टाकण्यापासून मागें फिरणार नाहीं."

(४) "इंग्रजांच्या आगमनाबरोबर भांडणें पुन्हां सुरू झाली."

(५) "जोपर्यंत तेथें अडवणूक करण्याकरितां तिसरा पक्ष आहे, तोपर्यंत एकी शक्य नाहीं हा माझा दृढ विश्वास आहे."

(६) "हिंदुस्थानांतील अल्पसंख्याक आणि बहुसंख्याकांचा प्रश्न सर्वस्वी परकीय तिसऱ्या पक्षावर अवलंबून आहे."

(७) "प्रामाणिक जातीयवाद भीतिचें द्योतक आहे; तर खोटा जातीयवाद राजकीय प्रतिगामित्वाचा दर्शक आहे."

(८) "हिंदुस्थान स्वतंत्र नसेल तर एकीही मिळवितां येणार नाहीं."

(९) "११०० वर्षांच्या एकाच इतिहासानें आमच्या खजिन्यांत एकाच ठेव्याची अमूल्य भर घातली आहे.....अशा तऱ्हेनें मुद्रित नसलेलें एकही तत्त्व आमच्या आयुष्यांत नाहीं."

(१०) "परकीयांच्या आगमनानें राष्ट्राचा नाश होतोच असें नाहीं; अशा राष्ट्राच्या ठिकाणीं आत्मसात् करण्याची शक्ति पाहिजे. हिंदुस्थान नेहमींच असा देश होता. जगाच्या कोणत्यांही भागांत एकधर्म आणि एकराष्ट्रीयत्व हे समानार्थक शब्द नाहींत......"जन्मजात वैर हा शब्दप्रयोग आम्हां दोघांच्याही शत्रूनें शोधून काढली आहे."

(११) "हा आत्मसात् करण्याचा आणि परिस्थित्यानुरुप वागण्याचा मार्ग हिंदुस्थाननें अत्यंत यशस्वीरितीनें कसा पाळला हें पाहून खरोखरच आश्चर्य वाटतें."

(१२) "हिंदुस्थानासंबंधीं बोलावयाचें झालेस हिंदुस्थान हें एक राष्ट्र बनविणे शक्य आहे इतकेंच नव्हे, तर कितीही भिन्नता किंवा विरोध असले तरी सुद्धां मूलतः तें तसें एक राष्ट्र आहे असें मी खात्रीपूर्वक सांगू शकतो...असंख्य युगानुयुगामध्यें तें राष्ट्र एकच आहे; हे हिंदुस्थानासंबंधीं एक मोठें आणि मौलिक सत्य आहे."

संकटें आलीं तरी आम्ही धैर्यानें योग्य मार्गावर पाऊल टाकण्यापासून मार्गे फिरणार नाहीं."

(४) "इंग्रजांच्या आगमनाबरोबर भांडणें पुन्हां सुरू झाली."

(५) "जोपर्यंत तेथें अडवणूक करण्याकरितां तिसरा पक्ष आहे, तोपर्यंत एकी शक्य नाहीं हा माझा दृढ विश्वास आहे."

(६) "हिंदुस्थानांतील अल्पसंख्याक आणि बहुसंख्याकांचा प्रश्न सर्वस्वी परकीय तिसऱ्या पक्षावर अवलंबून आहे."

(७) "प्रामाणिक जातीयवाद भीतिचें द्योतक आहे; तर खोटा जातीयवाद राजकीय प्रतिगामित्वाचा दर्शक आहे."

(८) "हिंदुस्थान स्वतंत्र नसेल तर एकीही मिळवितां येणार नाहीं."

(९) "११०० वर्षांच्या एकाच इतिहासानें आमच्या खजिन्यांत एकाच ठेव्याची अमूल्य भर घातली आहे.....अशा तऱ्हेनें मुद्रित नसलेलें एकही तत्त्व आमच्या आयुष्यांत नाहीं."

(१०) "परकीयांच्या आगमनानें राष्ट्राचा नाश होतोच असें नाहीं; अशा राष्ट्राच्या ठिकाणीं आत्मसात् करण्याची शक्ति पाहिजे. हिंदुस्थान नेहमींच असा देश होता. जगाच्या कोणत्याही भागांत एकधर्म आणि एकराष्ट्रीयत्व हे समानार्थक शब्द नाहींत......"जन्मजात वैर हा शब्दप्रयोग आम्हां दोघांच्याही शत्रूनें शोधून काढली आहे."

(११) "हा आत्मसात् करण्याचा आणि परिस्थित्यानुरुप वागण्याचा मार्ग हिंदुस्थाननें अत्यंत यशस्वीरितीनें कसा पाळला हें पाहून खरोखरच आश्चर्य वाटतें."

(१२) "हिंदुस्थानासंबंधीं बोलावयाचें झालेस हिंदुस्थान हें एक राष्ट्र बनविणे शक्य आहे इतकेंच नव्हे, तर कितीही भिन्नता किंवा विरोध असले तरी सुद्धां मूलतः तें तसें एक राष्ट्र आहे असें मी खात्रीपूर्वक सांगूं शकतो...असंख्य युगानुयुगामध्यें तें राष्ट्र एकच आहे; हे हिंदुस्थानासंबंधीं एक मोठें आणि मौलिक सत्य आहे."

( १३ ) "आम्हांला आवडो अगर न आवडो; आम्ही संघटित आणि अविभाज्य असें हिंदी राष्ट्र बनलों आहोंत. कोणत्याही धर्मवेडानें किंवा अन्य कृत्रिम प्रयत्नांनी ती एकी भंग पावणार नाहीं. आम्ही इतिहास आणि वस्तुस्थिति यांना अनुसरून आमचें भवितव्य बनविण्याच्या कामीं प्रयत्न केला पाहिजे."

( १४ ) "आमची इच्छा नसतांनाही ईश्वर ते आमच्यावर लादेल."

( १५ ) "सर्वांत अशक्त अशा अल्पसंख्याकांना सहन करावें लागेल असें स्वराज्य मला नको."

( १६ ) "अशी कोणतीही विभागणी दोन्ही पक्षांना विघातक आहे इतकेंच नव्हे, तर ती सर्व राष्ट्रालाही विघातक आहे.

( १७ ) "आतां एक धर्माची जरूरी नाहीं. परंतु भिन्न धर्मांच्या अनुयायांमध्यें परस्पराबद्दल आदर आणि सहिष्णुता पाहिजे. आम्हाला समान रुपत्वाला पोहोंचावयाचें नसून अनेकत्वांत एकत्व साधावयाचें आहे."

क्र. नं. ६३६५
शाखा (स्थळ प्रत)

# अखंड भारत

## १ महात्मा गांधी

### हिंदु आणि मुसलमान

**वाचक :** तुम्ही आम्हांला मुसलमान पूर्वकालीन हिंदुस्थानचें वर्णन सांगितलें आहे; परंतु आतां मुसलमान, पार्शी आणि खिस्ती लोक आहेत. मग या सर्वांचें एकराष्ट्र कसें होईल ? हिंदु आणि मुसलमान जुने शत्रु आहेत. आमचे भाषा प्रकारच हें सिद्ध करीत आहेत. मुसलमान पूजेकरितां पश्चिमेकडे वळतात तर हिंदु पूर्वेकडे. मुसलमान हिंदूंना मूर्तिपूजक मानतात. हिंदु गायीची पूजा करतात तर मुसलमान तिला मारतात. हिंदु अहिंसेला मानतात तर मुसलमान मानीत नाहींत. अशा रीतीनें पदोपदीं भेद दिसतात. मग हिंदुस्थान हें एकराष्ट्र कसें होईल ?

**संपादक :** निरनिराळ्या धर्मांचे लोक या देशांत राहातात म्हणून हिंदुस्थान हें एक राष्ट्र होणार नाहीं असें नाही. परकीय लोकांच्या आगमनामुळें राष्ट्राचा नाश होतोच असें नाही; तर ते त्यांत मिसळून जातात. जेव्हां देशांत अशी परिस्थिति निर्माण होते तेव्हांच देश एकराष्ट्र बनतो. त्या देशाच्या ठिकाणीं आत्मसात् करण्याची वृत्ति पाहिजे. हिंदुस्थान असा देश नेहेमींच आहे. खरोखर हिंदुस्थानांत जितक्या व्यक्ति आहेत तितके धर्म आहेत; परंतु ज्यांना राष्ट्रीय भावनेची जागृति आहे ते दुसऱ्याच्या धर्मांत ढवळाढवळ

करीत नाहींत. जर ते अशी ढवळाढवळ करतील तर ते एकराष्ट्र होण्याला लायख समजले जाणार नाहींत. जर हिंदूंना फक्त हिंदूच हिंदुस्थानांत राहावेत असें वाटत असेल तर ते कल्पनासाम्राज्यांत वावरतात असें म्हटलें पाहिजे. हिंदु, मुसलमान, पार्शी आणि ख्रिस्ती यांनीं या देशाला मायभूमि म्हणून मानलें आहे म्हणून ते देशबांधव आहेत या सर्वांना आपल्या स्वतःच्या हितासाठीं ऐक्यानें वागलें पाहिजे. जगाच्या कोणत्याही भागांत एकराष्ट्रीयत्व व एक धर्म हे पर्यायवाचक शब्द नाहींत; हिंदुस्थानांतही हे समानार्थक शब्द नाहींत.

**वाचक :** मग हिंदु-मुसलमानामधील जन्मजात वैराबद्दल तुमचें काय म्हणणें आहे ?

**संपादक :** आमच्या शत्रूनें ही शब्दयोजना शोधून काढली आहे. ज्यावेळीं हिंदु आणि मुसलमान एकमेकांबरोबर युद्ध करीत होते तेव्हां ते या शब्दांत बोलत होते. परंतु बऱ्याच कालापासून त्यांनीं युद्ध थांबविलें आहे. मग जन्मजात वैर कसें असणार बरें ? हेंही पण आपण लक्ष्यांत घ्या कीं ब्रिटीश राज्यानंतरच त्यांनीं युद्ध थांबविलें आहे असें नाहीं. मुसलमानी अमदानींत हिंदूंची भरभराट होती; त्याचप्रमाणें हिंदु अमलाखालीं मुसलमानांची होती. प्रत्येक पक्षाला माहीत होतें कीं परस्परामधील युद्धें आत्मघातक असून तरवारीच्या जोरावर कोणीही धर्मत्याग करणार नाहीं. म्हणून दोनीही पक्षांनीं शांततेनें राहाणेचें निश्चित केलें; आणि इंग्रज लोक आल्याबरोबर भांडणांना पुन्हां सुरवात झाली.

तुम्ही सांगितलेला शब्दप्रयोग ज्यावेळीं दोघांचीं युद्धें होत होतीं तेव्हांच प्रचारांत आला; आतां त्यांचा उपयोग करणें घातक आहे. हिंदु आणि मुसलमान यांचे पूर्वज एकच आहेत व त्यांच्या अंगांतून एकच रक्त वाहात आहे हें आपण ध्यानांत घ्यावयास नको काय ? लोक फक्त धर्म बदलला कीं शत्रू होतात काय ? मुसलमानांचा अल्ला हिंदूच्या परमेश्वराहून भिन्न आहे काय ? धर्म हे एकाच बिंदूकडे जाणारे भिन्न मार्ग आहेत ? एकाच ध्येयाकडे जात असतांना भिन्न मार्ग आम्ही घेतले म्हणून काय बिघडतें ? त्यांत भांडणाचें काय कारण ?

शैव आणि वैष्णव यांच्यामध्यें यापेक्षांही भयंकर असे शब्दप्रयोग आहेत म्हणून त्यांना कांहीं कोणी एकाच राष्ट्राचे ते नाहींत असे म्हणत नाहीं. वैदिक धर्म हा जैन धर्मापासून भिन्न आहे असें म्हणतात; परंतु त्या धर्माचे अनुयायी कांहीं भिन्न राष्ट्राचे लोक ठरत नाहींत. वस्तुस्थिति अशी आहे कीं आम्ही गुलामगिरींत असल्यामुळें भांडतों व आमचीं भांडणें तिऱ्हाईतानें तोडावीत असें म्हणतों. ज्याप्रमाणें मुसलमानांत मूर्तिभंजक लोक आहेत, त्याचप्रमाणें हिंदूंतही आहेत. जसजसा सत्यज्ञानाचा प्रसार होत जाईल तसतसें आम्हांला हें कळून येईल कीं ज्यांचा धर्म आम्हीं पाळत नाहींत त्यांच्याशीं आम्हीं भांडलेंच पाहिजे असें नाहीं.

**वाचक :** आतां गोरक्षणाबद्दल तुमचें मत काय तें जाणण्याची मला इच्छा आहे.

**संपादक :** व्यक्तिशः मी गाईला पूज्य मानतो. म्हणजे मी तिच्याकडे प्रेमळ आदरानें पाहातो. गाय ही हिंदुस्थानची रक्षयित्री आहे, कारण हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश असल्यामुळें गायीवर अवलंबून आहे. गाय ही शेंकडो रीतींनीं उपयोगी जनावर आहे. आमच्या मुसलमान बंधूंनासुद्धां हें पटेल.

परंतु गायीबद्दल जसा मला आदर आहे, तसाच माझ्या बांधवांबद्दलही आहे. मनुष्य–मग तो मुसलमान असो किंवा हिंदु असो–हा गायीइतकाच उपयुक्त आहे. मग गायीला वाचविण्याकरितां मुसलमानाबरोबर भांडावें किंवा त्याला ठार मारावें काय ? तसें करण्यांत मी त्या मुसलमानाचा तसाच गायीचाही शत्रू बनेन. गायीच्या रक्षणाचा एकच मार्ग मला माहीत आहे आणि तो म्हणजे माझ्या मुसलमान बंधूकडे जाऊन देशाकरितां गायीचें संरक्षण करण्याचे कामीं त्यानें मला मदत करावी अशी त्याला आग्रहाची विनंति करणें हाच होय. जर तो माझें ऐकणार नाहीं तर ती गोष्ट माझ्या शक्तीच्या बाहेरची आहे म्हणून गायीचा नाद सोडून देणें हेंच करीन. जर मुसलमानांस गायीबद्दल फारच दया असेल तर मी माझें जीवित तिच्या रक्षणासाठीं खर्ची घालीन, परंतु माझ्या बांधवाचें जीवित हरण करणार नाहीं. हा आमच्या धर्माचा दंडक आहे असें मी समजतों.

ज्यावेळीं माणसें दुराग्रही बनतात तेव्हां कठीण परिस्थिती निर्माण होते.

जर मी एका बाजूला ओढूं लागलों तर माझा मुसलमान बंधू दुसरीकडे ओढूं लागेल. जर मी स्वतःला श्रेष्ठ मानूं लागलों तर तोही तसेंच समजेल. मी जर त्याला मृदुपणानें नमस्कार केला तर तोही तसेंच करील; आणि तो तसें करणार नाहीं तरीसुद्धां मी त्याच्यापुढें नम्र होण्यांत कांहीं अन्याय केला असें होणार नाहीं. ज्यावेळीं हिंदु आग्रहानें सांगूं लागले त्यावेळीं गोवध वाढला. माझ्या मतानें गोरक्षण संस्था याच गोहत्त्या करणाऱ्या संस्था आहेत असें मानावें लागेल. अशा संस्थांची आम्हांला गरज पडावी हें आम्हाला लज्जास्पद आहे. ज्यावेळीं आम्ही गोरक्षणाचा खरा मार्ग विसरलों तेव्हांच आम्हांला अशा संस्थांची जरूरी पडली.

माझा एखादा सख्खा भाऊ ज्यावेळीं गायीला मारूं लागेल तेव्हां मी काय करावें ? मी त्याला ठार करावें कीं त्याच्या पायाशीं पडून प्रार्थना करावी ? जर दुसरा मार्ग पत्करावा हें तुम्हांला मान्य असेल तर मुसलमान बंधूच्या बाबतींतही हाच मार्ग पत्करला पाहिजे.

जेव्हां हिंदु क्रूरपणानें गायीला वाईट रीतीनें वागवितात तेव्हां गायीच्या नाशापासून त्यांचें रक्षण कोण करतो ? ज्यावेळीं बैलांना निष्ठुरपणें हिंदु काठ्यांनीं मारतात तेव्हां त्यांना समजुतीच्या गोष्टी कोण सांगतो ? परंतु यामुळें कांहीं आमचें एकराष्ट्रीयत्व नष्ट झालें नाहीं.

शेवटीं जर हिंदूंचा अहिंसेवर विश्वास असेल आणि मुसलमानांचा नसेल तर हिंदूंनीं काय करावें ? अहिंसा धर्माच्या अनुयायानें आपल्याच बांधवाला मारावें असें कोठेंही लिहिलेलें नाहीं. त्याचा मार्ग सरळ आहे. एका प्राण्याला वाचविण्याकरतां त्यानें दुसरा प्राणी मारूं नये. त्यानें मन वळविण्याचा प्रयत्न करावा हेंच त्याचें अंतिम कर्तव्य होय.

परंतु प्रत्येक हिंदूचा अहिंसेवर विश्वास आहे काय ? प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं जाऊन पाहिल्यास आपणांस असें आढळून येईल कीं कोणीही मनुष्य असा धर्म खरोखर पाळीत नाहीं. कारण आम्ही जीवनाश करीत असतों. जीवहत्येच्या पातकापासून मुक्त होण्याची आम्ही इच्छा करतों म्हणूनच आम्ही तो धर्म पाळतों असें म्हणतो. सर्वसाधारणपणें पाहातां, आम्हांला असें आढळून येतें कीं पुष्कळच हिंदु मांसाशन करीत असल्यामुळें ते अहिंसावादी नाहींत.

यासाठीं हिंदु अहिंसावादी आहेत व मुसलमान नाहींत म्हणून ते चांगुलपणानें एकत्र राहूं शकणार नाहींत असें म्हणणें असमंजसपणाचें होईल.

स्वार्थी आणि खोट्या धर्मशिक्षकांनीं हे विचार आमच्या मनांत भरविले आहेत. इंग्लीश लोकांनीं त्याच्यावर शेवटचा हात फिरविला. त्यांना इतिहास लिहिण्याची संवय आहे. व ते सर्व राष्ट्रांच्या पद्धतींचा व रूढींचा अभ्यास करण्याचे ढोंग करीत असतात. ईश्वरानें आम्हांला मर्यादित मानसिक शक्ति दिल्या आहेत; परंतु ते ईश्वराचें कर्तृत्व स्वतःकडे घेतात व नवीन नवीन प्रयोग करीत असतात. ते आपल्या शोधांचीं स्तुतिस्तोत्रें गातात. आणि आम्हांला गुंगवून ते सर्व शोध खरे आहेत असे मानावयास लावतात. आम्ही अज्ञानी असल्यामुळें त्यांच्यापुढें नम्र होतो.

ज्यांची गैरसमजूत करून घेण्याची इच्छा नसेल त्यांनीं कुराण वाचावें म्हणजे त्यांत त्यांना हिंदूंना स्वीकरणीय असें शेंकडो उतारे सांपडतील; आणि भगवद्गीतेंत अनाक्षेपार्ह असे बरेचसे उतारे मुसलमानांना सांपडतील. मला न समजतील अगर आवडतील असे उतारे कुराणांत आहेत म्हणून मी मुसलमानांचा द्वेष करावा काय? भांडण्याकरितां दोघे पाहिजे असतात. मला मुसलमानाबरोबर भांडावयाचें नसेल तर मुसलमान माझ्याबरोबर भांडण उकरून काढूं शकणार नाहीं; त्याचप्रमाणें जर मुसलमान माझ्याबरोबर भांडणार नाहीं तर मीही भांडणाचे कामीं निःशक्त होऊन जाईन. हवेवर हल्ला करणारा हात निखळून पडेल. प्रत्येकजण जर आपल्या धर्माचें मूलभूत तत्त्व समजण्याचा प्रयत्न करून त्याप्रमाणें वागूं लागेल व खोट्या धर्मशिक्षकाकडून धर्माचे धडे घेणार नाहीं, तर भांडणाला थोडेंसेंसुद्धां कारण राहाणार नाहीं.

**वाचक** : परंतु इंग्रज लोक या दोघांना एक होण्याला कधींतरी संधि देतील काय?

**संपादक** : हा प्रश्न तुमच्या भित्रेपणानेंच निर्माण होतो. यामुळें आमचा उथळपणा मात्र व्यक्त होतो. जर दोन भाऊ शांततेनें राहूं इच्छीत असतील तर तिऱ्हाईत व्यक्ति त्यांना विभक्त करूं शकेल काय? जर ते दुष्ट सल्ला ऐकूं लागले तर त्यांना मूर्ख म्हणणेंच भाग होईल. जर इंग्रज लोक आम्हां दोघांमध्यें बिघाड आणत असतील तर त्यांना दोष देण्याऐवजीं आम्ही

हिंदु-मुसलमानांच्या मूर्खपणालाच दोष दिला पाहिजे. जर मातीचें मडकें एका धोंड्याच्या तडाख्यानें फुटलें नाहीं तर दुसऱ्यानें फुटेल. हें भांडें शाबूत राखण्याचा खरा मार्ग म्हणजे तें संकटापासून दूर ठेवणें हा नसून ते कोणत्याही दगडानें फुटणार नाहीं इतकें चांगलें भाजणें हाच होय. तर मग आम्ही आमचीं अन्तःकरणें चांगल्या भाजलेल्या मातीचीं बनविलीं पाहिजेत. मग आम्ही सर्व संकटांना तोंड देण्यास समर्थ होऊं. हें हिंदूंना सहज साध्य आहे. ते बहुसंख्य आहेत, आपण अधिक शिक्षित आहोंत असे ते ढोंग करतात, म्हणूनच मुसलमानांशीं असलेल्या सलोख्याच्या संबंधाविरुद्ध होणाऱ्या हल्ल्यापासून स्वतःचें संरक्षण करण्यास ते अधिक समर्थ आहेत.

दोन जमातींमध्यें परस्पराविषयीं अविश्वास आहे म्हणूनच मुसलमान लॉर्ड मोर्लेकडून अधिक सवलती मागतात. हिंदूंनीं त्याला विरोध कां करावा ? जर हिंदु यापासून परावृत्त होतील तर इंग्रजांचें लक्ष्य तिकडे वेधेल, मुसलमानांच्या मनांत हळुंहळुं हिंदूंबद्दल विश्वास निर्माण होईल आणि त्याचाच परिणाम बंधुत्वामध्यें होईल. आम्हांला आमचीं भांडणें इंग्रजांकडे नेण्याची लाज वाटली पाहिजे. अशा परावृत्त होण्यामुळें हिंदूंचें कांहींच नुकसान नाहीं असेंच प्रत्येकाला आढळून येईल. ज्या मनुष्यानें आपल्याबद्दल दुसऱ्याच्या मनांत विश्वास उत्पन्न केला आहे त्याचें या जगांत कांहींच नुकसान झालेलें नाहीं.

हिंदु-मुसलमान कधींच भांडणार नाहींत असें मला म्हणावयाचें नाहीं. एकत्र राहाणारे दोन भाऊ नेहमींच भांडतात. आमचीं डोकींही कधीं कधीं फुटतील. असें होणें अपरिहार्य नाहीं, परंतु सर्वच माणसें न्यायी असत नाहींत. माणसें क्रोधावेशांत पुष्कळसा मूर्खपणा करतात. परंतु ते आम्ही विसरून जावयास पाहिजे. पण ज्यावेळीं आम्ही भांडतो, तेव्हां वकील देऊन इंग्रजी किंवा दुसऱ्या न्यायालयांत जाण्याची आमची खात्रीनें इच्छा असत नाहीं. दोन माणसें भांडतील तर त्या दोघांची किंवा एकाचेंच डोकें फुटेल. तिऱ्हाईताला त्यांत न्याय कसा देतां येईल ? जे भांडतात तेच जखमी होतील.

'हिंद स्वराज्य'

## हिंदु-मुस्लीम ऐक्यासंबंधीं कांहीं विचार

माझ्या अन्तःकरणांतील कांहीं तरी मला असें सांगत आहे कीं हिंदु-मुस्लीम ऐक्य आपल्या अपेक्षेपेक्षांही अधिक लौकर साध्य होईल. परमेश्वर तें आमच्यावरं आमच्या इच्छेविरुद्ध सुद्धां लादील.

यं. इं. जाने. २७, १९२७

भांडणारे हिंदु-मुसलमान हे केव्हांतरी मित्र झालेच पाहिजेत हा माझा विश्वास पूर्वीइतकाच दृढ आहे. परंतु तें कसें व केव्हां होईल हें कोणीही सांगूं शकणार नाहीं. भवितव्य हें नेहेमींच परमेश्वराच्या हातीं आहे, परंतु जिच्यायोगें आम्ही संशयसागराच्या पार होऊं अशी श्रद्धेची नांव आम्हाला दिलेली आहे.

यं. इं. ऑक्टो. ११, १९२८

त्या एकीबद्दलचा माझा विश्वास नेहेमींप्रमाणेंच तेजस्वी आहे. अगदीं सर्वांत अल्पसंख्याकांना त्रास होईल अशा रीतीचें स्वातंत्र्य मला नको. मग ते बलवान् मुसलमान असोत किंवा त्याच प्रकारचे शीख असोत. लाहोर कॉंग्रेसच्या एकीवरच्या ठरावांत त्या बाबतींतील पूर्वीचे सर्व प्रयत्न एकत्रित केले आहेत. जातीय पायावर उभारलेले सर्व मार्ग कॉंग्रेस बाजूला सारीत आहे. परंतु जर अशा तऱ्हेच्या मार्गांचा विचार करण्याची पाळी आलीच तर ज्याच्यायोगें फक्त न्यायच नव्हे तर संबंध असणाऱ्या सर्व पक्षांना समाधान होईल अशाचाच विचार ती करील. म्हणून आपला शब्द पाळण्याकरितां, ज्याच्या योगें सर्व संबंधी पक्षोपक्षांना जातीय हक्कांच्या बाबतींत समाधान होणार नाहीं असा कोणताही मार्ग कॉंग्रेसला मान्य होणार नाहीं.

यं. इं. फेब्रु. २०,१९३०.

आपण हिंदु आणि मुसलमान आहोंत हें विसरून जाऊन फक्त हिंदी आहोंत हेंच लक्षांत ठेवूं या. आणि कानपूरची लाज तीच हिंदुस्थानची लाज होय.

यं. इं. एप्रिल २,१९३१.

आमच्यांत भेद नेहमीं असणारच. परंतु ते धार्मिक अगर अन्य कोणत्याही प्रकारचे असले तरी लवादामार्फत ते मिटविण्यास आम्ही शिकलें

पाहिजे. राज्यकर्त्यांपुढें आपण एकमतानें ठाकलें पाहिजे आणि जगाच्या निदर्शनाला असें आणून दिलें पाहिजे कीं, स्वराज्य मिळाल्यास आम्ही आमच्या चालीरीती आमच्या ताब्यांत ठेवूं शकतो.

यं. इं. जून १६,१९२७.

धर्म हा अत्यंत हलक्या दर्जाच्या अधिभौतिक पातळीवर आणला जात आहे; आणि कोट्यावधि लोकांच्या आवडत्या भावना पददलित करून धर्माचा त्यासाठीं उपयोग केला जात आहे हें पाहणें अत्यंत हृदयद्रावक आहे.

ह. ऑ. ८,१९३६.

खरी हिन्दुमुसलमान एकी व्हायची असेल तर त्यासाठीं मुसलमानांनीं जरूर म्हणून नव्हे किंवा धोरण म्हणून नव्हे तर आपल्या धर्माचा भाग म्हणून सहिष्णुता आणली पाहिजे आणि दुसऱ्याचा धर्म हा देखील तितकाच सत्य आहे असा त्यांचा विश्वास असला पाहिजे. त्याचप्रमाणें हिंदूंनींही आपल्या धर्माचा व धार्मिक कल्पनांचा भाग म्हणून दुसऱ्याच्या धर्माबद्दल सहिष्णुता दाखविली पाहिजे, मग हिंदूंना आपल्या धर्मकल्पनांशीं दुसऱ्या धर्मकल्पना कितीही विसंगत अगर विरुद्ध असोत. तेव्हां हिंदूंनीं प्रतिकाराची कल्पना सोडून दिली पाहिजे. ( १५८ )

यंग इंडिया २८ ऑ. १९२४.

आतां या कालाला एका धर्माची जरूरी नाहीं तर भिन्न भिन्न धर्मानुयायामध्यें सहिष्णुता व परस्पर आदर यांची जरूरी आहे. आम्हांला मृत परिस्थितीला पोचावयाचें नसून भिन्नावस्थेंत ऐक्य संपादावयाचें आहे. परंपरा, हवा, इतर बाबी व वंशाचे परिणाम नष्ट करणें ही गोष्ट अशक्यच आहे असें नव्हे तर तो धार्मिक खून होय. धर्माचा आत्मा एकच आहे, पण तो निरनिराळ्या प्रकारच्या स्वरूपांनीं बद्ध केला आहे. आणि हीं स्वरूपें कालाच्या अंतापर्यंत टिकणारीं आहेत. शहाणी माणसें वरील आवरणाकडे दुर्लक्ष्य करून अन्तर्भागांतील त्याच एका आत्म्याकडे लक्ष्य देतील.

यं. इं. २५ सें. १९२४

हिंदु, ख्रिश्चन किंवा इस्लाम धर्म स्वीकारल्यामुळेंच तो चांगला होईल

किंवा मुक्त होईल हे विचारार्हही नाहीं. शीलाची शुद्धता आणि मुक्ति हीं अन्तःकरणाच्या शुद्धतेवर अवलंबून आहेत.

यं. इं. मा. १७,१९२७.

**सुदैवानें हिंदु-मुस्लीम ऐक्य हें शेवटीं धार्मिक किंवा राजकीय पुढाऱ्यावर अवलंबून नाहीं. तें दोनीही जमातींच्या लोकांच्या सुसंस्कृत स्वार्थावर अवलंबून आहे. त्यांना नेहमींच आडमार्गाला नेणें शक्य नाहीं.**

यंग इंडिया जाने. २९,१९२५.

परस्परांचें सहन करून जगा आणि दुसऱ्याला जगवा हा आयुष्याचा कायदा आहे. हा धर्म मी कुराण, बायबल, झेंद अवेस्ता आणि गीता यांपासून शिकलों आहें. ह. ऑ. २८, १९३९

माझा हिंदुधर्म हा पंथभेदाचा नाहीं. त्यामध्यें इस्लाम, ख्रिश्चन, बुद्ध किंवा झोरोष्ट्र या धर्मांपैकीं उत्तमोत्तम जीं तत्वें आहेत त्यांचा समावेश होतो. मी बाकीच्या सर्व प्रश्नाप्रमाणेंच राजकारणाकडेही धार्मिक दृष्टीनेंच पाहातों आहें. सत्य हाच माझा धर्म आहे आणि तो साध्य होण्याचा अहिंसा हाच एक मार्ग आहे.

हरि. एप्रि. ३०, १९३८

दोन जमातीला जोडणारें उत्तम सिमेंट होण्यासाठीं माझी सर्व धडपड चालू आहे. जरूर तर माझ्या रक्तानेंही दोघांना एकत्र करण्याची माझी मनीषा आहे. परंतु असें करण्यापूर्वी मी मुसलमानांना हिंदूंइतकेंच त्यांच्यावर प्रेम करतों असें दाखवून दिलें पाहिजे. माझा धर्म मला सर्वांवर सारखें प्रेम करण्यास शिकवितो. मला असें करण्यास परमेश्वर मदत करो. मला तें समान व निःस्वार्थी प्रेम मिळविण्याच्या बाबतींत समर्थ करण्यांत जीं कांहीं साधनें आहेत, त्यापैकींच माझा उपवास हें एक साधन आहे. मी स्वतःला मुसलमानांचा मित्र समजतों, ते माझे रक्ताचे बंधु आहेत. त्यांचीं दुष्कृत्यें तीं माझींही आहेत. मी त्यांच्या सुखदुःखाचा भागीदार आहें. मुसलमानानें केलेल्या दुष्कृत्यानें मला हिंदुंच्या दुष्कृत्याइतकेंच दुःख होतें.

यं. इं. डिसें. ३०,१९२६.

मला हिंदुइतकेंच मुसलमानाबद्दल प्रेम आहे. हिंदुइतकेंच मुसलमानाबद्दल माझ्या अन्तःकरणाला वाटतें आहे. एक भाग हिंदूंकरितां, दुसरा मुसलमानांकरितां अशा रीतीनें माझ्या अन्तःकरणांत कांहीं भाग नाहींत, हें तुम्हांला माझें अन्तःकरण फाडून पाहिल्यास दिसून येईल. आणि म्हणूनच मुसलमान हिंदूवर हल्ला करूं लागला किंवा हिंदु मुसलमानावर हल्ला करूं लागला तर मी स्वतःला जबाबदार धरतों.

यं. इं. ऑ. १२,१९३१

मला अगर माझ्या कार्याला त्यांच्यापैकीं एकानें अगर अनेकांनीं कांहींही केलें तरी मी मुसलमानांचा शत्रु नाहीं. इंग्रजांच्या प्रतिनिधींनीं जे कांहीं अन्यायाचे डोंगर रचले आहेत त्यांत आणखी भर टाकली तरी मी त्याचप्रमाणें इंग्रजांचा शत्रुही होऊं शकणार नाहीं. ज्या जातीचा मी आहे तिच्या अपूर्णतेचें मला इतकें भान आहे कीं त्यापैकीं एखाद्या व्यक्तिवर राग करणें मला शक्यच नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं अन्याय आहेत त्या त्या ठिकाणीं अन्यायाशीं झगडणें हा माझा मार्ग आहे. परंतु ज्याप्रमाणें मी नेहमीं करीत असलेल्या चुकीबद्दल मला दुःख दिलेलें मला आवडणार नाहीं त्याचप्रमाणें दुसऱ्यालाही त्याच्या चुकीबद्दल इजा करणें मला पसंत पडणार नाहीं.

यं. इं. मार्च १२, १९३०

जातीय प्रतिनिधित्वासंबंधीं माझीं मतें काय आहेत हें लोकांना जाणण्याची इच्छा होईल. माझा या गोष्टीला अन्तःकरणापासून पूर्णपणें विरोध आहे; परंतु दोनीही बाजूंना सन्मानार्ह रीतीनें शांतता प्रस्थापित होत असेल तर मी कशालाही सहमत होऊं शकेन.

यं. इं. फेब्रु. ५,१९२५.

**राष्ट्रीय हिताशिवाय दुसऱ्या सर्व गोष्टींचा त्याग करणें हीच कॉंग्रेसची अविच्छिन्न परंपरा आहे.** हिंदु म्हणून हिंदूंचा प्रतिनिधि ती कधींच नव्हतो. तें कार्य हिंदु महासभेनें अंगीकृत केलें आहे. त्याचप्रमाणें मुसलमानांचें प्रतिनिधित्व मुस्लीम लीगनें घेतलें आहे.

हरि. नोव्हें. ४,१९३९.

जातीय पायावर उभारलेल्या दृढ अशा विभागणीवर काँग्रेसचा विश्वास नाहीं; मग तें बरोबर असो अगर चूक असो. धर्म हा व्यक्तिगत प्रश्न असून तो मनुष्य व ईश्वर यामधील संबंध आहे असें मानलें, तर त्या दोहोंमध्यें असें कांहीं महत्त्वाचें सामान्य प्रश्न आहेत कीं त्यामुळें समान जीवन आणि समान कृति घडतील, धर्म हे लोकांना एकमेकापासून वेगळे करण्यासाठीं नसून जोडण्यासाठीं आहेत. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं ते इतके भिन्न झाले आहेत कीं ते परस्परामधील भांडणाचें आणि लचके तोडण्याचें कारण झाले आहेत. हरि. जून ८,१९४०

न्याय्य मागणी मधूनच एकीचा मार्ग असतो. तो नेहेमीं नेहेमीं वृद्धिंगत होत जाणाऱ्या,(मग त्या न्याय्य किंवा अन्याय्य असल्या तरी) मागण्यांतून असत नाहीं. विभक्तपणाच्या मागणीमुळें एकीचे सर्व प्रयत्न तात्पुरते तरी नष्ट होतात. जातीय सलोख्याचा आधार ब्रिटिशांनीं आपल्या परीनें न्याय करण्यावर नाहीं असें माझें मत आहे. ज्यावेळेस त्यांना हिंदुस्थानचा आपली घटना ठरविण्याचा हक्क मान्य करावयाचा असेल, त्यावेळीं सूर्यापुढें ज्याप्रमाणें बर्फ नाहींसे होतें त्याप्रमाणें त्यांच्या मार्गांतील अडचणी म्हणून ज्या दाखविल्या जातात त्या आपोआप नष्ट होतील. हरि. मे १८; १९४०.

जोपर्यंत मध्यें तिसरा पक्ष अडवणूक करण्यासाठीं आहे तोपर्यंत एकी कधींच होऊं शकणार नाहीं असें माझें दृढ मत आहे. त्यानेंच कृत्रिम विभाग निर्माण करून वाढविले आहेत. तो पक्ष असतांना हिंदु आणि मुसलमान दोनीही पक्ष आपआपल्या वरवर विरोधी भासणारे हितसंबंध आणि असंतुष्ट व्यक्ति त्या तिसऱ्या पक्षाकडे सहाय्याची याचना करतील व तें त्यांना मिळेल.

ह. मे २४,१९४२.

## गाय व खिलाफत

खरें आहे. माझ्या अन्तकरणांत मी गाईला बचावूं शकेन ही आशा होती. मी गोपूजक आहे, कारण गाय व मी एकाच परमेश्वराची कृति आहोंत असा माझा विश्वास आहे. तिला वाचविण्याकरितां मी प्राणांचा यज्ञ करण्यासही तयार आहे. माझें जीविताचें तत्त्वज्ञान किंवा आकांक्षा कांहीं असोत, मी त्या चळवळींत पडलों त्यावेळीं कांहीं अटी घातल्या नव्हत्या. **मी त्या चळवळींत भाग घेतला तो माझ्या दुःखी शेजाऱ्याला मदत करणें माझें कर्तव्य म्हणूनच होय.** आज अली बंधू जिवंत असते तर त्यांनीं माझ्या बोलण्याच्या सत्यतेची ग्वाही दिली असती. त्याचप्रमाणें मौलाना अबदुल बारीसाहेब, ख्वाजा साहेब आणि अन्य लोकही मी तें कार्य गायी वांचविण्याच्या मोबदल्यांत केले नाहीं असचे सांगतील. प्रामाणिक मनुष्य, खरा शेजारी आणि एक विश्वासू मित्र म्हणून त्यांच्या दुःखाच्या वेळीं मुसलमानांना मदत करणें मला भाग होते.

## मुसलमानाबरोबर भोजन

जरी कालौघांत आतां हिंदुलोक त्या गोष्टीला सरावले असले तरी मी मुसलमानाबरोबर जेवून त्याकाळीं त्यांना धक्के दिले आहेत. ' फिरंगी महाल ' म्हणून ओळखले जाणारे प. वा. मौलाना बारीसाहेब हे एक उदार अन्तःकरणाचे गृहस्थ होते. मी एकदां त्यांच्या फिरंगी महालांत पाहुणा होतो. जितके दिवस मी त्यांचा पाहुणा म्हणून राहात होतो तेव्हां ते मला आपल्याबरोबर जेवूं देण्यास तयार नव्हते; कारण त्यामुळें पाहुण्याचा धर्म बाटविल्याचा होणारा आरोप त्यांच्यावर आला असता. आणि म्हणून ज्या ज्या वेळीं मला त्यांच्याकडे राहाण्याचा प्रसंग आला त्या त्या प्रत्येक वेळीं त्यांनीं ब्राह्मण आचारी सांगून स्वतंत्र स्वयंपाकाची व्यवस्था केली.

## फिरंगी महालांतील पाहुणा

त्यांचें राहाण्याचें ठिकाण फिरंगी महाल हें जुन्या पद्धतीचें असल्यामुळें त्यांत थोड्यांचाच समावेश होत असें; परंतु त्या ठिकाणीं राहाणारे लोक मी तेथेंच राहावें म्हणून आग्रह करीत असत. त्याकाळीं आम्हांला कार्यप्रवृत्त कर-

णाऱ्या दाक्षिण्य, उच्चता आणि उदारता यांचा तो निदर्शक होता. लोक त्यावेळीं आपली शांतता आणि आराम यांचा दुसऱ्यासाठीं त्याग करीत असत. ते परस्परांच्या धार्मिक समजुतींना मान देत असत; त्यावेळीं कोणाच्याही मनांत संशयाची अंधुक छटाही नव्हती. तो उच्चपणा—तो उदारपणा—आतां कोठें लुप्त झाला आहे ? ह्या प्रसंगामध्यें आम्ही कां सांपडलो हें शोधून काढण्यासाठीं पूर्वीच्या त्या सोन्याच्या दिवसांची आठवण करण्याबद्दल जिनासाहेबांसमवेत सर्व मुसलमानांना मी सांगेन.

## जिनासाहेबांना

**हे सुद्धां एकदां कॉंग्रेसमध्यें होते व हल्लीं जरी त्यांचा कॉंग्रेसवर राग झाला असला तरी तो त्यांच्या अन्तःकरणांत जें संशयशल्य शिरलें आहे त्यामुळेंच आहे. ईश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो; परंतु माझ्यामागें माझी त्यांना आठवण होऊन मी मुसलमानांच्या विरुद्ध कांहीं कट केला नव्हता अगर त्यांच्या हिताचें नुकसान केलें नव्हतें हें त्यांना पटेल व ही गोष्ट तेही कबूल करतील. जर मी त्यांना दगा दिला तर माझ्या सुटकेचा मार्ग कोठें आहे ?**

मी माझें अन्तःकरण जिनासाहेब व मुसलमान यांच्यापुढें उघडे करीत आहें. मला त्यांचा संशयच्छेद करून त्यांच्या आशंकांचा शेवट करावयाचा आहे. मुसलमानांच्या प्रामाणिकपणावर माझा पूर्ण भरंवसा आहे असें मी म्हणतों. जरी त्यांनीं माझें प्राण घेण्याचा प्रयत्न केला तरीसुद्धां माझ्या मनांत त्यांच्याबद्दल वाईट कल्पना कधींही येणार नाहीं. त्यांच्या मतानें “ दुष्ट गांधी”चा ते नाश करतील “ चांगल्या गांधी”चा नव्हे हें मला ठाऊक आहे. माझ्याबद्दल वाटेल तें मत ते बनवोत; परंतु मी मात्र त्यांच्याबाबत जुना गांधीच आहे.

## मुसलमानापासून शिव्याशाप

माझ्या मुसलमान मित्रांनीं आवेशाच्या भरांत माझ्यावर शिव्याशापांचें सत्र चालू केलें आहे. त्यांना मी म्हणेन—“ इस्लामनें तुम्हांला शत्रूलासुद्धां

त्रास देण्यास सांगितलेलें नाहीं. कोणाचाही द्वेष करण्यास तो सांगत नाहीं. अन्तरराष्ट्रीय बंधुत्वाचा आणि जागतिक मित्रत्वाचा तो धर्म आहे. इस्लाम इतिहासाकडे नजर फेकल्यास महंमदानें आपल्या शत्रूंचा सुद्धां तिरस्कार कधींही केला नाहीं असें दिसून येईल. महंमदानें आपल्या शत्रूंना दयाळुपणानें वागवून त्यांना आपल्या चांगुलपणानें व उदारपणानें जिंकण्याचा प्रयत्न केला. तुम्ही ह्या इस्लामाचे अनुयायी आहांत अगर दुसऱ्याचे ? जर असाल तर ज्यानें आपला धर्म सार्वजनिकरीत्या प्रगट केला त्याच्या शब्दावर अविश्वास करणें हें तुम्हाला शोभतें काय ? तें इस्लामच्या खऱ्या अन्तरंगाशीं जुळणारें आहे काय ? **एखादे दिवशीं आपल्या मित्रावर अविश्वास केल्याबद्दल तुम्हांला पश्चात्ताप होईल, हें माझें म्हणणें तुम्ही लक्ष्यांत ठेवा.** मी तुमचें मन वळविण्याचा जों जों अधिक प्रयत्न करीन किंवा मौलाना जों जों अधिकाधिक विनंति करण्याचा प्रयत्न करतील तों तों आमच्याविरुद्ध असणारी खलत्वाची वृत्ति अधिकाधिक बळावत जाईल. शिव्या या मला बंदुकीच्या गोळ्याप्रमाणें वाटतात त्या मला मारूं सुद्धां शकतील; आणि जर एखादा मनुष्य ह्या गोळ्यांनीं मला ठार करील तर त्याची अवस्था काय होईल ? त्यामुळें इस्लामला लाज येणार नाहीं काय ?

## मौलाना अझाद आणि मुस्लीम कॉंग्रेसवाले

मौलानासाहेबांच्यावर तर अतिशय गौण प्रकारच्या शिव्यागाळींची आग पाखडली जात आहे. कारण काय, तर माझ्यावर कांहीं गोष्टी मान्य करण्यासाठीं मित्रत्वाचें वजन घालण्याचें ते नाकारतात हें होय.

ज्याविषयीं इतकें बोललें जातें त्या पाकिस्तानसंबंधींच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला कॉंग्रेसनें पूर्वींच मान्यता दिली आहे. जिनासाहेबांना मी सांगेन, " पाकिस्तानच्या मागणींत जें जें सत्य आणि कायदेशीर आहे तें तें आधींच तुमच्या हातीं आहे आणि तें कोणीही हिरावून घेऊं शकणार नाहीं. जें असत्य व अस्थिर आहे तें कोणाच्याही स्वाधीन नाहीं म्हणून कोणींही देऊं शकणार नाहीं. जरी कदाचित् कोणी अशा प्रकारचें असत्य दुसऱ्यावर

लादण्यांत यशस्वी झाला तरी असल्या जुलूम जबरदस्तीचीं फळें त्याला फार काल उपभोगतां येणार नाहींत. अशा रीतीनें जुलूम जबरदस्तीनें दुसऱ्यावर असत्य लादणें हा अत्याचार आहे. असत्याचें जुलूमानें केलेलें प्रस्थापन ईश्वराला कधींही मान्य होणार नाहीं. पाकिस्तानच्या मागणींतील सत्यासत्य जिनासाहेबांना पूर्ण माहिती आहे."

अशा कटु गोष्टी आपल्याला बोलाव्या लागतात व आपल्या भावना व विचार व्यक्त केल्याशिवाय आपल्याला राहावत नाहीं असें ते म्हणतात. त्याचप्रमाणें स्वतःला मीही मुसलमानांच मित्र समजतो असें मी म्हणेन. त्यांना हें पटणार नाहीं परंतु जें मला पटेल तें मी बाहेर बोलूं नये काय ?

जरी आपलें बोलणें श्रोत्यांना कटु वाटलें तरी सुद्धां तें बोलण्यांत जें धैर्य जिनासाहेबांनीं दाखविलें आहे त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करावें. हें योग्य आहे, परंतु जे कॉंग्रेसनिष्ठ मुसलमान त्यांचे दृष्टीकोन स्वीकारूं शकत नाहींत त्यांचा तिरस्कार कां करावा ? जर ते तुम्हाला अज्ञानी व मूढ वाटत असतील तर त्यांना आपल्या दैवावर अवलंबून राहूं द्या. **जर कोट्यवधि मुसलमान तुमच्या बाजूचे असतील तर तुमच्या मतानें मूढबुद्धी असणाऱ्या मूठभर मुसलमानांबद्दल तुम्ही त्रास कां करून घ्यावा ?**

कॉंग्रेसनिष्ठ मुसलमानांच्या दृष्टीनें विचार केल्यास त्यांची संख्या लहान आहे. म्हणून जें आपल्याला सत्य वाटतें तें सोडून देणें त्यांना योग्य दिसतें काय ! महंमदानें कोट्यवधि मुसलमानामध्यें कशा प्रकारें आपलें कार्य केलें बरें ? ज्या वेळीं बहुसंख्य मुससमान आपल्या बाजूला येतील तेव्हांच आपण इस्लाम धर्माचा प्रसार करूं असें त्यानें म्हटलें काय ! मग तुम्ही या मोठ्या उदाहरणावरून धडा कां घेऊं नये ? असें मी तुम्हांला विचारतो. जें सत्य आहे असें स्वतःला पटत नाहीं तें स्वीकारावें अशी कॉंग्रेस मुस्लीम लोकापासून मागणी करणें हें कितपत योग्य होईल ?

## माझा मार्ग नव्हे

राजाजी मला म्हणाले, "माझा पाकिस्तानवर विश्वास नाहीं. परंतु मुसलमान तें मागतात. त्यांचे पुढारी जिनाही तें मागतात. मग त्यांना आजच होय असें कां म्हणूं नये ? आग्रहाची मागणी न्याय्य नसेल, तरी पण ती

# गांधीजींची मुसलमानांना विनंति.

## ( ८ ऑगस्ट १९४२ च्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटींतील भाषणाचे उतारे )

ह्या तीन मित्रांच्या धैर्याबद्दल अभिनंदन केल्यावर मला आतां असें म्हणावयाचें आहे कीं, त्यांनीं उपसूचना आणून या समितीला जें करावयास सुचविलें आहे त्यांत परिस्थितीची बरोबर मांडणी नाहीं. त्यामुळें मौलानांनीं उपसूचना मागें घेण्याबद्दल त्यांना जी आग्रहाची विनंति केली त्याबद्दल ह्या माझ्या मित्रांनीं एकदां विचार करावयास हवा होता; जवाहरलालनीं दिलेल्या खुलाशाचें त्यांनीं काळजीपूर्वक आकलन करावयास पाहिजे होतें. हें त्यांनीं केलें असतें तर जो हक्क राष्ट्रीय सभेनें मान्य केला पाहिजे असें त्यांचें म्हणणें आहे तो हक्क पूर्वींच मान्य केला आहे हें त्यांना स्पष्टपणें कळून आलें असतें.

प्रत्येक मुसलमान हिंदुस्थानवर आपली मातृभूमि म्हणून हक्क सांगत होता असा एक काल होता. ज्यावेळीं अलीबंधु माझ्याबरोबर असत. त्यावेळीं त्यांच्या बोलण्याच्या अगर चर्चेच्या मुळाशीं असलेली गृहीत कल्पना म्हणजे हिंदुस्थान हा जितका हिंदूंचा तितकाच तो मुसलमानांचाही देश आहे, ही होती. ही त्यांच्या मनांतील अन्तर्गत दृढ भावना होती, वर धारण केलेला मुखवटा नव्हता, हें मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों. मी त्यांचेबरोबर वरींच वर्षें होतो. शिवाय त्यांच्या संगतींत कितीतरी दिवस व रात्रीं घालविल्या आहेत. म्हणून मी खात्रीनें असें सांगूं शकतों कीं मनांतील दृढ व खऱ्या कल्पनांचा उच्चार ते करीत होते. वरवर जें दिसेल त्यावर मी चटदिशीं विश्वास ठेवतों असें म्हणणारे कांहीं लोक आहेत, हें मला माहीत आहे. परंतु माझे मित्र म्हणतात त्याप्रमाणें मी इतका भोळा व चुकीला पात्र आहे असें मला वाटत नाहीं. त्यांच्या टीकेनें मला दुःखही होत नाहीं. लोकांना फसविण्यापेक्षां चुकीला पात्र असणें मी अधिक पसंत करतो.

### माझ्या आयुष्याची महत्त्वाकांक्षा

या कम्युनिस्ट मित्रांनीं आपल्या सुधारणेच्या उपसूचनांनीं जें कांहीं पुढें मांडलें आहे तें मला कांहीं नवीन नाहीं. ते निरनिराळ्या हजारों व्यासपीठा-

क्र. ६२९५

वरून पुनः पुन्हां सांगितलें गेलें आहे. हजारों मुसलमानांनीं मला सांगितलें आहे कीं हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाचा समाधानकारक निर्णय करावयाचा असेल तर तो माझ्या आयुष्यांतच केला पाहिजे. या स्तुतीनें मी फुशारून जावयास पाहिजे; परंतु जें माझ्या बुद्धीला पटत नाहीं, तें म्हणणें मी कसें मान्य करूं ? हिंदु-मुस्लीम एकी हा कांहीं नवा प्रश्न नाहीं. कोट्यावधि हिंदु मुसलमानांनीं त्याकरितां प्रयत्न केला आहे. **मी त्यासाठीं माझ्या लहानपणापासून प्रयत्न करीत आहे.** त्या दिवसापासूनच हिंदु-मुस्लीम ऐक्याबद्दल मी सांगत आलों आहें; आणि हिंदुस्थानांत जर आम्हांला शांततेचें व सलोख्याचें आयुष्य घालवावयाचें असेल तर आम्ही शेजाऱ्याप्रमाणें बंधु भावानें वागलें पाहिजे.

## लहानपणापासूनच मुसलमानांशीं मैत्री

शाळेंत असतांना मुसलमान विद्यार्थीबंधूंशीं मैत्री करावयाचें मी ठरविलें होतें. हिंदु मित्र मिळावयास अडचण नव्हती, परंतु आपण मुसलमान देश-बांधवाशीं मैत्री केली पाहिजे असें मला वाटत होतें. मी एका मुसलमान व्यापाऱ्याचा सल्लागार म्हणून दक्षिण आफ्रिकेंत गेलों. त्या ठिकाणीं पुष्कळ मुसलमानाशीं माझी मैत्री घडून आली. तेथें माझ्या पक्षकाराच्या विरुद्ध पक्ष-कारासुद्धां अन्य मुसलमानाशीं मी स्नेह संपादिला. ते " गांधी कधींही फसवणार नाहीं " असें म्हणत असत. मी त्यांचा विश्वास शेवटपर्यंत कायम राखूं शकलों. शेवटीं ज्यावेळीं मी हिंदुस्थानला येण्याकरितां निघालों त्यावेळीं माझ्या मित्रांना-हिंदु, मुसलमान, पार्शी-वियोगामुळें वाईट वाटून ते रडले.

## खिलाफत

हिंदुस्थानांतसुद्धां मी मुसलमानाशीं तेच संबंध कायम ठेवले; व हिंदु-मुसलमान ऐक्याबद्दलचा कोणताही प्रयत्न बाकी ठेवला नाहीं. याच एका लालचीनें मी खिलाफत चळवळींमध्यें भाग घेतला. अखिल हिंदुस्थानांतील मुसलमान मला आपला मित्र म्हणून ओळखत होते. मग मी आतांच इतका वाईट व नावडता कसा बनलों ? खिलाफत चळवळीला मदत करण्यांत माझा कांहीं स्वार्थ होता काय ?

## गाय व खिलाफत

खरें आहे. माझ्या अन्तकरणांत मी गाईला बचावूं शकेन ही आशा होती. मी गोपूजक आहे, कारण गाय व मी एकाच परमेश्वराची कृति आहोंत असा माझा विश्वास आहे. तिला वाचविण्याकरितां मी प्राणांचा यज्ञ करण्यासही तयार आहे. माझें जीविताचें तत्त्वज्ञान किंवा आकांक्षा कांहीं असोत, मी त्या चळवळींत पडलों त्यावेळीं कांहीं अटी घातल्या नव्हत्या. **मी त्या चळवळींत भाग घेतला तो माझ्या दुःखी शेजाऱ्याला मदत करणें माझें कर्तव्य म्हणूनच होय.** आज अली बंधू जिवंत असते तर त्यांनीं माझ्या बोलण्याच्या सत्यतेची ग्वाही दिली असती. त्याचप्रमाणें मौलाना अबदुल बारीसाहेब, ख्वाजा साहेब आणि अन्य लोकही मी तें कार्य गायी वांचविण्याच्या मोबदल्यांत केले नाहीं असचें सांगतील. प्रामाणिक मनुष्य, खरा शेजारी आणि एक विश्वासू मित्र म्हणून त्यांच्या दुःखाच्या वेळीं मुसलमानांना मदत करणें मला भाग होते.

## मुसलमानाबरोबर भोजन

जरी कालौघांत आतां हिंदुलोक त्या गोष्टीला सरावले असले तरी मी मुसलमानाबरोबर जेवून त्याकाळीं त्यांना धक्के दिले आहेत. 'फिरंगी महाल' म्हणून ओळखले जाणारे प. वा. मौलाना बारीसाहेब हे एक उदार अन्तःकरणाचे गृहस्थ होते. मी एकदां त्यांच्या फिरंगी महालांत पाहुणा होतो. जितके दिवस मी त्यांचा पाहुणा म्हणून राहात होतो तेव्हां ते मला आपल्याबरोबर जेवूं देण्यास तयार नव्हते; कारण त्यामुळें पाहुण्याचा धर्म बाटविल्याचा होणारा आरोप त्यांच्यावर आला असता. आणि म्हणून ज्या ज्या वेळीं मला त्यांच्याकडे राहाण्याचा प्रसंग आला त्या त्या प्रत्येक वेळीं त्यांनीं ब्राह्मण आचारी सांगून स्वतंत्र स्वयंपाकाची व्यवस्था केली.

## फिरंगी महालांतील पाहुणा

त्यांचें राहाण्याचें ठिकाण फिरंगी महाल हें जुन्या पद्धतीचें असल्यामुळें त्यांत थोड्यांचाच समावेश होत असें; परंतु त्या ठिकाणीं राहाणारे लोक मी तेथेंच राहावें म्हणून आग्रह करीत असत. त्याकाळीं आम्हांला कार्यप्रवृत्त कर-

णाऱ्या दाक्षिण्य, उच्चता आणि उदारता यांचा तो निदर्शक होता. लोक त्यावेळीं आपली शांतता आणि आराम यांचा दुसऱ्यासाठीं त्याग करीत असत. ते परस्परांच्या धार्मिक समजुतींना मान देत असत; त्यावेळीं कोणाच्याही मनांत संशयाची अंधुक छटाही नव्हती. तो उच्चपणा—तो उदारपणा—आतां कोठें लुप्त झाला आहे? ह्या प्रसंगामध्यें आम्ही कां सांपडलो हें शोधून काढण्यासाठीं पूर्वींच्या त्या सोन्याच्या दिवसांची आठवण करण्याबद्दल जिनासाहेबांसमवेत सर्व मुसलमानांना मी सांगेन.

## जिनासाहेबांना

**हे सुद्धां एकदां कॉंग्रेसमध्यें होते व हल्लीं जरी त्यांचा कॉंग्रेसवर राग झाला असला तरी तो त्यांच्या अंन्तःकरणांत जें संशयशल्य शिरलें आहे त्यामुळेंच आहे. ईश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो; परंतु माझ्यामागें माझी त्यांना आठवण होऊन मी मुसलमानांच्या विरुद्ध कांहीं कट केला नव्हता अगर त्यांच्या हिताचें नुकसान केलें नव्हतें हें त्यांना पटेल व ही गोष्ट तेही कबूल करतील. जर मी त्यांना दगा दिला तर माझ्या सुटकेचा मार्ग कोठें आहे?**

मी माझें अंन्तःकरण जिनासाहेब व मुसलमान यांच्यापुढें उघडे करीत आहें. मला त्यांचा संशयच्छेद करून त्यांच्या आशंकांचा शेवट करावयाचा आहे. मुसलमानांच्या प्रामाणिकपणावर माझा पूर्ण भरंवसा आहे असें मी म्हणतों. जरी त्यांनीं माझे प्राण घेण्याचा प्रयत्न केला तरीसुद्धां माझ्या मनांत त्यांच्याबद्दल वाईट कल्पना कधींही येणार नाहीं. त्यांच्या मतानें "दुष्ट गांधी"चा ते नाश करतील "चांगल्या गांधी"चा नव्हे हें मला ठाऊक आहे. माझ्याबद्दल वाटेल तें मत ते बनवोत; परंतु मी मात्र त्यांच्याबाबत जुना गांधीच आहे.

## मुसलमानापासून शिव्याशाप

माझ्या मुसलमान मित्रांनीं आवेशाच्या भरांत माझ्यावर शिव्याशापांचें सत्र चालू केलें आहे. त्यांना मी म्हणेन—"इस्लामनें तुम्हांला शत्रूलासुद्धां

त्रास देण्यास सांगितलेलें नाहीं. कोणाचाही द्वेष करण्यास तो सांगत नाहीं. अन्तरराष्ट्रीय बंधुत्वाचा आणि जागतिक मित्रत्वाचा तो धर्म आहे. इस्लाम इतिहासाकडे नजर फेकल्यास महंमदानें आपल्या शत्रूंचा सुद्धां तिरस्कार कधींही केला नाहीं असें दिसून येईल. महंमदानें आपल्या शत्रूंना दयाळुपणानें वागवून त्यांना आपल्या चांगुलपणानें व उदारपणानें जिंकण्याचा प्रयत्न केला. तुम्ही ह्या इस्लामाचे अनुयायी आहांत अगर दुसऱ्याचे? जर असाल तर ज्यानें आपला धर्म सार्वजनिकरीत्या प्रगट केला त्याच्या शब्दावर अविश्वास करणें हें तुम्हाला शोभतें काय? तें इस्लामच्या खऱ्या अन्तरंगाशीं जुळणारें आहे काय? **एखादे दिवशीं आपल्या मित्रावर अविश्वास केल्याबद्दल तुम्हांला पश्चात्ताप होईल, हें माझें म्हणणें तुम्ही लक्ष्यांत ठेवा.** मी तुमचें मन वळविण्याचा जों जों अधिक प्रयत्न करीन किंवा मौलाना जों जों अधिकाधिक विनंति करण्याचा प्रयत्न करतील तों तों आमच्याविरुद्ध असणारी खलत्वाची वृत्ति अधिकाधिक वळावत जाईल. शिव्या या मला बंदुकीच्या गोळ्याप्रमाणें वाटतात त्या मला मारूं सुद्धां शकतील; आणि जर एखादा मनुष्य ह्या गोळ्यांनीं मला ठार करील तर त्याची अवस्था काय होईल? त्यामुळें इस्लामला लाज येणार नाहीं काय?

## मौलाना अझाद् आणि मुस्लीम कॉंग्रेसवाले

मौलानासाहेबांच्यावर तर अतिशय गौण प्रकारच्या शिव्यागाळीची आग पाखडली जात आहे. कारण काय, तर माझ्यावर कांहीं गोष्टी मान्य करण्यासाठीं मित्रत्वाचें वजन घालण्याचें ते नाकारतात हें होय.

ज्याविषयीं इतकें बोललें जातें त्या पाकिस्तानसंबंधींच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काला कॉंग्रेसनें पूर्वींच मान्यता दिली आहे. जिनासाहेबांना मी सांगेन, "पाकिस्तानच्या मागणींत जें जें सत्य आणि कायदेशीर आहे तें तें आधींच तुमच्या हातीं आहे आणि तें कोणीही हिरावून घेऊं शकणार नाहीं. जें असत्य व अस्थिर आहे तें कोणाच्याही स्वाधीन नाही म्हणून कोणींही देऊं शकणार नाहीं. जरी कदाचित् कोणी अशा प्रकारचें असत्य दुसऱ्यावर

लादण्यांत यशस्वी झाला तरी असल्या जुलूम जबरदस्तीचीं फळें त्याला फार काल उपभोगतां येणार नाहींत. अशा रीतीनें जुलूम जबरदस्तीनें दुसऱ्यावर असत्य लादणें हा अत्याचार आहे. असत्याचें जुलूमानें केलेलें प्रस्थापन ईश्वराला कधींही मान्य होणार नाहीं. पाकिस्तानच्या मागणींतील सत्यासत्य जिनासाहेबांना पूर्ण माहिती आहे."

अशा कटु गोष्टी आपल्याला बोलाव्या लागतात व आपल्या भावना व विचार व्यक्त केल्याशिवाय आपल्याला राहावत नाहीं असें ते म्हणतात. त्याचप्रमाणें स्वतःला मींही मुसलमानांच मित्र समजतो असें मी म्हणेन. त्यांना हें पटणार नाहीं परंतु जें मला पटेल तें मी बाहेर बोलूं नये काय ?

जरी आपलें बोलणें श्रोत्यांना कटु वाटलें तरी सुद्धां तें बोलण्यांत जें धैर्य जिनासाहेबांनीं दाखविलें आहे त्याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करावें. हें योग्य आहे, परंतु जे कॉंग्रेसनिष्ठ मुसलमान त्यांचे दृष्टीकोन स्वीकारूं शकत नाहींत त्यांचा तिरस्कार कां करावा ? जर ते तुम्हाला अज्ञानी व मूढ वाटत असतील तर त्यांना आपल्या दैवावर अवलंबून राहूं द्या. **जर कोट्यवधि मुसलमान तुमच्या बाजूचे असतील तर तुमच्या मतानें मूढबुद्धी असणाऱ्या मूठभर मुसलमानांबद्दल तुम्ही त्रास कां करून घ्यावा ?**

कॉंग्रेसनिष्ठ मुसलमानांच्या दृष्टीनें विचार केल्यास त्यांची संख्या लहान आहे. म्हणून जें आपल्याला सत्य वाटतें तें सोडून देणें त्यांना योग्य दिसतें काय ? महंमदानें कोट्यवधि मुसलमानामध्यें कशा प्रकारें आपलें कार्य केलें बरें ? ज्या वेळीं बहुसंख्य मुससमान आपल्या बाजूला येतील तेव्हांच आपण इस्लाम धर्माचा प्रसार करूं असें त्यानें म्हटलें काय ? मग तुम्ही या मोठ्या उदाहरणावरून धडा कां घेऊं नये ? असें मी तुम्हांला विचारतो. जें सत्य आहे असें स्वतःला पटत नाहीं तें स्वीकारावें अशी कॉंग्रेस मुस्लीम लोकापासून मागणी करणें हें कितपत योग्य होईल ?

## माझा मार्ग नव्हे

राजाजी मला म्हणाले, "माझा पाकिस्तानवर विश्वास नाहीं. परंतु मुसलमान तें मागतात. त्यांचे पुढारी जिनाही तें मागतात. मग त्यांना आजच होय असें कां म्हणूं नये ? आग्रहाची मागणी न्याय्य नसेल, तरी पण ती

मान्य करा. जिनांना नंतर पाकिस्तानचे गैरफायदे कळून येतील आणि ते आपण होऊन आपली मागणी सोडून देतील." मी त्यांना सांगितलें, " जी गोष्ट असत्य आहे असें मी मानतो ती गोष्ट सत्य आहे असें मानणें आणि जरी ती मागणी योग्य वेळीं सोडून दिली जाईल असा विश्वास असला तरी दुसऱ्यांनीं ही ती बाब सत्य अशी मानावी असें सांगणें, हें मला पटत नाही. ही मागणी सत्य आहे असें मला वाटलें तर मी याक्षणींच ती मान्य करीन; तेंही फक्त जिनासाहेबांना संतुष्ट करण्याकरितां नव्हे–तर सत्याचा मार्ग अनुसरण्याकरितांच होय.

## लोकशाही आणि अनत्याचार

जगाचें खरें कल्याण अनत्याचारावरच अवलंबून आहे आणि अत्याचाराचा शेवटीं त्यागच करावा लागेल, असा जरी दृढ विश्वास असला तरी कॉंग्रेस आपलें म्हणणें दुसऱ्या कोणावरही लादत नाहीं. हें जर खरें असेल तर हिंदु–मुसलमानांच्या एकीचा प्रश्नही अनत्याचारानें सोडवावा लागेल. अत्याचाराचा कांहींच उपयोग होणार नाहीं. जर हिंदु मुसलमानांवर अत्याचार करत असतील तर त्यांना कोणत्या तोंडानें जागतिक संयुक्त घटनेबद्दल बोलतां येईल ? इंग्लिश आणि अमेरिकन मुत्सद्दी म्हणतात त्याप्रमाणें अत्याचारानें जागतिक शांतता स्थापन करतां येईल असें मला त्याच कारणाकरतां वाटत नाहीं. जरी जिनासाहेबांना उपदेश करण्याचा किंवा सत्याचा मार्ग दाखविण्याचा मला अधिकार नसला तरी सुद्धां मी स्वतःला त्यांचा खरा मित्र व हितचिंतक समजत असल्यामुळें त्यांना खरें काय आणि खोटें काय हें दाखविणें माझें कर्तव्य आहे असें मी समजतो.

**दोन्ही जमातींना आपसांत न मिटवितां येणारे भेद एका पंचायतीकडे सोपवून तिचा निर्णय आपखुषीनें मान्य करण्याचें कॉंग्रेसनें स्वीकारलें आहे.** जर हा मार्ग मुस्लीम लीगला मान्य नसेल तर तिनें धैर्यानें पुढें येऊन आपल्या विरोधकांना आपल्या मार्गाचे फायदे व गैर फायदे पटवून देऊन आपल्या मार्गाला वळवावें. त्यांनीं सामान्य जनतेला आपलें म्हणणें समजून सांगावें. जर ते विरोधकांना पटवूं शकले नाहींत अगर

सामान्य जनतेलाही आपल्या बाजूला वळवूं शकले नाहींत तर अन्तर्गत कलह आणि त्रास सुरूं होईल.

डॉ. मुंजे व श्री. सावरकरासारख्या ज्या हिंदूंचा शस्त्रावर विश्वास असून जे मुसलमानांना आपल्या अंमलाखालीं राहावें लागेल असें मानतात त्या पक्षाचा मी नाहीं. **मी त्या विभागाचा घटक नसून हिंदु आणि मुसलमान दोघांच्याही हितासाठीं ठाकलेल्या कॉंग्रेसचा मी प्रतिनिधि आहें.** सोन्याचें अंडें एकदम मिळविण्याच्या इच्छेनें कॉंग्रेसला तुम्ही मारूं इच्छितां. जर तुमचा कॉंग्रेसवर विश्वास नसेल तर तुम्ही अशी खात्री बाळगा कीं या देशांत हिंदु-मुसलमानामध्यें कायम भांडण चालूं राहील. आज हा देश अशा कलहांत सांपडलेला आहे; आणि जर तें चालावयाचें असेल तर तें पहाण्यास जगणें मला आवडणार नाहीं.

म्हणून माझें म्हणणें असें कीं-तुमच्या पाकिस्तानच्या मागणींत जें जें व्यवहार आणि न्याय यांना धरून आहे तें तें तुमच्या हातीं आहेच; आणि जें जें याविरुद्ध आहे तें तुम्ही फक्त तरवारीनेंच घेऊं शकाल; त्याला इतर मार्ग नाहीं. पण लक्ष्यांत ठेवा कीं हा मार्ग पैगंबरानें उपदेशिलेला नाहीं.

## स्वातंत्र्ययुद्धांत एक व्हा

माझ्या अन्तःकरणांत पुष्कळ विचार आहेत, ते तुमच्यापुढें कसें ओतावेत आणि हा त्रास सहन करण्याची ताकद माझ्या शरीरांत आहे कीं कसें याबद्दल मी रात्रभर विचार करीत होतों. परंतु माझ्या पुढील प्रश्न असा आहे कीं परमेश्वरानें जे शक्तिसर्वस्व मला दिलें आहे तें या कामीं वेचण्यास मी तयार आहें. हा प्रश्न माझ्या जीवन मरणाचा आहे. **आज आपण सर्वजण हिंदु व मुसलमान एक होऊं या. यावेळीं आपल्या मनांत कोणताही मानसिक छपवाछपवीचा प्रकार नको. आम्हांला जी एकी करावयाची ती या साम्राज्यशाहींतून फुटून निघण्यासाठीं करावयाची आहे.** जर पाकिस्तान हें हिंदुस्थानचा भाग होणारच असेल तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेण्यास काय हरकत आहे ? आज हिंदु आणि मुसलमान यांनीं एक झालेंच पाहिजे. अशी एकी साधल्याशिवाय या जागतिक महायुद्धांत भाग घेणें शक्य नाहीं. जर युद्ध

आणखी ६ महिने चाललें तर चीनला आम्ही कसें वाचवूं शकणार? जर आम्हांला स्वातंत्र्य मिळवावयाचें असेल तर तें आतांच मिळविलें पाहिजे.

आम्हांला संकटांना तोंड द्यावें लागतें; त्या संकटांना पार नाहीं. परंतु कॉंग्रेसला एक स्वातंत्र्य तरी मिळवावयाचें आहे किंवा या प्रयत्नांत नष्ट तरी व्हावयाचें आहे. जें स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे तें ४० कोटी देशबांधवाकरितां आहे. कॉंग्रेसच्या लोकांकरितां नव्हे. कॉंग्रेसचे लोक नेहमींच मातृभूमीचे सेवक राहातील.

## सत्ता विरुद्ध लोकशाही

मौलानासाहेबांनीं मुस्लीम लीगसुद्धां कोणत्याही जमातीकडे हिंदुस्थानचा राज्यकारभार द्यावा अशी जी सूचना केली आहे तिला माझा पाठिंबा आहे. ती सत्ता मुस्लीम जनतेकडे दिली तरी माझी त्याला हरकत नाहीं. कारण किती झालें तरी ते हिंदी असून हिंदुस्थान ही त्यांची मायभू आहे.

जिनासाहेब ब्रिटिशांना म्हणाले होते, "जर तुम्ही आम्हांला सत्ता देणार असाल तर ती स्वीकारण्यास आम्ही तयार आहोंत; कारण ब्रिटिशांनीं राज्य घेतलें तें मुसलमानापासून घेतलें आहे." पण हें मुसलमानांचें राज्य होईल. मौलाना साहेबांनीं आणि मी जी सूचना केली आहे तिचा अर्थ मुसलमानांचें राज्य स्थापन करणेचा नाहीं. **कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या सत्तेवर कॉंग्रेसचा विश्वास नाहीं. कॉंग्रेसचा लोकशाहीवर विश्वास असून या विस्तृत देशांत राहाणाऱ्या प्रत्येक मुस्लीम, हिंदु, ख्रिश्चन, पार्शी ज्यू वगैरे-जमातींचा अन्तर्भाव लोकशाहीच्या कक्षेमध्यें होतो असा कॉंग्रेसचा दृढ विश्वास आहे.** जर मुस्लीम राज्याची शक्यता असेल तर तो प्रयोग करावा. पण आम्ही त्याच्या बाजूनें कसें राहावें? आम्ही आमच्या मान्यतेची मुद्रा त्यावर कशी करावी?

## सर्वांचें घर-हिंदुस्थान

या देशांतील मुसलमानापैकीं कोट्यवधि लोक हिंदुमधूनच आले आहेत. मग धर्मांतरामुळें हिंदुस्थान ही त्यांची मातृभूमि नाहींशी झाली.

काय ? माझ्या स्वतःच्या मुलानें मुसलमान धर्म स्वीकारला आहे. मग त्याची जन्मभूमी पोरबंदर कीं पंजाब होईल ? मी मुसलमानांना विचारतो, ' जर हिंदुस्थान ही तुमची मातृभूमि नसेल तर तुमचा देश कोणता ? आणि ज्या माझ्या मुलानें इस्लाम धर्म स्वीकारला त्याला तुम्ही कोणत्या देशाचा समजाल ? ' त्याच्या धर्मांतरानें त्याच्या आईबापामध्यें बदल झाला नाहीं. त्यानें परधर्माचा स्वीकार केल्यानंतर त्याच्या आईनें त्याला पत्र लिहून इस्लाम धर्म तूं स्वीकारलास हरकत नाहीं. पण दारू पिणें आतांपासून सोड असें सांगितलें. ज्यांनीं हें धर्मांतर घडवून आणलें त्यांना तिनें लिहिलें, "उदात्त मुसलमानांनो ! जर शक्य असेल तर मानवी जीविताविषयीं असणारी त्याची पशुवृत्ति तुम्ही अवश्य बदला. मी त्याच्या धर्मान्तराकडे इतकेसें लक्ष्य देत नाहीं. दारू व व्यभिचार यापासून परावृत्त होईल इकडे तुम्ही कृपेनें अवश्यमेव लक्ष्य द्यावें ! " जेव्हां माझा नातु आपल्या पित्याला भेटण्यास गेला तेव्हां पूर्वींच्याच वाईट संवयी अद्यापि चालू असल्याचें पाहून त्याला फार दुःख झालें.

**थोडक्यांत सांगावयाचें तर या देशांत राहाणाऱ्या सर्व मुसलमानांची हिंदुस्थान ही मायभूमि आहे यांत शंका नाहीं. म्हणून प्रत्येक मुसलमानानें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य युद्धांत भाग घेतला पाहिजे. कॉंग्रेस ही एका विशिष्ट वर्गाची अगर जमातीची नाहीं; तर ती सर्व राष्ट्राची आहे.** कॉंग्रेसचा ताबा घेण्यास मुसलमानांना केव्हांही मुभा आहे. त्यांना वाटेल तर त्यांनीं बहुमतानें कॉंग्रेसवर ताबा मिळवून आपल्याला आवडणाऱ्या मार्गांनीं कॉंग्रेसचें तारूं वल्हवावें. कॉंग्रेसची घटना लोकशाहीच्या तत्त्वावर आधारलेली आहे.

मला हिंदूंना हें सांगावयाचें आहे कीं त्यांना अल्पसंख्य लोकांसह सर्व लोकांकरितां झगडावें लागेल. मुसलमानांना वाचविण्याच्या कामीं प्राणार्पण करण्यासही त्यांनीं तयार असलें पाहिजे. अनत्याचाराचा पहिला धडा म्हणजे आपल्या शेजाऱ्याशीं प्रेम आणि सहिष्णुता धारण करणें हाच होय. मी मुसलमानांना सुद्धां हा धडा घेऊन तो गिरविण्यास सांगेन.

एखाद्या कॉंग्रेसमनकडून एखादा मुसलमान मारला गेल्याचें एखादें उदाहरण जरी माझ्या ऐकिवांत आलें तरी मला दुःख होईल. भावी क्रांतिकालांत हिंदूंच्या हल्यापासून मुसल्मानांचें रक्षण करण्याचें कामीं कॉंग्रेस सभासद प्राणार्पण सुद्धां करील. हा अनत्याचाराचा पहिलें जरूर अंग आहे हें त्यांनीं अगदीं विसरूं नये. हिंदु अगर मुसलमान जो कोणी कॉंग्रेसचा सभासद असेल त्यानें हें तत्त्व अंमलांत आणलें पाहिजे. जो मुसलमान अशा रीतीनें वागेल तो इस्लामची सेवा करतो असें होईल. परस्परांच्या ठिकाणीं विश्वास असला पाहिजे. या राष्ट्रव्यापी ह्या झगड्यांत यशस्वी होण्याला सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे परस्पर-विश्वास होय हें सर्व कॉंग्रेसच्या लोकांनीं लक्ष्यांत ठेवावें.

---

# २ अबुल कलम आझाद

## १

## अल्पसंख्याक आणि हिंदुस्थानचें राजकीय भवितव्य

मी तुमच्यापुढें आजचा खरा प्रश्न थोडक्यांत ठेविला आहे. हाच प्रश्न जिव्हाळयाचा आहे. बाकीचे दुय्यम आहेत. याच प्रश्नाच्या बाबतींत गेल्या सप्टेंबर महिन्यांत कॉंग्रेसनें आपली मागणी ब्रिटीश सरकारपुढें ठेविली. ती मागणी अतिशय स्पष्ट व साधी होती. तिला कोणतीही जमात अगर समूह विरोध करूं शकणार नाहीं. या संबंधीं जातीय प्रश्न उत्पन्न होईल अशी दूरचीसुद्धां कल्पना आमच्या मनांत नव्हती. आपल्या देशांत असे कांहीं समूह आहेत कीं त्यांना राजकीय झगड्यांत कॉंग्रेसबरोबर राहातां येत नाहीं किंवा कॉंग्रेस जितकी पुढें जाण्यास तयार आहे तितकेंही त्यांना जातां येत नाहीं याची आम्हांला पूर्ण जाणीव आहे. राजकारणांत भाग घेणाऱ्या हिंदुस्थानच्या बऱ्याच मोठ्या भागानें कृतीचा मार्ग घेतला आहे तिच्याशीं कांहींजण सहमत होऊं शकत नाहींत हें आम्हांला माहीत आहे. परंतु हिंदुस्थानच्या लोकांचा स्वातंत्र्याचा हक्क व हिंदुस्थानची पूर्ण स्वातंत्र्याची जन्मसिद्ध हक्काची जाणीव या गोष्टीकडे लक्ष्य दिल्यास जागृत झालेला व उतावीळ बनलेला हिंदुस्थान आतां प्राथमिक मार्गाच्या पलीकडे गेला असून आमच्या या मागणीला आतां कोणीही विरोध करूं शकणार नाहीं. जे लोक स्वतःच्या स्वार्थालाच चिकटून बसून कांहीं फरक झाल्यास त्यामुळें आपलें नुकसान होईल अशा विचारानें भीतिग्रस्त झाले आहेत त्यांनासुद्धां या कालाच्या प्रवाहापुढें कांहींच करतां येईनासें झालें आहे. त्यांनासुद्धां आम्ही पुढें ठेवलेलें ध्येय मान्य करणें भाग पडत आहे.

परमावधीच्या आपत्तीचा काल हा आपला परीक्षक असतो. आणि त्याप्रमाणें आजच्या या मोठ्या प्रश्नानें आमची उत्तम परीक्षा केली असून आजच्या राजकारणाचीं पुष्कळशीं अंगें स्पष्ट केलीं आहेत. जातीय वादाच्या बुडाशीं असलेलें खरें तत्त्वही त्यामुळें उघडें पडलें आहे. खऱ्या राजकीय प्रश्नाशीं जातीय वादाची सरमेसळ करूनया प्रश्नासंबंधीं गोंधळ निर्माण करण्याचे प्रयत्न हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें अनेकवार झाले आहेत. आणि जातीय वादच हिंदुस्थानच्या राजकीय प्रश्न योग्य रीतीनें सोडविण्याच्या आड येतो ही गोष्ट जगापुढें सिद्ध करण्याचा अट्टाहास करण्यांत आला आहे.

दीडशें वर्षें ब्रिटीश साम्राज्यशाहीनें फोडा आणि राज्य करा या तत्त्व-प्रणालीचा अंमल केला आहे. आणि अन्तर्गत भेद वाढवून निरनिराळ्या जमातींचा उपयोग करून आपली सत्ता अबाधित राखण्याचा प्रयत्न केला आहे. हा हिंदुस्थानच्या राजकीय पारतंत्र्याचा अपरिहार्य परिणाम आहे; त्याबद्दल तक्रार करून त्रस्त होण्यांत आपला मूर्खपणाच दिसणार आहे. **परकीय सरकार अंकित देशाच्या अन्तर्गत एकीला कधींच मदत करणार नाहीं; कारण अशा तऱ्हेचे भेद हेंच त्यांची सत्ता चिरस्थायी करण्याचे खात्रीचे मार्ग होत.** ब्रिटीश साम्राज्यशाही व त्याबरोबरच तिच्या अंमलाखालील हिंदुस्थानचा इतिहासाचा एक लांबलचक भाग संपला असून त्यावर आम्ही व सर्व जगानें त्यावर विश्वास ठेवावा असें सांगण्यांत आलें त्यावेळीं ब्रिटीश मुत्सद्यांनीं हा खोडसाळ मार्ग सोडून राजकीय ध्येयासाठीं जातीय वाद उकरून काढूं नये अशी अपेक्षा केली तर ती चुकीची ठरेल काय ? परंतु अजुनी तो काल फार दूर आहे; अशा तऱ्हेच्या खोट्या आशेला आपण चिकटून राहूं नये. अशा रीतीनें गेल्या पांच महिन्यांत एकामागून एक अशा निरनिराळ्या घटना घडून आल्या आणि जरी कितीही आश्वासनें दिलीं गेलीं तरी साम्राज्यशाही अजुनी जोरांतच असून तिचा शेवट झालेला नाहीं.

आमच्या प्रश्नांच्या मुळाशीं कांहींही असलें तरी ही गोष्ट निश्चित आहे कीं हिंदुस्थानांतही इतरराष्ट्राप्रमाणें अन्तर्गत प्रश्न आहेत. यापैकीं जातीय वाद ही एक अत्यंत महत्वाची बाब आहे. ब्रिटीश सरकार याचें

अस्तित्व नाकारील अशी कल्पना आमची नाहीं व असूंही नये. आमच्यांत जातीय वाद आहे यांत शंका नाहीं; आणि आम्हांला जर प्रगति करावयाची असेल तर आम्ही त्याचा विचार केलाच पाहिजे. त्याकडे दुर्लक्ष्य करून जर आपण कोणतेंही पाऊल टाकलें तर तें चुकीचेंच ठरेल. हा महत्वाचा प्रश्न आहे अशी मान्यता देणें म्हणजे याचा एक शस्त्र म्हणून हिंदी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या विरुद्ध उपयोग करणें हा त्याचा अर्थ नाहीं. ब्रिटिश साम्राज्य शाहीनें याचा नेहमीं याच कारणाकरितां उपयोग केलेला आहे. जर ब्रिटिशांना आपल्या साम्राज्यशाहीच्या मार्गाचा शेवट करून त्यायोगें इतिहासांतील हें काळेकुट्ट प्रकरण येथेंच संपवावें असें वाटत असेल तर या फरकाचीं प्राथमिक लक्षणें स्वाभाविकपणें या जातीय वादाच्या प्रश्नाकडे पाहाण्याच्या दृष्टीकोनावरूनच स्पष्ट होणार आहेत.

या प्रश्नासंबंधीं राष्ट्रसभेची भूमिका कोणती आहे ? राष्ट्रीय सभेचा अगदीं आरंभापासूनचा असा दावा आहे कीं हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे व राष्ट्रीय सभा जें जें पाऊल टाकेल तें तें सर्व राष्ट्राच्या कल्याणाच्या दृष्टीनेंच टाकेल. यामुळें सर्व जगाला राष्ट्रसभेच्या या दाव्याची कसून परीक्षा करतां येण्यासारखी आहे. शिवाय आपलें विधान सत्य आहे हें राष्ट्रसभेनें सिद्ध केलें पाहिजे. मी या प्रश्नाची पुन्हां एकदां या दृष्टीनें छाननी करणार आहे.

**अस्तित्व, महत्त्व व उपाययोजना अशीं हीं तीन अंगें जातीय वादाचीं आहेत.**

राष्ट्रसभेच्या इतिहासाकडे आपण नजर फेकल्यास या प्रश्नाचें अस्तित्व तिनें मान्य केल्याचें आपल्याला स्पष्ट दिसून येईल. त्याचें महत्त्व तिनें कधींही कमी लेखलेलें नाहीं. त्यावेळीं योग्य धोरणाचाच अवलंब राष्ट्रसभेनें या प्रश्नाचा विचार करतांना केला आहे. यापेक्षां अधिक चांगल्या व निराळ्या मार्गाची कल्पना करणें हें काम बरेंच कठीण आहे. जर यापेक्षां चांगला मार्ग जर कोणी सुचविला तर त्याचा स्वीकार करण्यास राष्ट्रसभा नेहमीं उत्सुक होती व आजही आहे.

आमचें राष्ट्रीय ध्येय साध्य करण्याची पहिली अट म्हणून या प्रश्नाचा उपयोग करण्यापेक्षां अधिक महत्व आम्ही त्या प्रश्नाला देऊं शकलों

नाहीं. राष्ट्रीय सभेनें हा विश्वास नेहेमीं बाळगला आहे याबद्दल कोणीही शंका घेऊं शकणार नाहीं. या बाबतींत दोन मूलभूत तत्वें गृहीत धरलीं गेलीं आणि प्रत्येक पाऊल मुद्दाम या दृष्टीनेंच टाकलें गेलें.

( १ ) हिंदुस्थानांत कोणतीही राज्य व्यवस्था आली तरी अल्पसंख्यांकाच्या हक्काच्या व हितसंबंधाच्या रक्षणाची पूर्ण हमी त्यांत असली पाहिजे.

( २ ) आपल्या हक्क व हित रक्षणासाठीं कोणत्या संरक्षक उपायांची योजना झाली पाहिजे हा प्रश्न अल्पसंख्याकांनींच सोडवावा. बहुसंख्याकांनीं हा प्रश्न सोडवूं नये. म्हणून या बाबतींतील निर्णय अल्पसंख्याकांच्या संमतीवर अवलंबून असला पाहिजे. बहुसंख्याकांच्या मतावर नव्हे.

हा अल्पसंख्याकांचा प्रश्न हिंदुस्थानचाच स्वतंत्र प्रश्न आहे असें नव्हे; तर जगांतील दुसऱ्या देशांतही तो होता. आणि या माझ्या व्यासपीठावरून मी जगाला असें विचारण्याचें धाडस करतो कीं या प्रश्नाच्या बाबतींत वर सुचविलेल्या मार्गाखेरीज अधिक न्याय्य व अधिक श्रेयस्कर असा दुसरा कोणता मार्ग अनुसरणें शक्य आहे काय ? जर असेल तर तो कोणता ? काँग्रेसला आपल्या कर्तव्याची जाणीव करून दिली पाहिजे असा कोणत्याही प्रकारचा कमीपणा यांत आहे काय ? कर्तव्यांत झालेल्या कसुरीबद्दल विचार करण्यास राष्ट्रसभा ही केव्हांही तयार होती व आजही आहे. मी गेलीं १९ वर्षें राष्ट्रीय सभेमध्यें आहे. आणि या कालावधींत ज्यामध्यें माझा भाग असण्याचा मान मला मिळालेला नाहीं असा एकही महत्वाचा निर्णय झालेला नाहीं. वर हा प्रश्न सोडविण्याचा जो मार्ग मी दिला आहे त्याहून अन्य मार्गानें सोडविण्याचा विचार राष्ट्रीय सभेनें गेल्या १९ वर्षांत केव्हांही केला नाहीं हें मी खात्रीपूर्वक सांगतो. हा नुसता काँग्रेसचा फक्त निश्चय नव्हता तर विचारपूर्वक दृढ केलेला असा वागणुकीचा मार्ग होता. गेल्या १५ वर्षांत या धोरणाच्या बाबतींत काँग्रेसला अनेक कठिण दिव्यांतून जावें लागलें, परंतु ती पर्वताप्रमाणें अचल राहिली.

काँग्रेसनें या प्रश्नाच्या बाबतींत घटना समितीच्या दृष्टीनें जें धोरण ठेविलें आहे त्यामुळें या दोन मुद्यावर अधिक प्रकाश पडून ते अधिक सुगम होत ओहत. मान्य केलेल्या ज्या अल्पसंख्याक जमाती आहेत त्यांना पसंत वाटल्यास आपले प्रतिनिधि आपल्या मतानें निवडण्याचा अधिकार आहे. त्यांच्या प्रतिनिधींना स्वतः-

शिवाय दुसऱ्याच्या मतावर अवलंबून राहण्याची जरुरी नाहीं. अल्पसंख्याकांच्या हक्क व हितसंरक्षणाचा प्रश्न घटना समितीच्या बहुमतावर अवलंबून राहाणारा नसून तो त्यांच्याच मान्यतेवर अवलंबून राहाणार आहे. जर एकमत होऊं शकलें नाहीं, तर अल्पसंख्याकांना संमत असलेल्या निःपक्षपाती अशा लवादाकडून याचा निर्णय केला जाईल. हा शेवटचा उपाय म्हणजे संभवनीय अशा संकटांतून बाहेर पडण्याचा मार्ग आहे; व त्याची जरूरीही पण लागणार नाहीं. यापेक्षां करण्याला अधिक सोयीस्कर असा मार्ग सुचविला गेला तर त्याला कोणाचाच विरोध असणार नाहीं.

ज्या अर्थी राष्ट्रीय सभेनें हीं तत्वें स्वीकारलीं आहेत व त्याप्रमाणें ती वागत आहे त्या अर्थी वरचेवर आम्हांला या अल्पसंख्याकांच्या प्रश्नाची आठवण करून देऊन हाच प्रश्न हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या आड येतो असें सर्व जगाला वाटेल असें करण्याचे ब्रिटिश मुत्सद्यांना काय कारण आहे ? जर खरोखरच असें असेल तर हिंदुस्थानचें स्वातंत्र्य मान्य करून हा प्रश्न परस्परांच्या संमतीनें सोडविण्याची संधि ब्रि. सरकार आम्हांला कां देत नाहीं ?

**आपसांतील दुहीची लागवड व मशागत आमच्यांत केली गेली व आतां त्याबद्दल आम्हालाच (टोमणे) दोष दिला जात आहे. आपसांतील दुही मिटवा असें एका बाजूनें सांगावयाचें तर दुसऱ्या बाजूनें तशी संधि आम्हांला घेऊं द्यावयाची नाहीं; अशी परिस्थिति आमची खची व्हावी म्हणून मुद्दाम निर्माण केली आहे. अशा तऱ्हेच्या शृंखलांनीं आम्ही बद्ध झालों आहोंत. परंतु कितीही अडचणी अगर प्रतिबंध आले म्हणून आम्ही धैर्यानें कोणत्याही न्याय्य व योग्य मार्ग स्वीकारण्याचें सोडणार नाहीं. आमचा मार्ग संकटांनीं भरलेला आहे. पण आम्ही त्या मार्गानेंच जाऊन त्या संकटावर मात करण्याचा निश्चय केला आहे.**

२

## हिंदुस्थानांतील मुसलमान व हिंदुस्थानचें भवितव्य

आम्ही हिंदुस्थानांतील अल्पसंख्यकांच्या प्रश्नाचा विचार केला. परंतु मुस्लीम लोकांची इतकी लहान संख्या आहे काय कीं त्यांना भवितव्याबद्दल भीति

वाटावी ? छोट्या अल्पसंख्याकांना खरोखर भीति आणि साशंकता असूं शकेल; परंतु मुसलमानांनीं तशा प्रकारच्या आशंकांनीं भेडसावून जावें काय ? २८ वर्षांपूर्वींच्या ' आल हिलाल ' या पत्रांतील माझ्या लिखाणाची तुमच्यापैकीं किती जणांना माहिती आहे याची मला कल्पना नाहीं. जर येथें कोणी तसें असतील तर त्यांना स्मृतीला उजाळा देण्याची मी विनंति करतो. त्यावेळींसुद्धां मी माझें ठाम मत व्यक्त केलें होतें. आजही मी त्याचेंच पुनरुच्चारण करीत आहे. तें मत म्हणजे **हिंदुस्थानच्या राजकारणांत मुस्लीम हे राजकीयदृष्ट्या अल्पसंख्याक आहेत असें म्हणणें यासारखा दुसरा मोठा सत्यापलाप नाहीं.** आणि लोकशाही हिंदुस्थानांतील स्वतःच्या हक्काबद्दल आणि हितसंबंधाबद्दल साशंक राहाणें हें तितकेंच वेडेपणाचें आहे. या मूलग्राही चुकीमुळें पुष्कळसे गैरसमज निर्माण झाले आहेत. चुकीच्या तत्त्वावर चुकीचीं विधानें आधारलीं गेलीं. यामुळें मुसलमानांच्या मनांत एका बाजूनें गोंधळ निर्माण झाला व दुसऱ्या बाजूनें जगांत गैरसमज निर्माण होऊन हिंदुस्थानचें यथातथ्य चित्र योग्य तऱ्हेने दिसेनासें झालें.

जर वेळ असता तर, गेल्या ६० वर्षांत हें अस्वाभाविक व असत्य असें हिंदुस्थानचें चित्र कोणी रेखाटलें हें तुम्हांला स्पष्ट करून सांगितलें असतें. कॉंग्रेसनें राष्ट्रीय चळवळ हिंदुस्थानांत चालू केल्यानंतर ब्रिटीश नोकरशाहीच्या मनांत ' फोडा व राज्य करा ' या तत्त्वाचा जो विशिष्ट प्रादुर्भाव झाला त्याचाच हा परिणाम होय. याचा हेतु नवीन उत्पन्न झालेल्या जागृतीविरुद्ध मुसलमानांना तयार करावें हा होता. यामध्यें दोन मुद्यांना प्राधान्य देण्यांत आले. ( १ ) ज्या अर्थी हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान या दोन जमातींनीं वास्तव्य केलें आहे त्या अर्थी एकराष्ट्र म्हणून कोणतीही मागणी करतां येणार नाहीं. ( २ ) संख्येच्या दृष्टीनें मुसलमान हे हिंदुपेक्षां अल्प असल्यानें हिंदुस्थानांत लोकशाहीच्या तत्त्वावर राज्यकारभार सुरू झाल्यास बहुसंख्य हिंदूंचें राज्य सुरू होऊन मुसलमानांचें अस्तित्वच मुळीं संकटांत आल्याशिवाय राहाणार नाहीं. मी यापेक्षां अधिक विस्तृत विवेचन आतां करीत नाहीं. जर तुम्हाला यासंबंधीं पूर्ण इतिहास पाहिजे असेल तर पूर्वींचे एक व्हॉईसरॉय, लॉर्ड डफरीन, आणि पूर्वींच्या ईशान्य प्रान्ताचे–हल्लींचा संयुक्त प्रान्त–लेफ्टनंट गव्हर्नर सर ऑकलंड कॉल्विन यांच्या कालाकडे आपलें लक्ष्य मी वेधतों.

**अशा रीतीनें दुहीचीं बीजें हिंदुस्थानच्या भूमींत ब्रिटीश साम्राज्यशाहीनें पेरलीं आहेत.** त्यानंतर त्या वृक्षाची वाढ होऊन बराच विस्तार झाला. आज जरी ५० वर्षे होऊन गेलीं असलीं तरी त्याचीं मूळें शिल्लक आहेतच.

राजकीयदृष्ट्या विचार केल्यास अल्पसंख्याक म्हणजे संख्येनें लहान असल्यामुळें विशेष संरक्षणाची जरूरी असणारा वर्ग असा त्याचा अर्थ होत नाहीं. संख्येनें कमी असल्यामुळें व बलिष्ठ असण्याच्या दृष्टीनें जे दुसरे गुण पाहिजेत ते कमी असल्यामुळें सभोंवार पसरलेल्या बहुसंख्य लोकापासून आपले संरक्षण करण्याइतका आत्मविश्वास नसलेला वर्ग असा त्याचा अर्थ आहे. तो वर्ग फक्त संख्येनें लहान असून भागणार नाहीं तर तो इतका अल्प पाहिजे कीं स्वतःच्या हक्क–हितसंबंधाचें संरक्षण करण्यास अक्षम असला पाहिजे. हा फक्त संख्येचा प्रश्न नसून त्यांत दुसऱ्याही पुष्कळशा बाबींचा अन्तर्भाव होतो. एखाद्या देशांत दोन वर्ग असून त्यापैकीं एक दहा लक्ष व दुसरा २० लक्ष असला तर पहिल्यानें दुसऱ्यापेक्षां आपण संख्येनें निम्मे आहोंत म्हणून राजकीयदृष्ट्या स्वतःला अल्पसंख्याक व त्यामुळें असमर्थ समजणेचें कांहींच कारण नाहीं.

**ही जर खरी कसोटी असेल तर ती आपण हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या परिस्थितीला लावून पाहूं या. तुम्ही एका कटाक्षांतच त्यांचा सर्व देशभर झालेला विस्तार पहाल व ते अतिशय ताठरपणानें वागत असतांनासुद्धां स्वतःला दीनवाणे-पणानें अल्पसंख्याक समजतात ही त्यांची दिशाभूल आहे असें तुम्हांला समजून येईल.**

हिंदुस्थानांतील मुसलमानांची संख्या ८ ते ९ कोटी आहे. दुसऱ्या जातींत जे वर्णभेद अगर वंशभेद आढळतात ते त्यांच्यांत नाहींत. इस्लामी बंधुत्वाच्या व समत्त्वाच्या अत्यंत जोरकस अशा बंधनांनीं सामाजिक भेदामुळें उत्पन्न होणाऱ्या कमजोरपणापासून त्यांचें बरेसचें संरक्षण केलें आहे. ते सर्व लोकसंख्येच्या $\frac{1}{4}$ प्रमाणांत आहेत; परंतु प्रश्न लोकसंख्येच्या प्रमाणाचा नसून

त्याच्या मागें असलेल्या मोठ्या संख्येचा व शक्तीचा आहे. अशा तऱ्हेच्या मानव जातीच्या एवढ्या मोठ्या भागास स्वतंत्र लोकशासित हिंदुस्थानांत आपण आपले हक्क व हितसंबंध रक्षण करूं शकणार नाहीं अशी भीति वाटण्याचें कांहीं योग्य कारण आहे काय ?

ही संख्या एकाच भागांत आहे असें नाहीं तर सर्व देशभर असमान अशी पसरलेली आहे. हिंदुस्थानच्या अकरा प्रान्तापैकीं चार प्रान्तांत ते बहुसंख्य असून बाकीच्या धर्मांचे लोक अल्पसंख्य आहेत. जर यांत ब्रिटीश बलुचिस्तान मिळविला तर मुसलमान बहुसंख्य असलेले प्रान्त ५ होतील. जरी आपणाला या प्रश्नाचा विचार धार्मिक गटाच्या दृष्टीनें करावा लागला तरीसुद्धां मुसलमान हें फक्त अल्पसंख्य आहेत असें म्हणतां येणार नाहीं. जरी ते ७ प्रान्तांत अल्पसंख्य असले तरी ५ प्रान्तांत बहुसंख्य आहेत. अशी परिस्थिति असल्यामुळें आपण अल्पसंख्य आहोंत म्हणून त्रस्त होण्याचे त्यांना कांहींच कारण नाहीं.

हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेचा तपशील कांहींही असला तरी ती अखिल हिंदुस्थानची ( Federation ) संयुक्त राज्यघटना असणार व त्यांत समाविष्ट असणाऱ्या प्रत्येक घटकाला अन्तर्गत कारभाराच्या बाबतींत पूर्ण स्वायत्तता राहाणार आहे. या राज्यघटनेच्या मध्यवर्ति सत्तेचा संबंध फक्त हिंदुस्थानच्या सार्वत्रिक प्रश्नापुरताच—परराष्ट्रीय संबंध, संरक्षण, कस्टम्स यासारख्या—राहाणार आहे. अशा परिस्थितींत, ज्या कोणाला लोकशासित राज्य-घटनेची रचना व कार्य माहिती आहे, त्यानें अशा तऱ्हेच्या बहुसंख्याक व अल्पसंख्याकांच्या खोट्या प्रश्नामुळें भांबावून जाणें कितपत योग्य होईल ? हिंदुस्थानच्या भावी चित्रांत अशा तऱ्हेच्या विकृत परिस्थितीला थोडीशीसुद्धां जागा आहे असा विचार एक क्षणभरसुद्धां माझ्या मनांत येत नाहीं. ही भीति उत्पन्न होण्याचें कारण ब्रिटीश मुत्सद्यांच्या आयर्लंडबद्दलच्या उद्गारांत सांगावयाचें म्हणजे आम्ही अजुनी नदीच्या काठावर उभे असून पोहण्याची इच्छा अस-तांनासुद्धां अद्यापि पाण्यांत उतरत नाहीं. याला उपाय एकच आणि तो म्हणजे निर्भय चित्तानें पाण्यांत उडी मारणें हा होय. एकदां कां हा मार्ग स्वीकारला कीं आपली अशी खात्री होईल कीं आपली सर्व भीति निराधार होती.

## हिंदुस्थानच्या मुसलमानापुढील मूलग्राही प्रश्न

मी हिंदी मुसलमान म्हणून प्रारंभीं या प्रश्नाचा विचार केला त्याला आज जवळ जवळ ३० वर्षें झालीं. त्यावेळीं बहुसंख्य मुसलमान लोक राजकीय चळवळीपासून पूर्णपणें अलिप्त राहात होते. आणि १८८८ सालीं त्यांच्या मनावर अलिप्तपणा व विरोध यांचे एक प्रकारचे दडपण पडलें होतें. अशा प्रकारच्या निराशामय वातावरणामुळें या विषयाचा गंभीरपणानें विचार करावयाचें मी टाकून दिलें नाहीं आणि मी याबद्दलचा निर्णय अतिशय जलद ठरवून त्याप्रमाणें दृढ विश्वासानें कृतीला सुरुवात केली. हिंदुस्थान आपल्या सर्व ओझ्यासह आपल्या ध्येयाकडे पुढेंपुढें जात असलेला मी पाहिला. आम्ही एकाच नावेमधून प्रवास करणारे सहप्रवासी आहोंत व पाण्यांतील तिच्या वेगाकडे दुर्लक्ष्य करून भागणार नाहीं. त्यामुळेंच आमच्या भावी कृतीविषयीं स्पष्ट व अंतिम निर्णय करणें आम्हांला भाग पडलें. आम्ही हें कसें करावयास पाहिजे होतें ? फक्त वरवर चांचपडून नव्हे, तर अगदीं खोल मुळाशीं जाऊन आमच्या परिस्थितीचा विचार करून हें कार्य करावयाचें होतें. मी असें केल्यानंतर मला असें आढळून आलें कीं हा प्रश्न एका प्रश्नाच्या उत्तरावरच सर्वस्वी अवलंबून आहे. आम्ही हिंदवासीय मुसलमान भावी स्वतंत्र हिंदुस्थानाकडे आशंका व संशययुक्त नजरेनें पाहातों कीं धैर्यानें व आत्मविश्वासानें पाहातो ? हाच तो प्रश्न होय. जर आम्ही आशंका व संशय यांनीं ग्रस्त झालों असूं तर आमचा मार्ग खात्रीनें भिन्न आहे. हल्लींचे कोणतेही जाहीरनामे, भवितव्यासंबंधींचीं कोणतींही वचनें, किंवा घटनेतील कोणतींही संरक्षक कलमें यामुळें आमचें संशय व भीति नाहींशी होणार नाहीं. मग आम्हांला तिसरी एक सत्ता सहन करावी लागेल. ही तिसरी सत्ता यापूर्वींच येथें दृढमूल झाली असून तिची निघून जाण्याची खुषी नसल्यामुळें जोपर्यंत आपण भीतिग्रस्त आहोंत तोपर्यंत ती कायम राहाणार हें आपण गृहीत धरलें पाहिजे. परंतु जर आपणाला भीति अगर संशय असण्याचें कारण नाहीं अशी आपली खात्री झाली व आपण भविष्यकालाकडे आत्मविश्वास व दृढनिश्चयानें पाहूं लागलों तर आपला मार्ग अगदीं सुस्पष्ट आहे. आणि ज्या ठिकाणीं शंका, आंदोलनें, स्तब्धता व विरोध यांच्या कृष्ण छाया नसून श्रद्धा, निश्चय, उद्योग आणि

आशा यांचें चिरंतन वास्तव्य आहे अशा नूतन जगामध्यें आम्ही वावरूं लागूं, कालाचा गोंधळ, आमच्या मार्गातील चढउतार, आणि आमचा मार्ग कांटेरी करणाऱ्या अडचणी यांपैकीं कशानेंही आमचा मार्ग बदलणार नाहीं. म्हणून हिंदवासीयांच्या राष्ट्रीय ध्येयाकडे चिकाटीनें व धैर्यानें जाणें हें आमचें कर्तव्य ठरतें.

मी हा निश्चय करतांना मला यत्किंचत्‌ही आशंका वाटली नाहीं. आणि माझ्या जीवनाचा प्रत्येक धागा न् धागा पहिल्या मार्गाविरुद्ध बंड करून उठला. त्यानें आपल्या नसांनसांतील इस्लामी तत्त्व झुगारून दिल्याशिवाय कोणाही मुसलमानाला हें सहन होईल असें मला कधींही वाटलें नाहीं.

मी १९१२ मध्यें ‘ आल् हिलाल ’ सुरूं केले व माझा हा निर्णय मी हिंदवासीय मुसलमानापुढें मांडला. माझें अट्टाहासानें सांगणें अगदींच व्यर्थ गेलें नाहीं याची तुम्हांला आठवण करून देण्याची जरूरी नाहीं. १९१२ ते १९१८ चा काल मुसलमानामधील नवीन जागृतीचा दर्शक आहे. १९२० च्या शेवटीं ज्यावेळीं मी चार वर्षांच्या कारावासांतून बाहेर आलों त्यावेळीं मुसल-मानांच्या ध्येयवादित्वाला पूर्वीच्याहून निराळें वळण लागत असल्याचें मला आढळून आलें. त्यानंतर २० वर्षें गेलीं असून पुष्कळ निरनिराळ्या गोष्टी घडून आल्या आहेत. निरनिराळ्या घटनांना जोराची भरती येऊन विचारांच्या नवनवीन लाटांनीं आम्हीं वेढलों गेलों. परंतु मुसलमानांच्या मनांतील सामान्य विचार आतां मागें परतण्याच्या विरुद्ध आहेत ही गोष्ट मात्र आहे तशीच राहिली.

तें निश्चित आहे; ते आल्या मार्गावरून परत जाण्यास तयार नाहींत. परंतु त्यांच्या मनांत आपल्या मार्गाबद्दल मात्र दाट संशय आहेत. मी याच्या कारणांचा विचार करणार नसून फक्त परिणामाकडे लक्ष्य देणार आहे. मी माझ्या धर्मबंधूंना हें सांगूं इच्छितो कीं १९१२ सालीं मी या विषयावर जीं मतें प्रतिपादन केलीं तींच मतें आज माझीं आहेत. त्यावेळेपासून घडलेल्या असंख्य घटनांचा विचार मी केलेला आहे; माझ्या डोळ्यांनीं त्या निरीक्षण केल्या व मनानें त्यावर विचार केला. या सर्व गोष्टी फक्त माझ्याजवळून गेल्या असें नसून मी त्यांच्यामधील एक भागीदार होतो व त्यामुळें प्रत्येक घटनेचा मी अतिशय काळजीपूर्वक अभ्यास केला आहे. जें मी स्वतः पाहिलें व निरीक्षिलें

आहे त्याच्याशीं मी खोटा होऊं शकत नाहीं. किंवा माझ्या स्वतःच्या ठाम समजुतींना मी विरोधही करूं शकत नाहीं. माझ्या सद्सद्विवेक बुद्धीच्या आवाजाला मी कमजोर करूं शकत नाहीं. १९१२ सालीं मी जो कृतीचा मार्ग ९ कोटी हिंदी मुस्लीमांना सांगितला त्याशिवाय दुसरा मार्ग त्यांना नाहीं ही गोष्ट आजपर्यंत मी सांगत आलों व आजही तीच सांगत आहे.

१९१२ सालीं जे माझे धर्मबंधु माझ्याशीं सहमत होते त्यापैकीं कांहीं आज माझ्याशीं सहमत नाहींत. मी त्यांना दोष देऊं इच्छित नाहीं; परंतु त्यांच्या सच्चेपणाला व जबाबदारीच्या भावनेला जागृत करूं इच्छितो. आम्ही देशाच्या व राष्ट्रांच्या भवितव्याचा विचार करीत आहोंत. जर आम्ही क्षणिक विकारांनीं भडकून जाऊं लागलों तर आम्हांला कोणत्याही प्रकारचे यथायोग्य निर्णय करतां येणार नाहींत. आमचे निर्णय जीवनांतील भरींव सत्यावर आधारले पाहिजेत. आज आकाश व्याप्त असून एकंदर देखावा कृष्णवर्णीय आहे ही गोष्ट खरी आहे. मुसलमानांना सत्याच्या उजेडांत यावयाचें आहे. आज त्यांनीं या विषयाच्या प्रत्येक बाजूचा पुन्हां एकवार विचार केला तर त्यांना या शिवाय दुसरा मार्ग मोकळा नाहीं असें आढळून येईल.

## मुसलमान व संयुक्त राष्ट्र

मी मुसलमान आहे व या गोष्टीचा मला अभिमान वाटतो. इस्लामची १३०० वर्षांची परंपरा हें माझें परंपरागत धन आहे. यापैकीं लहानसाही भाग घालविण्यास मी तयार नाहीं. इस्लामची शिकवण व इतिहास, कला, विद्या, व संस्कृति हें माझें धन व संपत्ति आहे.

मुसल्मान या नात्यानें इस्लामी धर्म व संस्कृति याबद्दल मला विशेष प्रेम वाटतें आणि त्यामध्यें कोणाचीही लुडबूड मला सहन होत नाहीं. परंतु या भावनांशिवाय माझ्या जीवनांतील सत्य व परिस्थिति यांनीं उत्पन्न केलेल्या अशा दुसऱ्याही कांहीं भावना माझ्या मनांत आहेत. इस्लामी तत्व या भावनांच्या विरुद्ध येत नाहीं; परंतु तें मला मार्गदर्शकच होतें. मी हिंदी असल्याबद्दलही मला अभिमान वाटतो. हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ही अविभाज्य एकी असून तिचाही मी एक घटक आहे. मी त्या भव्य इमारतीचा एक जरूर असा भाग

असून माझ्याशिवाय ती अपुरी राहील. हिंदुस्थानच्या घटनेमध्यें मी एक जरुरीचा भाग आहे. मी हा माझा हक्क केव्हांही सोडणार नाहीं.

पुष्कळ मानवीवंश व संस्कृति व धर्म यांनीं इकडे यावें व हिंदुस्थानच्या आतिथ्यशील भूमीवर घर उभारावें, आणि पुष्कळशा प्रवाशांनीं येथें आसरा घ्यावा असें हिंदुस्थानचें ऐतिहासिक दैव ( **पार्श्वभूमि** ) आहे. इतिहासाच्या पूर्वी हे प्रवासी येथें आले व नवीन प्रवाशांच्या लाटावर लाटा येऊं लागल्या या प्रचंड सुपीक देशानें सर्वांचें आतिथ्य करून त्यांना आपल्या हृदयाशीं धरलें. यांतील शेवटचे प्रवासी म्हणजे इस्लामचे अनुयायी होत. हे लोक येथें आले व त्यांनीं बऱ्याकरितांच येथें वास्तव्य केलें. यामुळें दोन निरनिराळ्या वंशाचे संस्कृति प्रवाह एकत्र मिळाले. गंगा आणि यमुना यांच्याप्रमाणें कांहीं काल ते प्रवाह भिन्नपणें वाहूं लागले; परंतु निसर्गाच्या अबाधित नियमाप्रमाणें ते एकत्र येऊन त्यांचा संगम बनला. हा काल इतिहासांतील अविस्मरणीय काल आहे. त्यावेळेपासून भवितव्यानें जुन्याच्या ठिकाणीं नवीन हिंदुस्थानची रचना गुप्तपणानें चालू केली. आम्ही आमची संपत्ति बरोबर आणली व हिंदुस्थानचा अमूल्य असा ठेवा त्यांच्याजवळ होताच. आम्ही आमची संपत्ति हिंदुस्थानला दिली व हिंदुस्थाननेंही आपल्या तिजोरीचें दरवाजे आमच्याकरितां खुले केले. आम्ही तिला इस्लामची अमूल्य देणगी–जी हिंदुस्थानला अतिशय जरुरीची होती—लोकशाही व मानवी समतेचा संदेश दिला.

११ पूर्ण शतकें गेलीं; आणि आतां हिंदुस्थानवर हिंदूंचा जितका हक्क आहे तितकाच इस्लामचाही पण आहे. येथील लोकाचा हिंदुधर्म हा जर हजारों वर्षांचा धर्म असेल तर मुसलमानांचाही इस्लाम हा हजारों वर्षांचा धर्म आहे. एखाद्या हिंदु जितक्या अभिमानानें मी हिंदी असून हिंदुधर्म पाळतो असें सांगूं शकतो, तितक्याच अभिमानानें आम्हीसुद्धां हिंदी असून इस्लामधर्म पाळतों असें सांगूं शकतो. मी हें क्षेत्र आणखी थोडें वाढवूं इच्छितों. हिंदी ख्रिस्तीसुद्धां तितक्याच अभिमानानें म्हणूं शकेल कीं मी हिंदी असून हिंदुस्थानचा ख्रिश्चन धर्म पाळतो.

११ शतकाच्या समाईक इतिहासानें हिंदुस्थानच्या ठेव्यांत आमच्या समाईक प्राप्तीची भर टाकली आहे. आमच्या भाषा, काव्य, वाङ्मय, संस्कृति

कला, पोषाख, चालीरीति, रूढी, रोजच्या जीवनांतील असंख्य घडामोडी यापैकीं प्रत्येकावर समाईक प्रयत्नाचा ठसा उमटलेला आहे. ज्यावर हा ठसा उमटलेला नाहीं असा आमच्या जीवनाचा एकही भाग नाहीं. आमच्या भाषा भिन्न होत्या परंतु आम्ही एकच समान भाषा वापरण्यास सुरुवात केली; आमच्या चालीरीति व रूढी समान नव्हत्या, परंतु त्यांचा एकमेकांवर परिणाम होऊन एक नवीनच संघ निर्माण झाला. जुन्या काळाच्या दर्शक अशा जुन्या चित्रामधूनच आमचे पूर्वींचे पोषाक दिसतील. आज तसे पोषाख कोणीही वापरीत नाहींत. ही समाईक संपत्ति म्हणजे आमच्या समान राष्ट्रीयत्वाची वडिलोपार्जित संपत्ति आहे; ती सोडून देऊन ज्यावेळीं एकत्र जीवन अद्यापि सुरू झाले नव्हते अशा कालाकडे परत जाण्याची आमची इच्छा नाहीं. जर आमच्यामध्यें असें कोणी हिंदु असतील कीं त्यांना १००० वर्षांपूर्वींचा हिंदूंचा जीवनक्रम पुन्हां परत आणावा अशी इच्छा असेल तर ती त्यांचीं वेडेपणाचीं स्वप्नें समजलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें आपण हजार वर्षांपूर्वीं इराण किंवा मध्य आशियामधून आल्यावेळीं जी जुनी संस्कृति आणली तीच पुनरुज्जीवित करण्याची इच्छा करणारे कोणी मुसलमान असतील तर तेही स्वप्नांतच आहेत; व यांतून लौकरच ते जागे होतील. ह्या भ्रामक कल्पना या जगाच्या सत्यभूमींत मूळ धरूं शकणार नाहींत. पुनरुज्जीवन धर्माच्या बाबतींत जरूर पाहिजे, परंतु सामाजिक बाबतींत तें परागतीलाच कारण होईल असें मानणाऱ्या लोकांपैकीं मी एक आहे.

या हजार वर्षांच्या आमच्या ऐकात्रिक जीवनामुळें आमच्यामध्यें एक-राष्ट्रीयत्व निर्माण झालें आहे. हें कृत्रिम रीतीनें नष्ट करतां येणार नाहीं. शतकांच्या कालावधींत आपल्या गुप्त अशा मार्गांनीं आपलें घडविण्याचें कार्य निसर्ग करीत असतो. आतां ही वस्तु घडवून तयार झाली असून भवितव्यतेनें आपली मुद्रा त्यावर केली आहे. आम्हाला आवडो अगर नावडो आम्ही आतां अखंड आणि अविभाज्य अशा हिंदी राष्ट्राचे घटक बनलों आहोंत. आणि कोणत्याही वेडेपणानें अगर फुटून निघण्याच्या कोणत्याही कृत्रिम उपायांनीं ती एकी भंग पावणार नाहीं. आम्हांला वस्तुस्थिति व इतिहास यांचा स्वीकार करून आपलें भवितव्य ठरविण्याच्या उद्योगाला लागलें पाहिजे.

# ३ पं. जवाहरलाल नेहरू

## अखंड हिंदुस्थान

**ज्यांचें कधींही एकमत होणार नाहीं अशा निरनिराळ्या प्रसिद्ध वा अप्रसिद्ध संस्थांतून प्रतिनिधी निवडले जातात, प्रतिगामी लोकांचें बहुमत केलें जातें आणि मग सर्व जगभर असा डांगोरा पिटला जातो कीं हिंदी लोक नालायख आहेत; त्यांचें आपसांत पटत नाहीं, त्यांचें मतैक्य होत नाहीं. ( हिंदुस्थानांतील १८ महिने पा. २०८ )**

हिंदुस्थान हें एकराष्ट्र म्हणून राहूं शकेल असा माझा विश्वास आहे; इतकेंच नव्हे तर **जरी वरवर फरक दिसले तरी मूलतः सांस्कृतिक दृष्ट्या हिंदुस्थान अविभाज्य आहे.** ( आधुनिक निबंध व लेख पृ. ६५ )

पाश्चिमात्य दृष्टीनें हिंदुस्थानकडे वरवर पाहणाऱ्या लोकांवर हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संस्था व त्यांतील फरक ह्यांचा फार परिणाम होतो. **आज हजारों वर्षे हिंदुस्थान अखंड राहिला आहे ह्या गोष्टीकडे त्यांचें दुर्लक्ष होतें.** हिंदुस्थानचा इतिहास हजारों वर्षांचा आहे व चीन सोडून दुसऱ्या कोणत्याहि आधुनिक राष्ट्राला, एवढी अखंड अशी सांस्कृतिक पार्श्वभूमि नाहीं.

महासागराला ज्याप्रमाणें अनेक नद्या मिळतात त्याप्रमाणें हिंदुस्थानला अनेक संस्कृति येऊन मिळाल्या; कांहीं वेळ जरी त्यांवर वादळें उत्पन्न झालीं तरी शेवटीं महासागराप्रमाणें हिंदुस्थाननें ह्या सर्व सामावून घेतल्या. हिंदुस्थाननें इतक्या संस्कृति कशा आत्मसात् केल्या हें एक आश्चर्यच आहे. **एकीची**

**भावना खोलवर रुजल्याशिवाय व वदलत्या कालाप्रमाणें स्वतः-मध्यें बदल करण्याची तयारी असल्याशिवाय ही गोष्ट शक्य होणार नाहीं.** ( युनिटी ऑफ इंडिया पृ. १४ )

" Oxford History of India " ह्या पुस्तकांत व्हिन्सेंट स्मिथ म्हणतात " एकछत्री अंमलानें किंवा भौगोलिक परिस्थितीनें होणाऱ्या एकीपेक्षां जास्त बळकट अशी एकी हिंदुस्थानांत आहे. रक्त, वर्ण, भाषा, पोषाख, चालीरीति ह्यांतील भेद यांचा तिजवर कांहींहि परिणाम झालेला नाहीं व ती अभेद्यच राहिली आहे. सर फ्रेडरीक व्हाईट यांनीं आपल्या " The future of East and West " या पुस्तकामध्येंहि हीच गोष्ट विशद केली आहे. ( युनिटी ऑफ इंडिया पृ. १४ )

**ही एकी नाकारणारी अशी एकहि जबाबदार व्यक्ति मला माहीत नाहीं.** आमच्या राजकीय मतप्रणालींत ही गोष्ट मुख्य आहे, आणि आम्ही जें जें करतों तें ह्या ध्येयानें प्रेरित होऊनच करतों. त्या एकीचें स्वरूप फेडरेशनचें असेल, पण तें फेडरेशन म्हणजे १९३५ च्या इंडिया अॅक्टचें फेडरेशन नव्हे; किंवा एकाच जोखडाखालील गुलामगिरीचेंही नव्हे.

हल्लींच्या परिस्थितीमुळें कांहीं वेळ दुही माजेल व कदाचित् निरनिराळे विभागहि पडतील; पण ही गोष्ट होईल असें मला वाटत नाहीं. देशांतील प्रवाह एकीच्या बाजूनेंच जोरानेंच वहात आहेत.

## एकी व इतर गोष्टी

**एकी ही फार उत्तम गोष्ट आहे. पण गुलामगिरींतून एकी ही कांहीं भूषणास्पद होणार नाहीं.** जुलमी सरकारचें सामर्थ्य हेंच लोकांना फार मोठें ओझें होईल; ज्यानें लोकांचें संरक्षण करावयाचें असतें तोच पोलीस फोर्स लोकाविरुद्ध उलटलेला आपल्याला नेहमीं दिसतो. जुन्या ग्रीक संस्कृतीशीं आधुनिक संस्कृतीची तुलना करीत असतांना बर्टान्ड् रसेल म्हणतो, ग्रीक संस्कृतीचें खरें श्रेष्ठत्व जर कशांत असेल तर पोलीसांच्या सैलपणांत आहे. त्यामुळें पुष्कळशा चांगल्या लोकांना सुटणें शक्य झालें."

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें मोल देऊन एकी विकत घेऊन चालणार नाहीं. परकीय सत्तेखालील गुलामांची एकी आम्हांला नको आहे. आम्हांला

अखंड हिंदुस्थान हवा, पण तो अखंड व स्वतंत्र असा हवा. आणि आपल्यास काय हवें तेंच मिळेल यांत यत्‌किंचितहि शंका नाहीं.

खरी दुही जातीयवादामुळें माजते, आणि कांहीं मोठ्या जातीय संस्थांनीं एकीला विरोधक असें ध्येय पुढें ठेविलें आहे. हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. पण ह्याचा फारसा परिणाम झाला आहे असें मला वाटत नाहीं, व जातीयवादाचें वादळ शांत झाल्यावर सर्व कांहीं स्थिरस्थावर होईल.

## एकीच्या दहा बाजू

( १ ) मी केलेल्या प्रवासांत मला एक गोष्ट प्रामुख्यानें दिसली. हिंदुस्थान व हिंदी लोकांचें यथार्थ ज्ञान व्हावें म्हणून केलेली ती एक तीर्थयात्रा होती. **माझ्या ह्या देशांतील निरनिराळीं दृश्यें मीं पाहिलीं. त्यांतील फरक मी पाहिले; पण ह्या सर्वांखालीं असलेल्या एकीचा माझ्यावर फार परिणाम झाला.** माझ्याकडे मित्रत्वाच्या दृष्टीनें पहात असलेल्या त्या असंख्य डोळ्यांमागें काय आहे तें समजून घेण्याचा मी प्रयत्न केला.

**हिंदुस्थानांत बहुतेक सर्व महत्त्वाचीं खनिज द्रव्यें सांपडतात व त्यायोगानें तो देश स्वयंपूर्ण व बलशाही होईल.** त्याचे जर तुकडे पाडले तर आर्थिक दृष्ट्या ती फार शोचनीय गोष्ट ठरेल. त्यामुळें असलेली आर्थिक एकी नाहींशी होऊन प्रत्येक भाग दुर्बल होईल.

आपण आपल्या मतभेदांना अवास्तव महत्त्व देतों. **पण आपल्या स्वातंत्र्याच्या राजकीय लढ्यापाठीमागें एकी आहे हें विसरतां उपयोगी नाहीं, आणि आपले मतभेद व स्वातंत्र्यप्रत जाण्याच्या मार्गांतील भिन्नता ह्यांचा तीवर कांहीं परिणाम होत नाहीं.** लढ्याचे वेळीं ह्या एकीचा खरा प्रत्यय येतोच, पण एरव्हींहि ती उघड दिसणारी गोष्ट आहे. आपले वादविवाद हे एकीला मारक होत नाहींत. कारण ते तीवरच आधारलेले असतात. आणि हें साहजिकच आहे, कारण स्वातंत्र्य व साम्राज्यशाहीचा विरोध हीं बहुजनसमाजाचीं ध्येयें आहेत.

हिंदुस्थानांत राजकीय एकीचा पाया ब्रिटिशांनींच घातला. वाहतूक व दळणवळणानें ही गोष्ट सहज साध्य झाली. गुलामगिरीमुळें जरी ह्या एकीचा

जन्म झाला तरी त्यामुळें एकराष्ट्रीयत्त्वाची भावना जोपासली गेली. स्वतंत्र व संघटित हिंदुस्थानच्या ध्येयानें लोकांच्या मनाची पकड घेतली; ही कांहीं वरवर उत्पन्न झालेली व वरून लादलेली कल्पना नसून हजारों वर्षांपासून चालत आलेल्या एकीचा तो नैसर्गिक परिपाक होता.

**हिंदु व मुसलमान हे निरनिराळ्या वंशांचे नाहींत. ते निरनिराळ्या वंशांच्या सरमिसळीनें झालेल्या एकाच वंशाचे आहेत.** म्हणून जरी वंश निराळे असतील तरी त्यांच्या मिश्रणानें सांस्कृतिक व वांशिक असा स्वतंत्र गट तयार होतो.

हिंदुस्थानांतील विविध भाषा हा टीकाकारांचा फार आवडता विषय आहे. पण त्यांपैकीं पुष्कळांना त्यांतील एकाहि भाषेची माहिती नसते. भाषेच्या दृष्टीनें हिंदुस्थानांत बरीच एकसूत्रता आहे; सार्वत्रिक शिक्षणाच्या अभावामुळेंच निरनिराळ्या पोटभाषा जन्माला आल्या. बारीकसारीक भागाखेरीज हिंदुस्थानच्या सर्व प्रमुख भागांत १० निरनिराळ्या भाषा चालू आहेत ह्या सर्व भाषा हिंदी, आर्य व द्रविड ह्या दोन समूहांपैकीं आहेत, व ह्या दोन्हींसहि संस्कृतची पार्श्वभूमि आहे. हिंदी, आर्य भाषेपैकीं हिंदी भाषा—तिच्या कांहीं पोटभाषासह—ही अदमासें १२ कोट लोकांना अवगत आहे, व ती सध्यां पसरत आहे. मराठी, गुजराथी व बंगाली ह्या इतर हिंदी आर्य भाषा हिंदीशीं फार जवळच्या नात्यानें संबद्ध आहेत. **हिंदुस्थानच्या एकीकरितां इतर प्रश्नांना आपणांस तोंड द्यावें लागेल, पण भाषेच्या प्रश्नाचा अडथळा हा कांहीं मोठा महत्त्वाचा प्रश्न होऊं शकणार नाहीं.**

**सांस्कृतीक दृष्ट्या हिंदुस्थान हा एकत्र राहिला, इतकेंच नव्हे तर सर्व लोकांची वैचारिक पार्श्वभूमिहि एकच होती.**

शंकराचार्यांनीं तीर्थयात्रेच्या मुक्रर केलेल्या जागा हिंदुस्थानच्या चार कोपऱ्यांत वसलेल्या आहेत. उत्तरेकडे बर्फानें आच्छादिलेला बद्रीनाथ अगदीं दक्षिणेला कन्याकुमारीजवळ रामेश्वर, पश्चिमेला अरबी समुद्रावर जणू काय पाळत ठेवणारी श्रीकृष्णाची द्वारका आणि पूर्वेला बंगालच्या उपसागराच्या लाटांनीं धुतली जाणारी जगन्नाथपुरी. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रदेशांत दळणवळण सारखें सुरू होतें. व त्या सर्वांच्या दृष्टीनें सर्व हिंदुस्थान ही त्यांची पवित्रभूमि होती.

हिंदुस्थानच्या धार्मिक दृष्टिकोनाची व युरोपच्या मध्ययुगांतील धार्मिक दृष्टिकोनाची नेहमीं तुलना केली जाते. हिंदुस्थानचा धार्मिक दृष्टिकोन व मध्ययुगांतील युरोपचा दृष्टिकोन ह्यांच्यांत बरेंच साम्य आहे, हें मान्य केलें पाहिजे. पण ही तुलना फार खोलवर जाऊं शकत नाहीं. धार्मिक दुहीमुळें युरोपची भूमि रक्तांत भिजून निघाली, पण हिंदुस्थानच्या दीर्घ इतिहासांत ह्या तऱ्हेचें एकहि उदाहरण सांपडणार नाहीं. **परधर्मसहिष्णुता हें हिंदु-धर्माचें व हिंदु संस्कृतीचें एक वैशिष्ट्य आहे.** इस्लामच्या आगमनानें विरोधाला सुरवात झाली, पण हा लढा बऱ्हंशीं राजकीय स्वरुपाचा होता. मात्र त्याला वरवर धार्मिक स्वरुप दिलें गेलें. जित आणि जेते ह्यांमधला तो लढा होता. हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर धार्मिक लढा झाला हें अलीकडे होत असलेल्या घटना होऊनहि अजून मला पटत नाहीं.

हिंदुस्थानच्या हजारों वर्षांच्या इतिहासाची ही पार्श्वभूमि आहे. हिंदुस्थानचें अखंडत्व, तिची परधर्मसहिष्णुता व तिची अन्य संस्कृति सामावून घेण्याची प्रथा या पार्श्वभूमीमुळें स्पष्ट होतें. ह्या शक्तीमुळेंच हिंदुस्थानच्या धर्माची व कलेची छाप अतिपूर्वेकडील देशांवर पडली. मलाया, जावा, सुमात्रा, फिलिफाईन बेटें व बोर्निओ येथें वसाहती झाल्या. ह्याची साक्ष त्या देशांतील उंच उंच पर्वत आज जगाला देत आहेत.

मानवी मनाची व त्याच्या भोवतालच्या परिस्थितीची सांगड घालण्याचा हेतु ह्या सांस्कृतिक एकीच्या मागें होता.

ह्यावरून उघड दिसून येईल कीं, हिंदुस्थानच्या एकीमागें फार मोठी शक्ति उभी आहे व ह्याला कोणीहि विरोध करूं शकणार नाहीं. कांहीं मोठे संस्थानिक ह्या एकीला विरोध करतील, पण त्यांचें बळ हें त्यांचें स्वतःचें नसून त्यांना असलेल्या ब्रिटीश पाठिंब्याचें आहे हें विसरतां उपयोगी नाहीं. हा पाठिंबा जाईल त्यावेळीं त्यांना आपल्या प्रजेच्या मागणीपुढें मान लववावी लागेल.

## जातीयवाद व अल्पसंख्याकांचा प्रश्न

**प्रामाणिक जातीयवाद हें भीतीचें द्योतक आहे, खोटा जातीयवाद हें राजकीय प्रतिगामी तत्त्व आहे.**

**राजसत्तेकडून फायदे मिळविण्याकरितां जातीय वादाचा उपयोग केला जातो.** जातीयवादी हा परकी सत्ता कायम टिकणार आहे असेंच गृहीत धरतो व तिच्यापासून आपल्या विशिष्ट कंपूकरितां फायदे व सवलती मिळविण्याचा प्रयत्न करतो. **परकी सत्ता संपुष्टांत आल्या-बरोबर जातीयवाद आपोआप कोलमडून पडेल,** साम्राज्यशाही व जातीयवादी– हे नेहमीं वरिष्ठ भांडवलदार वर्गाचे हित पहाणारे असतात– हे दोघेही आपले आर्थिक हितसंबंध कायम टिकविण्या-करितां धडपडत असतात, दोघानांही राजकीय व आर्थिक व्यवस्थेंत बदल नको असतो. म्हणून दोघानांहि हल्लीचे आर्थिक प्रश्न सोडविणें अशक्य आहे, कारण हे प्रश्न सुटले तर त्याबरोबरच त्यांचे हितसंबंधहि नष्ट होणार आहेत. ह्याचा परिणाम त्या दोघांच्याहि दृष्टीनें घातुक होणार आहे. परिस्थिति व आर्थिक प्रवाह हे साम्राज्यशाहीपेक्षां जास्त प्रखर व बलवान आहेत, आणि त्याकडे दुर्लक्ष करणें हें स्वतःच्या नाशासच कारणीभूत होणार आहे.

**हल्लींचा जातीय वाद हा वरिष्ठ वर्गांनीं, आमच्या राजकीय हेतूकरितां उत्पन्न केलेला आहे, त्याचा धर्माशीं, वंशाशीं, संस्कृ-तीशीं किंवा बहुजनसमाजाशीं कांहींहि संबंध नाहीं.**

वरिष्ठ वर्गातील लोक जातीयतेचें पांघरून घेऊन स्वतःच्या स्वार्थाकरितां आपल्या मागण्या, ह्या आपल्या जमातीकरितां आहेत असा घोष करतात.

**बहुजन समाजाच्या मताचा कौल लावला तर जातीय मागण्यांचा डोलारा कोलमडून पडेल अशी माझी खात्री आहे.**

**जातीयवादाची मला स्वतःला कितीहि चीड असली तरी, जबरदस्तीनें हा प्रश्न सुटणार नाहीं हें मला कबूल केलें पाहिजे. एकमेकाबद्दल वाटणारी भीति नाहींशी करून खऱ्या प्रश्नांकडे लोकांचें लक्ष वेधणें हाच ह्यावर उपाय आहे.** म्हणून आपण मुस्लिम

जनतेला असें आश्वासन दिलें पाहिजे कीं त्यांना हवें तें संरक्षण देण्यांत येईल. असें आश्वासन जातीयवादांतील कडवटपणा बऱ्याच अंशी कमी करील.

जातीयवादाभोवतीं उभा केलेला आभासांचा पोकळ डोलारा जमीनदोस्त करून, जनतेला त्यांच्यापुढील खऱ्या प्रश्नांची जाणीव करून देणें हाच ह्यावर खरा उपाय आहे अशी माझी खात्री आहे.

लोकशाही, स्वातंत्र्य व एकी ह्यांच्या चौकटींत पाहिजे तितकें संरक्षण अल्पसंख्याकांना, जातीय हक्कांनीं देण्यांत येईल असें कॉंग्रेसनें जाहीर केलें आहे. पण लोकशाही व स्वातंत्र्य ह्यांचे शत्रू व राजकीय दृष्ट्या प्रतिगामी लोकांच्या मागण्यांचा विचार कॉंग्रेस केव्हांहि करणार नाहीं. हे प्रतिगामी संघ, जातीयवादी व संस्थानिक आतां एक होऊन साम्राज्यशाहीच्या साहाय्यानें लोकशाही व स्वातंत्र्य ह्यांना विरोध करीत आहेत.

घटनासमितीवर मुसलमान जनतेनें निवडलेल्या मुस्लिम प्रतिनिधींनीं जर कांहीं जातीय मागण्या पुढें मांडल्या तर त्यांना मी पाठिंबा देईन.

जर मुसलमान राजकीय स्वातंत्र्याच्या मागणीला संपूर्ण पाठिंबा देण्यास तयार असतील, तर त्यांच्या कोणत्याहि मागण्या—मग त्या कितीहि भरमसाट असोत—मान्य करण्याचें कबूल करून महात्मा गांधी माझ्याहि पुढें गेले आहेत.

**गांधीजींचें हें म्हणणें व अट मान्य केली गेली नाहीं यावरून असें उघड दिसून आलें कीं स्वातंत्र्याच्या मार्गांत जातीयवाद येत असून राजकीय प्रतिगामी धोरणच विरोध करीत आहे.**

**हिंदुस्थानातील अल्पसंख्याकांचा प्रश्न परकीय सत्तेशीं निगडित आहे.** परकीय सत्ता दूर झाल्याबरोबर ह्या प्रश्नाचें स्वरूपच पूर्णपणें बदलेल. परकीय सत्ता दूर करण्याचे प्रयत्न सध्यां चालू आहेत व ती दूर झाल्यावरच हा प्रश्न सुटण्याची आशा आहे.

अल्पसंख्याकांच्या संस्कृतीचें व चाली रीतींचें संरक्षण करूं अशी ग्वाही आपण शब्दांनीं व कृतींनीं, दिली पाहिजे.

साम्राज्यशाहीचा खरा उद्देश ब्रिटनचे आर्थिक हितसंबंध कायम राखणें हा आहे. तिला अल्पसंख्यांक किंवा संस्थानिक ह्यांचेबद्दल कांहींच

३६५५१

आस्था नाहीं, फक्त त्यांचा उपयोग आपल्या फायद्याकरितां करून घ्याव-याचा हाच तिचा मुख्य डाव असतो. हिंदुस्थानांतील तीव्र असंतोषाच्या धगीनें बावरलेल्या साम्राज्यशाहीनें, व्हाईसरॉयच्या कौन्सिलांत लोकप्रतिनिधींना जास्त जागा देऊं केल्या; मात्र ते प्रतिनिधी नेमावयाचे व्हाईसरॉयनें. हा मोठ्या जागेची लालूच दाखवून कांहीं प्रसिद्ध पुढाऱ्यांना विकत घेण्याचा डाव होता. हिंदुस्थानच्या खऱ्या मागणीकडे दुर्लक्ष करून, हिंदी स्वातंत्र्याची घोषणा टाळण्याची ही योजना होती. मूर्खपणानें कॉंग्रेस जर ह्या आमिषाला बळी पडली असती तर वैयक्तिक स्वार्थाकरितां कॉंग्रेसनें लोकांना दगा दिला असें म्हणतां आलें असतें. पण कॉंग्रेसनें ही गोष्ट नाकारली. म्हणून साम्राज्यशाहीनें नवा डाव रचला. जातीयवादाला अवास्तव महत्त्व देऊन लोकांचें राजकीय प्रश्नावरील लक्ष उडविलें. वास्तविक युद्धामुळें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा व हिंदी जनतेच्या घटना ठरविण्याच्या हक्काचाच प्रश्न महत्त्वाचा होता. जातीय-वादाचा ह्याच्याशीं कांहींहि संबंध नव्हता; **पण ब्रिटिशसरकारनें जातीय-वादाचें भूत पुढें केलें व कांहीं प्रतिगामी जातीय संघ व अल्प-संख्याक जमातींच्या सम्मतीशिवाय राजकीय प्रश्न सोडविण्याचें नाकारलें.**

अल्पसंख्याकांचा हिंदुस्थानांतील प्रश्न निराळा आहे. युरोपप्रमाणें हिंदुस्थानांतील अल्पसंख्याक वांशिक अल्पसंख्याक नाहींत, तर एकाच वंशाचे पण निरनिराळ्या धर्मांचे अल्पसंख्याक हिंदुस्थानांत आहेत. ख्रिश्चन, शीख व पार्शी ह्या लहान धार्मिक जमाती आहेत. हिंदु व मुसलमान हेच दोन मोठे विभाग आहेत व हिंदु एकंदर लोकसंख्येच्या $\frac{2}{3}$ आहेत. सर्व हिंदुस्थानांत मिळून जरी मुसलमान अल्पसंख्याक असले तरी उत्तरेकडील पांच प्रांतांत त्यांचें बहुमत आहे. त्यांची एकंदर लोकसंख्या आठ कोट. प्रांतिक स्वायत्ततेंत जर त्यांनीं मनांत आणलें तर ह्या पांच प्रांतांत ते अधिकार गाजवूं शकतील. **पण लोकवस्ती अशी विभागली आहे कीं कोणत्याहि एका जमा-तीला दुसऱ्या जमातीवर जरी मनांत आलें तरी जुलूम झालाच तर दुसऱ्या प्रांतांत त्याचे पडसाद लगेच उठतील.**

कोणीहि शहाणा मनुष्य पाकिस्तानची योजना व्यवहार्य आहे असें

म्हणणार नाहीं. फक्त जर त्याला हिंदी स्वातंत्र्याचें वावडें असेल, तरच पाकिस्तानची मागणी तो पुढें करील.

**पाकिस्तानच्या धर्तीवर केलेली विभागणी ही दोघांनाहि सारखीच घातक आहे व सर्व हिंदुस्थानच्या दृष्टीनेंहि ती फार अनिष्ट आहे असें कॉंग्रेसचें म्हणणें** आहे. वायव्य सरहद्द प्रांतांतील मुसलमानांनाच पाकिस्तानपासून फार त्रास होईल असें मला वाटतें.

उत्तरेकडील प्रांतांचे पाकिस्तानमुळें सर्वांत जास्त नुकसान होईल. कारण ते प्रांत अद्याप सुधारलेले नाहींत व तेथें अर्वाचीन राष्ट्राला लागणारा कच्चा मालहि सापडत नाहीं.

अल्पसंख्याकांचा प्रश्न हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याआड येतो असा भ्रम कोणीहि बाळगूं नये. भूतकाळाप्रमाणेंच आतांहि ब्रिटीश साम्राज्यशाही व हिंदी जनता ह्यांच्यांतच विरोध आहे व ब्रिटीशांचें धोरणच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या-आड येत आहे.

हिंदुस्थानच्या फाळणीविरुद्ध इतरहि बरीच कारणें आहेत; पण ती सर्वांना माहीत आहेत म्हणून मी त्यांचा उल्लेख करीत नाहीं. याशिवाय भावनात्मक, ऐतिहासिक व मानसशास्त्रविषयक अशींही कारणें आहेत आणि त्यांचा परिणाम लोकांवर विशेष होणार आहे.

**ह्या सर्व कारणांमुळें हिंदुस्थानच्या फाळणीविरुद्ध बहुमत आहे. आणि युद्धानें तर ही गोष्ट सिद्ध आहे कीं लहान राष्ट्रांना भविष्यकाल नाहीं, त्यांना दुसऱ्या राष्ट्रांच्या जिवावर जगावें लागतें. राजकीय, व आर्थिकदृष्ट्या तीं परावलंबी असतात, म्हणून हिंदुस्थानांत लहान राष्ट्रें निर्माण करणें फार धोक्याचें आहे.**

जगांत हल्ली मोठमोठीं फेडरेशन स्थापन करण्याकडेच कल आहे. सर्व जगाचें फेडरेशन होण्यानेंच सर्व प्रश्न सुटणार आहेत असें मला वाटतें. येत्या

कॉंग्रेस वर्किंग कमिटीपुढें अशा तऱ्हेचा ठराव पुढें मांडण्यांत येणार आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. असें फेडरेशन सर्व महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यास मदत करील, व अल्पसंख्याकांचा व इतर राष्ट्रीय प्रश्नसुद्धां निराळें रूप धारण करतील आणि ते सहज सुटतील.

म्हणूनच अल्पसंख्याकांचा प्रश्न हिंदुस्थानच्या प्रगतिच्या आड येतो अशी कोणीही गैरसमजूत करून घेऊं नये. भयानक अशा पूर्वकालाप्रमाणेंच आजही भांडण ब्रिटीश भांडवलशाही आणि हिंदी जनता यांच्यामध्येंच आहे.

# ४ प. वा. महादेवभाई देसाई

## "जातीय त्रिकोण"

हिंदुस्थानांतील जातीय त्रिकोण हें आमच्या दोन प्रसिद्ध समाजवादी मित्रांनीं लिहिलेल्या एका पुस्तकाचें अर्थवाही नांव आहे. ज्या प्रश्नानें आमच्या श्रेष्ठ पुढाऱ्यांचीसुद्धां मति कुंठित झाली आहे. त्या प्रश्नांवरील अभ्यासामध्यें या पुस्तकानें अमूल्य भर घातली आहे यांत शंका नाहीं. जरी हें पुस्तक दोघांच्याच नांवावर प्रसिद्ध झालें असलें तरी तें बऱ्याचशा समाजसत्तावादी मित्रांच्या तुरुंगांतील एकत्र विचाराचें अमूल्य फळ आहे हें त्यांत मान्य केलेलें आहे. आमच्या स्वातंत्र्याच्या लढ्याचा विचार चालू असतांनाही आणि दादाभाई आणि वाच्छा, गोखले आणि जोशी यांच्यासारख्या थोर पुरुषांचें कार्यक्षेत्र ठरलेली वस्तुस्थिति आणि आकडे यांचा अविश्रांत अविरत अशा अभ्यासाचा अभाव असला तरीसुद्धां आमच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांचा विचार हा एक क्वचित्‌च सांपडणारा गुण आहे. आमच्या कामगारामध्यें अभ्यासाचा अभाव १९२० सालापासून आहे हा आक्षेप साधार आहे. ज्यामध्यें एकत्रित परिश्रम, अभ्यास आणि संशोधन आहे असें पुस्तक त्या आक्षेपाला योग्य उत्तर आहे. फक्त इंग्लीश भाषेंतील आणि इतर परकीय भाषांतीलच नव्हे तर हिंदुस्तानी, पर्शियन आणि मराठी भाषेमधील महत्वाच्या वाङ्मयाचा उपयोग केला असून शक्य त्या सर्व आधारांचा उपयोग करून घेतला आहे. आणि बुचन यांच्या म्हणण्याप्रमाणें हा एक इतिहास असून तो एक शास्त्रच नव्हे तर कला आहे. "ती नुसती रचना नसून एकत्रीकरण आहे. तो एक बातमी देणारा ग्रंथ असून सुद्धां अर्थ करणारा आहे."

मी वर म्हटल्याप्रमाणें पुस्तकाचें नांव सार्थ आहे. ' चिरकालीन त्रिकोण ' ही म्हण सुप्रसिद्धच आहे. एखाद्या विवाहित जोडप्यामध्यें तिऱ्हाईत व्यक्ति कितीतरी असंख्य संकटें निर्माण करीत असते. त्या संकटामध्यें सापडलेल्या व्यक्ति जर ताळ्यावर येऊन त्यांनीं तिसऱ्या व्यक्तीला दूर केलें नाहीं अगर तिला पश्चात्ताप होऊन ती आपोआपच बाजूला झाली नाहीं तर तें संकट नाहींसे करणें शक्य नाहीं. **ग्रंथकारांनीं अगदीं बरोबर रीतीनें वर्णन केल्याप्रमाणें तिसरी बाजू या जातीय त्रिकोणांत मूलभूत असून तिनें या ' चिरकालीन त्रिकोणांत अतिशय नाशाचा भाग घेतला आहे. आणि ज्याक्षणीं हा आधार नष्ट होईल त्याच क्षणीं जे दोन पक्ष अनेक शतकापूर्वी एकमेकांशीं एकमेकांच्या चांगल्या-करितां अगर वाईटाकरितां निगडीत झालेले आहेत त्यामधील त्रासांचें मूळ नष्ट होऊन जाईल.** आपल्या दुःखांचें कारण बाहेर शोधण्यापेक्षां आंतच शोधणें हा गांधीजींचा स्वभाव आहे. आणि म्हणूनच त्यांनीं आपल्या देशबांधवांचें लक्ष्य आपल्या चुकांवर आणि दोषांवर व आपल्या कर्तव्यावर केंद्रीभूत करण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे. प्रार्थनामय असे त्यांचे आत्यंतिक सर्व प्रयत्न फसल्यामुळें त्यांचे असें निश्चित मत झालें आहे कीं द्वेषाचें मूळकारण व ठिकाण दूर झाल्याशिवाय रोग नष्ट होणार नाहीं. या दुःखद अशा शेवटच्या विचाराला ते आलें तें कांहीं हलक्या अंतःकरणानें नव्हे. उंटाच्या पाठीवरील शेवटची काडी म्हणजे क्रिपच्या सूचना होत. त्यामुळें फोडा आणि राज्य करा या सैतानी तत्वाचा अंतिम बिंदुच गांठला होता. आणि या दुःखी देशाला दुःखमुक्त करण्याचा एकच मार्ग म्हणजे साम्राज्यसरकारनें आपलें अस्तित्व येथून काढून घेणें हाच होय असा निश्चय करून ते दिल्लीहून परत गेले. या पुस्तकाच्या ग्रंथकारांनीं ब्रिटिशांचे पाय हिंदुस्थानांत रोवल्यापासूनचा या नाशकारक धोरणाचा इतिहास इतक्या सूक्ष्म विस्तारानें, इतक्या उत्कृष्ट अधिकारी पृथक्करणानें, आणि इतक्या बिनचूकपणानें दिला आहे कीं एखाद्या हिंदु किंवा मुसलमान भावनाशून्य मनुष्यानें तो वाचल्यास त्यानें ग्रंथकाराच्याच मतांचा स्वीकार केला पाहिजे. हें पुस्तक क्रिपच्या सूचनांचें संकट

येण्यापूर्वीं व गांधीजींनीं आपला जीवनदायी ब्रिटिशांनीं हिंदुस्थान सोडून चालते व्हावें असा संदेश देण्यापूर्वीं कित्येक महिने हें पुस्तक प्रसिद्ध झालें हें खरोखर विशेष आहे. आणि त्यांचा निष्कर्षही तोच आहे.

'ब्रिटिशांची या त्रिकोणांतील भुजा' या शीर्षकाखालचें अगदीं उघड असें जें वर्णन केलें आहे त्याच्या शेवटीं तें असें म्हणतात कीं, "**याच कारणाकरितां कॉंग्रेसनें नेहमींच असें आव्हान दिलें आहे कीं जर हिंदु मुसलमानामधील भेदभाव नष्ट व्हावयाचे असतील तर तिसऱ्या पक्षानें आपलें अंग अगदीं कोणत्याही प्रकारची अट न घालतां काढून घेऊन त्या दोन पक्षांना आपल्या भीति आणि मागण्या यांना तोंड देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे.**" पुन्हां "वस्तुस्थिती अशी आहे कीं कोणत्याही प्रकारचें सरकार अगर घंटना आम्हाला पाहिजे असो; परंतु त्या जर लोकमतावर अवलंबून राहाणार असतील तर जोपर्यंत ब्रिटीश लोक आमच्याच घरांत मालक आहेत तोपर्यंत ते आम्हाला मिळूं शकणार नाहीं." हल्लींच्या साम्राज्य बनविणाऱ्यांचे वारसदार सर जॉन शूस्टर आणि मि. गाय विंट यांच्या पुस्तकांतील विकृत परिणामांचा विचार बाहेर चव्हाट्यावर मांडून लेखक म्हणतात, "जर गाय विंटनें सुचविल्याप्रमाणें कॉंग्रेस ही जर एकच संस्था नसून निरनिराळया मतांच्या पण ब्रिटीश राज्याला विरोध करणाऱ्या लोकांची एक संस्था असेल तर ज्या क्षणीं हा विरोध नष्ट होऊन हिंदुस्थान स्वतंत्र होईल त्याच क्षणीं कॉंग्रेसचें तुकडे तुकडे होऊन त्यांतील निरनिराळे संघ आपापल्या नवीन पक्षांना मिळून दुसऱ्या पक्षांना शिव्या देण्याचें कार्य चालूं करतील. हें ज्यावेळीं घडून येईल त्यावेळीं हिंदी लोकावर आपली अखंडत्वाची इच्छा लादण्याकरितां कॉंग्रेसचें अस्तित्वच उरणार नाहीं. आणि तो काल शांत व विचारी अशा मुत्सद्यांना आपले घटनात्मक प्रयोग गोड अशा बुद्धिवादाच्या जोरावर पार पाडण्यास योग्य असेल" परंतु त्या सुखद कालाची असाध्य अट म्हणजे ब्रिटीशांनीं हिंदुस्थानांतून निघून जाणें ही होय. ते भटकणाऱ्या पक्ष्याप्रमाणें आले व शिकारी पक्ष्याप्रमाणें राहिले व "त्यांनीं केलेल्या अत्याचारांचे खोल ओरखडे या दुर्दैवी भूमीच्या तोंडावर स्पष्टपणें दृग्गोचर होत आहेत." मुसलमान या

देशाचा नाश करण्याकरितां राहिले नसून त्यांनीं हा देश आपली मायभूमि बनविली आणि आमचा अत्यंत " अमूल्य ठेवा " होऊन राहिलेल्या अशा संस्कृतीची वाढ करण्यास मदत केली. **ब्रिटिशांच्या हिंदुस्थानांतील वास्तव्याच्या " मोठ्या नकाराचें " निराकरण करावयाचें असेल तर त्यांनीं मानानें येथून निघून गेलें पाहिजे.**

ग्रंथकारांनीं समाजवादाची भाषा वापरली असून निरनिराळ्या प्रकरणांतून जातीय प्रश्नाच्या 'दुराग्रही घटकांचा' राजकीय, सामाजिक दृष्टीनें विचार केला आहे परंतु या तीनही एकच विषवृक्षाच्या फांद्या असल्यामुळें एका प्रकरणांतील गोष्टी दुसऱ्याही प्रकरणांत जातात असें दिसून येईल. अशा रीतीनें स्वतंत्रपणें विचार केलेल्या " मुस्लीम राजकारणाची वाढ " या प्रकरणाचा ' त्रिकोणांतील ब्रिटिशांची भुजा ' या प्रकरणाशीं संबंध असून तें पुन्हां या प्रश्नाच्या सामाजिक बाजूसंबंधीं जें अमूल्य प्रकरण आहे त्याच्याशीं अतिघनत्वानें निगडित झालेलें आहे. एकच विष सर्व बाजूमधून खेळत आहे याचें साधें व सोपें कारण म्हणजे तें ' फोडा व राज्य करा ' या कलेंत निष्णात अशा मालकांनीं पाजलें आहे.

सर्वसामान्य मुस्लीमाला आपल्या ब्रिटिशांशीं असलेल्या संबंधाविषयीं एक अंश तरी माहीत आहे अगर कसें ही शंकाच आहे. १९ व्या शतकाच्या आरंभीं ते ब्रिटिशांचे शत्रु होते. " एका मोठ्या जमातीच्या शक्तींचा ऱ्हास करावयाचा व स्वाभिमानी लोकांची रग नाहींशी करावयाची " या विशिष्ट धोरणासाठीं मुसलमान लोकांना सुसंगत रीतीनें सैन्याच्या बाहेर ठेवण्यांत आले होते. १८७१ सालीं बंगालमधील २१४१ गॅझेटेड् नेमणुकींपैकीं ७११ हिंदूंच्या होत्या आणि ९२ मुसलमानांच्या होत्या. " १७० वर्षांपूर्वीं चांगल्या परिस्थितींत जन्माला आलेला बंगालमधील मुसलमान गरीब असणेंच शक्य नाहीं " असें डॉ. हंटर यांनीं लिहिलें आहे. " आणि हल्लीं त्याला श्रीमंत राहाणेंच कठीण आहे. " पर्शियन आणि आरबी लोक पूर्णपणें अशिक्षित होते आणि अभ्यासक्रमच असा आखलेला होता कीं त्यामध्यें मुसलमानांना मजा वाटण्याऐवजीं एकप्रकारचा तिरस्कारच वाटूं लागला." असें बॉवेन म्हणतो. हुगळी ट्रस्टची दुर्दैवाची कहाणी अशीच झाली कीं त्यांतील फारच थोडा भाग मुसलमानांच्या शिक्षणाकरितां राहिला. शेवटीं डॉ. हंटरनें असा निष्कर्ष काढला आहे कीं

" मुसल्मानांचा वंशाचा नाश ब्रिटिश अंमलाखालीं झाला आहे. " आमचे ग्रंथकार अट्टाहासानें फार चांगल्या प्रकारानें सांगत आहेत कीं, " आज मुस्लीम लीग २७ महिन्यांत कॉंग्रेस राजवटीनें अन्याय केले म्हणून ओरडत आहे. परंतु गेल्या शंभर वर्षांत ज्या सरकारनें मुस्लीम जनतेविरुद्ध हरएक प्रकारचे अन्याय केले त्याविरुद्ध त्यांना कांहीं म्हणावयाचें नाहीं. मनुष्याजवळ जें कांहीं असेल तें सर्व हिरावून घेऊन त्याला अत्यंत उदात्त असें म्हणावें. तुम्ही त्याला दारिद्र्याच्या व अज्ञानाच्या गर्तेत बुडवून नंतर त्याच्या संस्कृति विषयीं बोलूं लागाल. आणि त्याचा सर्वस्वी नाश करून त्याला एका मोठ्या जमातीचा सभासद गणूं लागाल. या सर्व गोष्टी तुम्ही हिंदुस्थानांत करूं शकाल. कारण येथें अविचार्य अशा गोष्टी विचारणीय आहेत असेंच. नव्हे तर त्या करणीय असून नेहमीं केल्या जातात.

जाणून बुजून एक जमातीला दुसरी विरुद्ध खेळविण्याचें जें ब्रिटीशांचें धोरण आहे त्याचें अगदीं निर्विकार मनानें वर्णन केल्यास वरच्या उताऱ्यांतील शेवटच्या वाक्यातील सत्य स्पष्ट होतें. " मॉंटफोर्ट रीपोर्टाच्या प्रसिद्ध लेखकांनीं आपल्या रिपोर्टांत स्वतंत्र मतदार संघाविरुद्ध मत प्रतिपादन केलें आहे परंतु कॉंग्रेस व लीग यांच्या दरम्यानच्या तडजोडीसाठीं म्हणून त्या तत्त्वाचा स्वीकार केला आहे. १९३३ सालीं जातीय निवाडा याच्या अगदीं विरुद्ध कारणासाठीं लादण्यांत आला. १९१९ सालीं होती जमातींच्या मान्यतेनें जातीय तत्त्व घुसडण्यांत आले; १९३५ सालीं हिंदु आणि मुसलमान सहमत होईनात म्हणून हें जातिय तत्त्व वृद्धिंगत करण्यांत आलें. " जरी त्यांच्या धोरणामधील एखादी गोष्ट दुसरीपासून कितीही जरी विसंगत असली तरी या मधील आरंभापासून शेवटपर्यंतचें मूळ कारण म्हणजे ब्रिटीशांचें राज्य चिरकाल टिकावें म्हणून राष्ट्रीयत्वाची किंमत कमी करून लोकामधील राष्ट्रीयत्व कमी करणें हेंच होय. " १९३५ च्या गव्हरमेंट ऑफ इंडिया कायद्यानें मतदान बरेच वाढविलें आहे. ब्रि. हिंदुस्थानांतील शंभर वयांत आलेल्या पुरुषापैकीं २७·४३ इतके मतदार आहेत. या ठिकाणीं राष्ट्रीयत्वाचा उपयोग करतां आला असतां, सरकारनें अशा तऱ्हेचे प्रयत्न अत्यंत काळजीपूर्वक उधळून लावले आहेत. **१९१९ सालीं मतदारसंघाचे १० भाग होते आतां १७ असमान भाग आहेत.** बायका

आणि हिंदी ख्रिस्ती यांच्यावर इच्छेविरुद्ध स्वतंत्र मतदार संघ लादण्यांत आले. हलक्या जातींना स्वतंत्र प्रतिनिधित्व देऊन हिंदुसमाज आणखी दुर्बल केला गेला. धर्म, धंदा आणि लिंग यांना अनुसरून भाग पाडण्यांत आले. **शक्यतितके वेडेवाकडे भेद पाडण्यांत आले.**" माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन, लॅरेन्स आणि दोन राष्ट्रांच्या तत्वाचा मूळ प्रणेता बेक यांच्या पासून तो तहत मिंटो आणि सॅम्वेल होअर ( यावेळीं लॉर्ड आमर्विन यांनीं डॉ. अन्सारी यांना दुसऱ्या गोलमेज परिषदेला बोलविण्याचे बाबतींत नकार दिला होता. आणि त्यांची लोकांपुढें दिलेलीं व्याख्यानेसुद्धां देणें जरूर होते ) पर्यंत सर्वांची माहिती योग्य ठिकाणीं दिली आहे. या पुस्तकाच्या दुसऱ्या प्रतींत अमेरी, क्रिप्स, चर्चिल आणि ॲटली यांच्याबद्दल स्वतंत्र प्रकरण लिहिणें योग्य होईल. परंतु हें कार्य अमेरी आणि कं. येण्यापूर्वीच पूर्ण झालें होतें. द्विराष्ट्रतत्वाचा प्रचार करून सरकारनें त्याचा स्वीकारही पण केला आहे. आणि चुकलेल्या मुसलमानाकडून आणि हिंदुंकडून तें एक युद्धाची आरडाओरड म्हणून घेण्यांत आलें.

आतां आपण हिंदुस्थानांतील दोन राष्ट्रीय वृत्तीकडे—मुस्लीम लीग आणि हिंदुमहासभा यांची विरोधी जातीय वृत्ति आणि कॉंग्रेसची लोकशाही राष्ट्रीय वृत्ति आणि हिंदु जातीयवाद आणि पाकिस्तानची चळवळ यावरील प्रकरणाकडे वळतों. लेखकांनीं अगदीं निर्दय निःपक्षपातीपणाच्या पृथक्करणानें **एकाच्या विसंगत विचारसरणीमुळें दुसऱ्याचें चुकीचें तत्त्व कसें निघतें हें दाखवून दिलें आहे.** आपल्या आकुंचित स्वार्थामुळें एका अशक्यतेपासून दुसऱ्या अशक्यतेकडे कसें जातात हेंही त्यांनीं दाखवून दिलें आहे. त्याबरोबरच मुसलमान लोक निर्लज्जपणानें "आम्ही (आमच्या मागण्याच फक्त नव्हे तर अत्याचारही ) पण वाढवूं शकूं असें सांगूं शकतात; त्याच वेळीं हिंदुमहासभा हिंदूंचे सैनिकीकरण मंडळ स्थापते आणि कॉंग्रेसनें नष्ट व्हावें असें दोघांनाही कसें वाटतें व त्यामुळें आपसांतील भांडणांमुळें दोघे थकून जाऊन कॅंग्रेसचा नाश झाल्यावर सर्व मैदान तिसऱ्या पक्षाला खुलें कसें राहील हेंही स्पष्ट केलें आहे. सत्ता राजकारणाशिवाय दोघांनाही अधिक उच्चतम ध्येय नाहीं. एकाला हिंदु संस्कृति, सुधारणा आणि वंश याचे संरक्षण व वर्धन करून हिंदुराष्ट्राची कीर्ति वृद्धिंगत करणें या अर्थीं हिंदुत्वाचें रक्षण करावयाचे आहे

तर दुसऱ्याला मुस्लीम साम्राज्याची नष्ट झालेली कल्पना बिस्मार्कच्या किंवा हिटलरच्या पद्धतीचा व मार्गांचा अवलंब करून पुनरुज्जीवित करावयाची आहे.

याच्या विरुद्ध कॉंग्रेसचें लोकशाही राष्ट्रीयत्व आहे. तें एकसत्तात्मक नसून हिंदुस्थानच्या निरनिराळ्या रहिवाशांच्या हक्कांच्या विस्तृत पायावर उभारलें आहे. सर्व प्रकारचे अत्याचार आणि म्हणून नाश आणि व्यापारी धोरणाचे धाडस हें वर्ज करून शांततेनें राष्ट्रांचे संयुक्त घटनात्मक राज्य-व्यवस्था निर्माण होणें जरूर हें कॉंग्रेस मान्य करते. महात्मा गांधींनीं आपल्या अननुकरणीय मार्गानें नुकतेच सांगितलें आहे कीं "हिंदी लोक ब्रह्मदेशांत जातील परंतु बंदुकीशिवाय." कारण "जी राष्ट्रीयता संयुक्त राज्यघटनेला जवळ असून, लोकशाहीच्या तत्वावर आधारली आहे आणि जिच्याजवळ सतत चालू असणाऱ्या युद्धाच्या आव्हानाला उत्तर (सत्याग्रह) आहे तीच राष्ट्रीयवृत्ती हल्लींच्या या धकाधकीच्या जगांत टिकणार आहे......लिंकननें गुलामगिरीचा निषेध केला; कारण त्यामुळें जितका गुलाम तितकाच धनीही हलक्या दर्जाचा होतो. तीच गोष्ट हल्लींच्या युद्धासंबंधीं म्हणतां येईल. कारण तुमचें ध्येय कितीहि उच्च असलें तरी शेवटीं युद्ध हें त्याला हलकेपणा दिल्याशिवाय राहाणार नाहीं. शत्रूच्या हत्यारापेक्षां अधिक सुधारलेली हत्यारें नसतील तर शत्रूशीं युद्धच करतां येणार नाहीं."

या शेवटच्या मार्गानेंच ज्यावेळीं शक्य असेल तेव्हां स्वतंत्र राष्ट्रांची संयुक्त राज्यघटना संभवूं शकेल. या व अशा प्रकारच्या विषयासंबंधींचीं चांगलीं प्रकरणें या पुस्तकांत आहेत. परंतु त्यांचा फक्त नामनिर्देश करण्यावरच मला समाधान मानलें पाहिजे. सर्व प्रकारच्या संपाच्या आणि रक्तपाताच्या बुडाशीं असणाऱ्या या ढोंगी (Spurious) राष्ट्रीयत्वाच्या कालांत दोन समाज-सत्तावादी लेखक "सद्गुणी आणि राजकीय देशाच्या" बाजूनें उभे आहेत हें कांहीं तरी आशादायक आहे असें म्हणणेस नड नाहीं. हीच कल्पना बर्कच्या शब्दांत सांगावयाची झाल्यास तो देश "भौगोलिक देशापासून भिन्न व कदाचित् विरोधीही असूं शकेल." ते असें म्हणतात कीं "**राष्ट्रीयत्वाला कांहीं अर्थ आहे. आणि ज्यावेळेस त्याच्या नैतिक व राजकीय मर्यादा एकत्र होतील तेव्हांच तें आम्हाला मान्य होऊं शकेल.**"

" जर हिंदुस्थानांतून ब्रिटीश लोक निघून गेले तर जातीय ऐक्य आपोआप घडून येईल काय ? **तें आपोआप येणार नाहीं. कारण जीं विषवृक्षाचीं रोपटीं वरीच वर्षें रुजली आहेत तीं काढून टाकण्यास कालावधि लागणारच. परंतु जमीन आपोआप तयार होऊन मुळें नष्ट झाल्यावर वरील झुडुपें नष्ट करण्यास फारसा कालावधि लागणार नाहीं.** अशा तऱ्हेच्या विषवल्ली काढून टाकण्याच्या कामीं पुष्कळसे कार्य करावें लागेल. या पुस्तकांत फक्त एकच तुटलेला दुवा ( Hiatus ) आहे आणि तो म्हणजे गेल्या २० वर्षांत ज्यांनीं या कार्याला वाहून घेतलें आहे त्यांची—आमची सदसद्‌बुद्धी जागृत व्हावी म्हणून २१ दिवसांना उपवास केलेल्या त्या गांधीजींच्याच नव्हे तर अप्पासाहेब पटवर्धनासारख्या ज्यांनीं या कार्यासाठीं आपले प्राणत्याग केले आहेत अशा दुसऱ्या पुष्कळ लोकांच्यात; कार्याचा अहवालासंबंधींचें प्रकरण होय. शेवटच्या भागांत जातीय संबंध सुधारण्यासाठीं मार्ग सुचविणारे १।२ परिच्छेद आहेत; परंतु ते पुरेसे नाहींत. कारण त्या प्रकारच्या कार्यानें ऐक्य हें भरींव पायावर उभारले जाऊन तिसऱ्या पक्षाकडून त्याचा नाश होणार नाहीं.

ब्रिटीश अंमदानीपूर्वींचे हिंदुमुसलमान संबंधाचा इतिहास, वस्तुस्थिति व आंकडे दर्शविणारीं परिशिष्टे—यासारख्या मनरंजक अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं त्यांच्याकडे मन आकर्षिलें जातें; परंतु लांबलचक अभिप्राय देण्याच्या ऐवजीं थोडक्यांत प्रत्येक हिंदु आणि मुस्लीम विद्यार्थ्यानें या पुस्तकाचा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास अवश्यमेव करावा एवढेंच सांगेन. समाजसत्तावादी मित्रांनी ही एक अमूल्य भर घातली असून आमच्या प्रांतिक भाषेंत याचीं भाषांतरें होणें जरूर आहे.

( हरिजन, जून २८,१९४२ )

# ५ ख्याजा अहमद अब्बास

## जरी मी हिंदुस्थानांतील एकटाच शेवटचा मुसलमान असलों तरी मी पाकिस्तानांत राहाणार नाहीं !

मी माझ्या वृत्तपत्रीय व्यवसायांत व्यक्तिगत असा हा लेख दुसऱ्या खेपेला लिहीत आहे.

पहिल्या लेखाचें नांव "मी माझ्या थडग्यांतून बाहेर येतो" असें होतें. व तो लेख माझ्या कांहीं कनवाळू "मित्रांनीं" मी मेलों अशी जी बातमी उठविली होती तिचा इन्कार करण्याकरितां २ वर्षांपूर्वी लिहिला होता. ती एक गंभीर अशी व्यक्तिविषयक बाबत होती. मनुष्याजवळचें सर्वस्व म्हणजे त्याचें जीवित होय ! म्हणूनच स्वाभाविक रीत्या द्वेषमूलक गप्पेनें मी मारला जावा हें मला पसंत पडलें नाहीं.

आज मी त्यापेक्षां सुद्धां अधिक गंभीर अशा व्यक्तिगत विषयासंबंधीं लिहिणार आहे. या खेपेला माझें जीवित यांत गुंतलेलें नसून माझ्या देशाचें जीवित व अखंडत्व यांचा समावेश यांत झालेला आहे. हिंदुस्थान मृत झाला असून उज्वल परंपरा आणि गोड आठवणींचा हिंदुस्थान अस्तित्वांत नाहीं अशी द्वेषमूलक "बाजारगप्प" पसरविण्यांत आली आहे. त्याचे दोन भाग करावयाचे आहेत; निरनिराळे विभाग पाडावयाचे असून त्याचे तुकडे तुकडे करून ते धर्मवेडानें पछाडलेल्या लांडग्यापुढें टाकावयाचे आहेत. हा माझ्या आयुष्यांतील दुर्दैवाचा कडेलोट आहे कारण तो माझ्या बांधवांच्या आयुष्यांतील आहे. आणि ह्या भयंकर राष्ट्रीय संकटाचे वेळीं प्रत्येकानें कांहीं

काळ थांबून आपला आपल्या जन्मभूमीशीं जो संबंध आहे त्याबद्दल विचार करावा हें मला सर्वांत महत्वाचें वाटतें. असा विचार करून प्रत्येकानें आपल्या स्वतःचा विश्वास आणि दृढमतें यांच्या साहाय्यानें व्यक्तिगत असा निर्णय ठरवावा.

'हिंदु पाणी' व 'मुसलमान पाणी' या पद्धतीवर हिंदुस्थानची विभागणी जो कार्यक्रम आखलेला आहे तो पाकिस्तानाचा विचार मुख्यत्वें राजकीय बाब्र आहे यांत शंका नाहीं. दुय्यम दृष्टीनें विचार केल्यास त्याला आपोआप आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक स्वरूप आलें आहे. परंतु दुसऱ्या कशापेक्षांही तो एक व्यक्तिगत प्रश्न आहे. ज्यावेळीं या प्रश्नाच्या बाकी सर्व अंगोपांगांचा कीस काढला जातो त्यावेळीं या प्रश्नाच्या या व्यक्तिविषयक अंगाचा विचार मात्र केला जात नाहीं. आणि जर हें पाकिस्तान अंमलांत आलें ( ईश्वर करो आणि असें न होवो ! ) तर ही व्यक्तिगत बाजू आपल्या आयुष्यांत अत्यंत तीव्रतेनें पुढें आल्याशिवाय राहाणार नाहीं. यामुळें आमचे प्रियतम मित्र व नातेवाईक हे एकमेकापासून विभक्त होऊन दृढीकृत अशा निरनिराळ्या देशांचे घटक बनतील आणि हिंदुस्तानांतील लाखों मुसलमानांना आपण आपल्याच जन्मभूमींत परकीय लोक असून आपले सर्व हक्क हिरावून घेतले आहेत अशी तीव्रतर आणि दुःखदायक जाणीव झाल्याशिवाय राहाणार नाहीं. यापेक्षांही अधिक दुःखतर गोष्ट म्हणजे सर्व लोकांना आपलीं घरेदारें सोडून देऊन ज्यांच्याविषयीं आपल्या मनांत प्रेम नाहीं अशा परकीय भाषा, चालीरीति, पद्धति असलेल्या सीमाप्रान्तांत जाऊन राहाण्याचा प्रसंग आल्याशिवाय राहाणार नाहीं.

अशा प्रकारें प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या व्यक्तिगत जीवनांत जे भयानक प्रसंग ओढवतील त्या दृष्टीनें मी पाकिस्तानचा विचार करीत आहे. राष्ट्रांच्या जीविताशीं निगडित झालेल्या प्रश्नांचा विचार याच पद्धतीनें केला पाहिजे असें मला वाटतें. आम्हांला युद्धें म्हणजे कल्पनांचा विरोध वाटतो; म्हणूनच युद्धें होतात परंतु लाखों व्यक्तींचा आत्मत्याग, व्यक्तिशरीरांचा नाश, व व्यक्तींच्या घरांच्या नाश या दृष्टीनें पहात नाहीं. जोपर्यंत निरानिराळ्या आपत्ति व संकटें परमेश्वराचा प्रकोप आहेत असें आपण मानतो व तीं आपली मुलें

बाळें, भांवडें व मित्र यांच्यावर विनाजरूरी आलेली आपत्ति आहे या दृष्टीनें पाहात नाहीं तोपर्यंत आम्हाला अशा साथी पासून त्रास होत राहातो. जर आम्ही पाकिस्तानच्या प्रश्नाकडे ज्यांच्या शरीरांतून एकच रक्त वहात असून, ज्यांनीं एकच जमीन कसली, ज्यांचें राजकीय दुर्दैवहि एकच आहे व ज्यांनीं दुःख व जय यांचा एकत्र अनुभव घेतला अशा हजारों वर्षें एकत्र राहिलेल्या मित्रामधील व शेजाऱ्यामधील–हिंदुमुसलमानांमधील–हा प्रश्न आहे यादृष्टीनें न पाहातां हा प्रश्न दोन ' राष्ट्रीयत्वा ' मधील किंवा ' धर्मां ' मधील आहे अशा दृष्टीनें आपण पाहूं लागलों तर आपला नाश झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

**राजकीयदृष्ट्या प्रतिगामित्वाची ही व्यवस्था होईल म्हणून–माझा पाकिस्तानला विरोध आहे.** त्यामुळें आम्ही भव्य व उदात्त अशा लोकशाहीकडे जाण्याऐवजीं हिंदुस्थानचा एक मोठा भाग राजसत्ता, भांडवलशाही किंवा धर्मसत्ता यांच्या अंमलाखालीं राहील.

आर्थिकदृष्ट्या (Exploitation) **स्वार्थाची परिस्थिति आहे तशीच कायम राहील म्हणून माझा पाकिस्तानला विरोध आहे. राजे, जमीनदार आणि भांडवलवाले हेच सत्ताधीश राहातील.**

**सामाजिकदृष्ट्या सनातनी व असमंजस रूढी आहेत तशाच पद्धाप्रमाणें कायम राहातील म्हणून माझा या पाकिस्तानला विरोध आहे.**

**सांस्कृतिकदृष्टीनें विचार केल्यास संकुचित मनाच्या मौलवी आणि मौलानाकडून संगीत, चित्रकला आणि अभिनय या सारख्या संस्कृतिवर्धक कलांची होणाऱ्या मुसलमानी राज्यांत मुस्कटदाबी केली जाईल म्हणून माझा या पाकिस्तानच्या कल्पनेला विरोध आहे.**

**परंतु या सर्वांपेक्षां अधिक महत्वाचें एक कारण आहे आणि तें म्हणजे नारायण जोग, वसंत साठे आणि झावक यासारखे**

**जे माझे मित्र निधर्मी म्हणवितात त्यांच्यापासून मला ही पाकिस्तानाची कल्पना दूर लोटते म्हणून माझा या कल्पनेला विरोध आहे.** माझें नांव अहमद अब्बास आहे आणि माझ्या हिंदु मित्राचें नांव नारायणस्वामी आहे म्हणून आम्ही दोघे निरनिराळ्या राष्ट्राचे लोक होतो यावर माझा विश्वास बसूं शकत नाहीं म्हणून मी पाकिस्तानशीं सहमत होऊं शकत नाहीं.

पाकिस्तानची कल्पना द्विराष्ट्र कल्पनेवर आधारलेली दिसते. ही द्विराष्ट्र कल्पना चक्रवर्ति राजगोपालाचार्य सारखे समंजस लोक सुद्धां निव्वळ निराशे मुळें मान्य करतात असे दिसतें. अगदीं उघड उघड खोटी दिसणारी तत्त्वप्रणाली उडवून देणें फारसें अवघड नाहीं. या तत्त्वप्रणालीप्रमाणें हिंदी मुस्लीम लोक संस्कृति, भाषा, समाज, राजकारण आणि अर्थशास्त्र या सर्व दृष्टींनीं स्वतंत्र घटक आहे असे मानते. आपण फक्त डोळे उघडे ठेवून सर्व बाजूकडे पाहिले पाहिजे. बंगाली मुसलमान अस्खलित बंगाली बोलतात तर दिल्ली व संयुक्त प्रान्तांतील हिंदु सफाईदार उर्दू बोलूं शकतात, ईशान्य प्रान्तांतील हिंदु शलवार पेहरतात, तर लाखों हिंदु अरबी अक्षरें लिहूं शकतात. बोहरी आणि खोजा व्यापारी गुजराथींत हिशेब लिहितात आणि पंजाब हिंदु महासभावाले आपलीं पत्रकें उर्दूमध्यें प्रसिद्ध करतात. मुंबई मुस्लीम लीगवाले आपले कागद गुजराथींत प्रसिद्ध करतात.

जर अखिल भारतांतील मुसलमान संस्कृतिदृष्ट्या समान पातळीवर असून एकच भाषा बोलत असते व त्यांचे राजकीय व आर्थिक हितसंबंध एकच असते तर मात्र ही द्विराष्ट्र कल्पना योग्य रीतीनें सिद्ध करतां आली असती. परंतु अशी गोष्ट नाहीं हें स्पष्ट आहे.

जर इतर जमातींशीं समान असणारे वांशिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक प्रश्न व हितसंबंध नाहींत असें जर सिद्ध करतां आले तर ही कल्पना गृहीत धरतां येईल. परंतु वस्तुस्थितीही तशी नाहीं.

परंतु मला जें दुःख होतें तें या तत्त्वाचें होत नाहीं; तर हें तत्त्व अंमलांत आणले जाण्याचा जो संभव आहे त्याचें दुःख होतें. **भारतमातेचें जे काल्पनिक शरीर आहे त्याची दोन छकलें करण्याच्या**

**धमकीमुळें मला भीति वाटत नाहीं. ज्या मेजावर बसून मी मी माझ्या हिंदु मित्राबरोबर काम करतो त्या मेजाचे तुकडे करण्याच्या धमकीनें मात्र माझ्या अंतःकरणांत धडकी भरते.** लाखो हिंदु पंजाबमधून किंवा लाखो मुसलमान मुंबईतून हलविले जातील यासाठीं मी भीतिग्रस्त होत नाहीं परंतु माझे आतिथ्यशील व कृपाळू असें हिंदु, खिस्ती, पार्शी व नास्तिक शेजारी माझ्यापासून दूर जाण्याचा संभव आहे त्याबद्दल मला भय वाटतें. मला गंगेबद्दल धार्मिक श्रेष्ठत्व वाटत नाहीं. परंतु पानिपतजवळील ज्या कालव्यावर बसून आम्ही हिंदु-मुसलमान मित्रांनीं स्नान केलें व खाद्य पदार्थांचा उपभोग घेतला त्या कालव्याबद्दल मलाच काय परंतु माझ्या हिंदु मित्रांनाही अत्यंत प्रेम वाटतें आहे. हा कालवा परकीय हद्दींत असून तुम्हांला जर तुमचीं बालपणाचीं खेळाचीं ठिकाणें पहावयाचीं असतील तर तुम्हांला परवाना घ्यावा लागेल असें जर कोणी येऊन सांगूं लागला तर त्यांच्या आयुष्याची ती एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

मी मुंबईला आल्यापासून माझ्या हिंदु मित्रांची संख्या वाढतच आहे. कांहीं अत्यंत सनातनी अशा हिंदु कुटुंबामध्येंसुद्धां मला मुलाप्रमाणें मानलें जातें. मी हिंदूंचीं लग्नें, अंत्यकार्यें व इतर धर्मकार्यें या ठिकाणीं हजर राहिलों आहे. मी हिंदूबरोबर जेवलों आहे व कित्येक हिंदु माझ्याबरोबर जेवले आहेत. आमच्या नोकरवर्गापैकीं कित्येक हिंदुंनीं वापरलेल्या पेल्यानें मी पाणी प्यालों आहे व सर्व जातिनिर्बंध मोडून कित्येक हिंदु सहकाऱ्यांनीं माझ्याबरोबर चहा घेतला आहे. माझ्या हिंदु मित्रांनीं माझ्या सुखदुःखांत, यशापयशांत भाग घेतला असून माझ्या आयुष्यांत मला मदत केली आहे; त्याचप्रमाणें मीही त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. मी त्यांच्याशीं राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बाबींची चर्चा केली असून त्यांच्या माझ्या हितसंबंधांत आश्चर्यकारक साम्य आढळून आलें आहे. मी त्यांच्याबरोबर भारतमातेच्या गुलामगिरीबद्दल अश्रु ढाळले आहेत. त्यांच्याबरोबरच भारताच्या स्वातंत्र्याच्या सुखस्वप्नांचा आस्वाद घेतला आहे. अशा परिस्थितींत आम्ही निरनिराळ्या राष्ट्रांचे घटक असून पाकिस्तानांत गेलें पाहिजे व ज्या ज्या वेळीं मला येथील मित्राला भेटावयाचें असेल त्या त्या वेळीं परवाना काढला पाहिजे किंवा

मी येथेंच राहिल्यास राजकीय किंवा कायदेशीर हक्क नसलेला परकीय इसम म्हणून राहिलें पाहिजे असेंच मला सांगावयाचें काय ?

माझ्या या व्यक्तिगत अडचणी लाखो पटींनीं वाढवा म्हणजे तुम्हांला पाकिस्तानच्या संकटांची कल्पना येईल.

**यासाठींच मी अत्यंत गंभीरपणानें असा निश्चय केला आहे कीं, मला माझ्या आप्तस्वकीय मंडळी किंवा मित्रवर्ग यांच्याशीं सर्व संबंध तोडावा लागला, किंवा माझे सर्व कायदेशीर व राजकीय हक्क हिरावून घेण्यांत आले व मी सर्व हिंदुस्थानांत एकटाच शेवटचा मुसलमान राहिलों तरी मी पाकिस्तानांत कधींही राहणार नाहीं. अशा पाकिस्तानचा रहिवाशी होण्या-पेक्षां अखंड भारताच्या कल्पनेमुळें जी भयाण स्थिति निर्माण होईल तिचा घटक होण्यास मी तयार आहे.**

ज्यांना पाहिजे असेल त्यांनीं पाकिस्तान मिळवावें. ज्या भूमीसाठीं हजारों हुतात्म्यांनीं आपले प्राणार्पण केलें, ज्या देशाच्या निर्मितींस टिळक व गांधी, मझरलहक व मोतीलाल नेहरू, लाला लजपतराय व अजमल खान, दादाभाई नौरोजी व महमदअल्ली, जवाहरलाल नेहरू व अबुलकलाम अझाद, भगतसिंग व उबेदुल्ला सिन्धि, टागोर व इकबल, सरोजिनी नायडू व सोफिया सोमजी, शर-चन्द्र चतर्जी व प्रेमचंद, अब्दुलकरीम खाँ व दिगंबर पलुसकर यांसारख्या स्त्री पुरुषांचे, साधूंचे, गवयांचे, विद्वानांचे, कवींच आणि देशभक्तांचे आणि मुत्सद्यांचे आत्मत्याग कारणीभूत झाले आहेत व ज्या देशांत हिंदु, मुसलमान, शीख, पार्शी, खिस्ति, नास्तिक व अज्ञेयवादी यांचें समान घर आहे अशा देशांत मी जन्मलों व त्याच देशांत देहत्याग करण्याची माझी इच्छा आहे.

त्यांचा देशबांधव होणें हा माझा हक्क आहे व तो मी कधींही सोडणार नाहीं ! मग पाकिस्तान येवो किंवा न येवो !

(साऊंडवरून. जाने. १९४२)

# ६ के. जी. मश्रुवाला

## पाकिस्तानची कमजोरी

“पाकिस्तान” हें अस्वीकारणीय असें वरचेवर म्हणून नाकारून व “अखंड हिंदुस्थान” असें जोरजारानें ओरडून कांहीं उपयोग नाहीं असें मला वाटतें. यामुळें फक्त भांडणाचा प्रसंग येईल. ज्यांना ज्यांना म्हणून अखंड हिंदुस्थान पाहिजे असेल त्या सर्वांनीं असा एखादा प्रत्यक्ष कार्यक्रम शोधून काढला पाहिजे कीं योग्य कालांत अशा तऱ्हेची परिस्थिति निर्माण होईल कीं मुस्लीम, शीख, हरिजन किंवा अन्य कोणत्याही जमातीनें विभक्तीकरण मागितलें असलें तरीसुद्धां ती कल्पना समूळ नष्ट होऊन जावी. हिंदुस्थानचें विच्छेदीकरणाची मागणी ही सामान्य प्राण्याशीं सुसंगत नाहीं असे गृहीत धरण्यास हरकत नाहीं. **ती निव्वळ आपलपोटेपणा आणि साम्राज्यशाहीची हांव किंवा निराशा यामधून किंवा दोहोंमधून उत्पन्न झालेली असली पाहिजे.** कांहीं असलें तरी ही अस्वाभाविक विच्छेदीकरणाची इच्छा पोषण कोण करतें हें पाहिलें पाहिजे.

मुस्लिम लीगचें ‘द्विराष्ट्रीयत्वा’चें तत्त्व चुकीचें आहे यांत शंका नाहीं. परंतु कायदे अझाम ज्यावेळीं असें म्हणतात कीं हिंदी समाजाच्या विशिष्ट रचनेमुळें हिंदी राष्ट्रांत निरनिराळ्या जाती किंवा समाज एकमेकाशेजारीं राहात असूनही एकमेकांपासून निरनिराळ्या अशा काटेकोरपणानें राहातात त्यावेळीं त्यांच्या म्हणण्यांत चूक शोधून काढणें अवघड आहे. त्यांची संख्या एकंदरींत वाढत आहे. हिंदुस्थानांत जाती वाढविण्याला मुभा आहे. पण जात्यैक्य साधण्यास मुभा नाहीं. जाति मोडण्याचा कोणताही प्रयत्न करणें म्हणजे असलेल्या

जातींत भर टाकणें होय. आणि ह्या जाति प्रांतिक, धंदेवाईक किंवा धार्मिक नसून जरी त्या यापैकीं एखादें नांव धारण करीत असल्या तरीसुद्धां त्या प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिगत अभिन्न अशा वडिलोपार्जित आहेत. ज्याप्रमाणें शीख, हरिजन, हिंदी ख्रिस्ति, ब्राह्मणेतर वगैरे इतर जाति आहेत तशीच मुसल्मान हीही एक आहे. यापैकीं कांहींच्या मनांत राजकीय हक्कांची जाणीव पूर्णपणें वृद्धिंगत झाली आहे किंवा होण्याच्या मार्गांत आहे. **भिन्न मतदारसंघाची मागणी हें याचें व्यक्त स्वरुप असून पाकिस्तान ही या प्रकारची मानसिक परिस्थितीची पराकोटी आहे.** हिंदी मनांतून जातीय संस्कार काढून टाकणें अशक्य आहे. या कल्पनेमधून या पाकिस्तानाचा उगम झालेला आहे. म्हणून त्याच मार्गानें जाणें अधिक इष्ट आहे. व त्यामुळें आपला मार्ग अधिक हितकारक व सुखकारक होण्याच्या दृष्टीनें त्याचा राजकीयदृष्ट्या विचार करण्यांत येत आहे. कदाचित् हल्लीं मुस्लिम लीगच्या हें लक्ष्यांत येत नसेल कीं, पूर्वी जाती जरी एकट्या हिंदूंच्याच असल्या तरी आज त्या तशा राहिल्या नसून सर्व हिंदुस्थानच्या बनलेल्या आहेत. म्हणूनच खात्रीपूर्वक असें म्हणतां येईल कीं कालौघांत जसजशी निरनिराळ्या जमातीमध्यें व्यक्तिगत राजकीय हक्कांची जाणीव जागृत होत जाईल तसतशी पाकिस्तानची मागणी ही एकच राहाणार नसून अनेक विच्छेदीकरणाच्या मागण्या पुढें येतील. जरी ही परिस्थिति चुकीची व सर्व राष्ट्राच्या दृष्टीनें विघातक असेल तर जाति वाढून त्या कायदेशीर व एकमार्गी होतात त्या थांबवून जात्यैक्याचा मार्ग शोधून काढला पाहिजे.

**म्हणून पाकिस्तानला हाणून पाडावयाचें असेल तर जरूरीचा एक मार्ग म्हणजे जातैक्य ज्या योगें साधेल अशा सामाजिक कायद्याच्या सुधारणा घडवून आणणें हाच होय.** जर सामाजिक बदल झाला नाहीं तर कायद्यानें घडवून आणलेलें ऐक्य हें केव्हांही यशस्वी व समाधानकारक होणार नाहीं हें पूर्णपणें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. याचा एकच अर्थ होतो आणि तो म्हणजे हा कीं लोकांच्या विशेषतः हिंदुंच्या व विशेषेकरून धार्मिक पुढारी आणि खेड्यांतील दुढ्ढाचार्य आणि पुढारी यांच्या सामाजिक व धार्मिक दृष्टीकोनामध्यें क्रान्ति घडवून आणली पाहिजे.

एखादा मनुष्य जरी दुसऱ्या प्रान्तांत गेला तरी आपला धर्म सोडून शेजाऱ्याचा धर्म पाळील हें अशक्य नसलें तरी अवघड खास आहे. परंतु नवीन ठिकाणच्या चालीरीति, भाषा, अन्न हें स्वीकारणें कमी कठीण आहे. परंतु आपल्या या देशामध्यें आपली अशी समजूत आहे कीं या सर्व गोष्टी व्यक्तिगत असून त्या नवीन राष्ट्रानें व कायद्यानें मान्य केल्याच पाहिजेत. आणि तें येथेंच थांबते असें नाहीं. परक्या प्रान्तांत जाणारा इसम आपल्या जुन्या ठिकाणचा लग्न, वारसा, दत्तक व इतर बाबतींतला कायदा व चालीरीति घेऊन जात असतो. जरी तो नवीन ठिकाणीं जाऊन राहिला व पिढ्यानुपिढ्या तेथें काढल्या तरीसुद्धां तेथील आयुष्यक्रमाशीं एकजीव होऊन जाण्याच्या ऐवजीं ज्या बाबीमुळें एकत्र जीवन बनूं शकतें अशा कांहीं महत्त्वाच्या बाबतींत तो निराळाच राहातो. अशा गोष्टींना ‘संस्कृति’ असें संबोधून धर्मवेडाचें महत्त्व दिलें जातें. खरें पाहिलें असतां त्यांतील बऱ्याच बाबी मानीव रूढी असतात. जर हिंदुस्थान हें एकजिनसी राष्ट्र व्हावयाचें असेल तर हा न मिसळण्याचा दुर्गुण नष्ट झाला पाहिजे. भाषा, वारसाकायदे, वारसहक्क, विवाह, पोषाखपद्धति, बोलण्याची पद्धति, अन्न, व्यवहार वगैरे गोष्टी व्यक्तिगत जातीय किंवा धार्मिक असतां कामा नयेत. हिंदुस्थानसारख्या प्रचंड देशांत अशा सर्व बाबतींत सर्व देशभर सारखेपणा असणें शक्य नाहीं. पण त्या प्रांतिक असाव्यात. मग जिल्ह्याजिल्ह्यांत थोडा फरक असला तरी चालेल.

हें सर्व घडून येण्यापूर्वी **आमच्या दृष्टीकोनांत व संवयींमध्यें आत्यंतिक क्रांति घडून आली पाहिजे.** हरिजनासह हिंदु किंवा हिंद्वेतर जातीपैकीं कोणीही अशा तऱ्हेचा फरक होण्याला अनुकूल दिसत नाहींत. पण उलट पक्षीं प्रत्येक ‘खात्रीलायक संरक्षणाची’ मागणी करीत आहे व त्यामुळें आपलें रक्षण वृद्धि करण्याची त्यांची इच्छा आहे. कॉंग्रेसचें ध्येय जरी अखंड हिंदुस्थानचें असलें तरी सुद्धां जीवनविषयक सर्व प्रश्नांच्या बाबतींत सर्व सामान्य संस्था काढावयाच्या व विभक्तीकरण करावयाचें झालेंच तर तें अनत्याचाराच्या मार्गानें–लोकमतानें करून त्याला योग्य तो मान द्यावयाचा हें धोरण स्पष्टपणें पुढें मांडीत नाहीं. उलटपक्षीं जातीय संस्था रक्षण करण्याचें कामीं किंवा अल्पसंख्याकांच्या हक्काच्या बाबतींत कॉंग्रेस हीच सरकारपेक्षां अधिक उत्सुक दिसतें आहे.

**म्हणून मार्ग फार दूरचा व काटेरी आहे. म्हणून दरम्यानच्या कालांत एकमेकांच्या वाद मिटविण्याच्या दृष्टीनें निरनिराळे करारमदार, विचारविनिमय किंवा तत्त्वांची एकवाक्यता जरूर आहे.** मागासलेल्यांना पुढारलेल्यांच्या बरोबर आणण्याकरितांही यांची जरूरी आहे. जर राष्ट्रांतील निरनिराळ्या घटकांचें ऐक्य (एकत्रीकरण) हेंच ध्येय असेल तर या तडजोडीचे एक स्वरूप राहील; व जर निरनिराळ्या संस्था आहेत तशाच राखण्याचें ध्येय असेल तर प्रश्न निराळाच होईल.

जर एकत्रीकरणाचें ध्येय मान्य झालें "हिंदुस्थान हिंदूंका, नहीं किसीका बापका" अशा तऱ्हेचे ध्वनि बंद झाले पाहिजेत. **मग जात, धर्म किंवा वंश यावर अवलंबून असणारे अल्पसंख्य किंवा बहुसंख्य राहणारच नाहींत. सत्तेच्या दृष्टीनें जे भेद होतील ते आर्थिक होतील आणि राज्यकारभाराच्या दृष्टीनें प्रांतिक होतील.** याच कारणाकरितां दुसऱ्या प्रकारचे भेद जे होतील ते शक्य तितके वाङ्मयात्मक दृष्टीनें वृद्धिगंत झालेल्या भाषावर अवलंबून असतील. प्रत्येकानें घराच्या बाहेरच्या कारणांकरितां ज्या ठिकाणीं तो राहतो त्या प्रांताची भाषाच वापरली पाहिजे. आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें पाहिल्यास अल्पसंख्याकांनीं सरकारचे लक्ष आपल्याकडे अगोदर वेधून घेतलें पाहिजे असें नसून दुसऱ्या पक्षानें घेतलें पाहिजे असें दिसून येईल. आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले व म्हणून बहुसंख्य असणाऱ्या लोकांनाच सर्व जातिधर्मांच्या अल्पसंख्य लोकापासून संरक्षण देणें भाग होईल. पहिल्या प्रकारच्या (अल्पसंख्य) लोकावर दुसऱ्या प्रकारच्या (बहुसंख्य) लोकासंबंधींचीं कर्तव्यें लादून बहुसंख्य लोकांचे विशिष्ट हक्क ठरविण्यांत आले पाहिजेत.

हें तत्त्व मान्य केल्यास एकमेकांची ईर्ष्या आणि भिन्नभिन्न व बऱ्याच वेळेस विरोधी असणाऱ्या रूढीमुळें उत्पन्न झालेले जे भेदभाव ते मिटविण्याचा प्रश्न निरानिराळ्याच मार्गानें सुटूं शकेल. उदाहरणार्थ, ही सर्व रचना तात्का-

लिक होऊन एकत्रीकरणाकडे पूर्ण लक्ष्य ठेवून त्यांत वेळोवेळीं सुधारणा कराव्या लागतील, धार्मिक रुढींमध्यें सुद्धां बदल होईल.

शेवटीं हेंच ध्येय बरोबर आहे असें आढळून येईल. पाकिस्तान हा निराशेचा सूर आहे; अडचण सोडविण्याचा मार्ग नव्हे. जर कांहीं आकुंचित सुद्धां ध्येय असेल तर तें सुद्धां पाकिस्तानच्या या कल्पनेमुळें नष्ट होईल. मग तें, कांहीं लोकांच्या मताप्रमाणें इस्लामी साम्राज्याचें दुसरें नांव असो!

फक्त हिंदूंनीं सुद्धां या दृष्टीनें पुढें पाऊल टाकण्यास हरकत नाहीं; आणि ज्या अर्थी पाकिस्तानची कल्पना ही मुस्लीम किंवा ख्रिस्ती संस्थापेक्षां हिंदु-संस्थेचाच अंकुर आहे त्या अर्थी त्यांनींच या कार्याला सुरवात करणें हें योग्य होईल. जर हिंदूंनीं या मार्गानें जाण्याची क्रांति आपल्या आयुष्यांत घडवून आणली तर पाकिस्तानला कमजोर केल्याचें श्रेय त्यांना मिळणार आहे.

(सोशल वेलफेअर, वार्षिक अंक, १९ सप्टेंबर १९४२)

---

# " अनिचेतन "

## काँग्रेस–लीग ऐक्याची किंमत किती ?

मुस्लीम लीगच्या वार्षिक अधिवेशनाचे वेळीं अध्यक्षीय भाषणांत मि. जिनांनीं आपण बंद असलेला दरवाजा उघडीत असल्याचें ढोंग आहे. केलें आम्ही " ढोंग केलें " हा शब्दप्रयोग मुद्दामच केला आहे हें पृथक्करणावरून कळून येईल. ज्याअर्थी मोठ्या प्रमाणावर चाललेल्या ब्रिटिशांच्या सत्तेला झुगारून देण्याच्या प्रयत्नांना तात्पुरती तरी माघार घ्यावी लागली आहे त्याअर्थी पुष्कळशा लोकांना असें वाटत आहे कीं आमच्या राष्ट्रीय मागणीच्या अंमलबजावणीला मान्यता मिळविण्यासाठीं मुस्लीम लीगशीं तडजोडीची भाषा चालू करणें इष्ट आहे. हिंदी राजकारणी पुरुषांचा असा एक वर्ग आहे कीं त्यांना नेहमीं असें वाटत असतें कीं आमचा इच्छित हेतु साध्य होण्याच्या दृष्टीनें काँग्रेस लीग ऐक्य ही एक अनिवार्य अशी पूर्वपायरी आहे. या लोकांच्या या तत्त्वप्रणालीमुळें–ती कितीही चांगुलपणाची असली तरी सुद्धां—या प्रश्नाच्या बाबतींत फार मोठी गुंतागुंत होऊन गेली आहे. मुस्लीम लीगच्या प्रश्नाबाबत कांहीं लोक असे आहेत ते आरडा-ओरडा करून असें सांगतील कीं काँग्रेस–मुस्लीम ऐक्य हें साधलेंच पाहिजे. उलटपक्षी राष्ट्रीय ऐक्य कांहींही झालें तरी निर्माण झालें पाहिजे असें सांगणारे लोक आहेत. हे दोनीही लोक दोन उलट बाजूंनीं आपला हेतु साध्य करण्यास पाहात आहेत. **या दोन अंतिम टोकामध्येंच कोठें तरी समन्वय घडून आला पाहिजे.**

**ऐक्य व परस्पर सहकारित्व यांच्या मागें जाणून बुजून घडवून आणलेला ध्येय आणि मार्ग यांमधील समन्वय असला पाहिजे.** आणि जर आपल्याला मुस्लीम लीग आणि इतरांच्यामध्यें एकी घडवून आणावयाची असेल तर एकरूप ध्येयाची मांडणी करावी लागेल. नंतर परस्परांना सोयीस्कर वाटणारा असा मार्ग शोधून काढणें सोपें होईल.

आम्ही आजच्या कालाचें पृथक्करणात्मक अवलोकन करण्यापूर्वी नुकत्याच गेलेल्या कालाचें विहंगमावलोकन करणें अधिक बरें. गेल्या महायुद्धाच्या कालांत अशी एक सर्वसामान्य समजूत होती कीं ( ब्रिटीशांच्या विशिष्ट भाषापद्धतीनें बोलावयाचें झाल्यास ) जर हिंदुस्थानांतील अतिशय महत्वाच्या जमाती आणि पक्ष व त्यांचे हितसंबंध एकत्र होऊन जर आपापसांत सलोखा घडवून आणून एकमुखी मागणी करतील तर स्वयंशासित राज्यघटनेच्या दृष्टीनें फार जोरानें पुढें पाऊल टाकतां येईल. १९१५ सालीं स्वयंशासित राज्यघटना मिळविण्याचे मार्ग हा कांहीं वादाचा प्रश्न नव्हता. प्रत्येक हिंदी राजकीय पक्ष युद्धाला मदत करीत होता आणि स्वराज्याच्या बाबतींत भीक मागत होता. ब्रिटीशांच्या संबंधाबद्दल विरोध नव्हते किंवा निर्लज्ज अशा जातीय उन्मत्तपणाचे संशयही नव्हते. याच जिनांच्या मागून जाणारे बहुसंख्य मुसलमान जातीय प्रतिनिधित्वाला कधींच मान्यता देत नव्हते. मग या गोष्टीवर तुमचा विश्वास बसो अगर न बसो. शिवाय जेव्हां भिक्षेकरितां एकीची जरूरी आहे असें आढळलें तेव्हां सर्व भिकारी लखनौ करारानें एकत्र आले. लखनौ करार हा भिक्षेचा मोठ्यांत मोठा भाग मिळविण्याकरितां सर्व भिकारी एकत्र झाल्याचें ऐतिहासिक उदाहरण आहे. परंतु त्याचा परिणाम ‘ प्राणीशास्त्रांतील लोभीपणा ’ म्हणून माहीत असलली ‘ द्विदल राज्यपद्धति ’ निर्माण होण्यामध्यें झाला ही गोष्ट निराळी ! **लखनौ करारानें स्वराज्य मिळूं शकलें नाहीं. परंतु त्यामुळें जातीयवादाच्या कॅन्सरचीं मूळें मात्र आमच्या राजकीय जीवनामध्यें रुजली यांत कांहीं शंका नाहीं.** हिंदी राष्ट्रीयत्वाला पहिला उलट तडाखा बसला. आणि त्याचे नंतरचे परिणाम आम्ही आजही भोगीत आहोंत. जर आमचें ध्येय गांठण्यात भीक मागण्याचा उत्तम मार्ग असेल तर कॉंग्रेस नसेल तर उदार मतवादी ते नसतील

तर आणखी दुसरा एखादा राजकीय पक्ष उद्भवून तो आपली भिक्षेची मागणी यशस्वी होण्याचे दृष्टीनें एखादा मार्ग शोधून काढील असें म्हणण्यांत कांहींच चूक होणार नाहीं. राजगोपालाचार्य आणि इतर कांहीं मूठभर समाजवादी लोक हल्लीं बऱ्याच आनंदानें बोलत असतात परंतु त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. अपेशी क्रिप्स्च्या देणगीवरून ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली आहे कीं 'पक्षोपक्ष, जमाती आणि हितसंबंध' यांमध्यें जरी पूर्ण एकी घडून आली तरीसुद्धां ब्रिटिश लोक आपली सत्ता सोडण्यास तयार होणार नाहींत. म्हणून भीक मागण्याचा कांहींच उपयोग नाहीं. जर ब्रिटिशांचीं हृदयें दयेनें ओली करण्याची कोणी आशा करत असेल तर त्याकडे कोणीही लक्ष देणार नाहीं. हें सर्व आतां सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट झाले आहे.

**'भीक मागूं नका, पण हिसकून घ्या' हा स्वातंत्र्याचा नवीन मंत्र आहे.** हिंदु-मुसलमानामधील एकसूत्रता आतां स्वातंत्र्याची भीक मागण्याकरितां नको असून स्वातंत्र्य घेण्याकरितां पाहिजे आहे. हें मूलभूत तत्त्व स्वीकारण्याकरितां मुस्लीम लीगचें मन वळविणें शक्य आहे काय ? हल्लींचें तिचें धोरण "**ब्रिटिशांकडून भीक मागा, पण दुसऱ्याकडून हिसकून घ्या**" या शब्दांनीं थोडक्यांत सांगतां येईल. पण हें धोरण चालणार नाहीं. मन वळविण्याची व जुलमाच्या कृति बदललीं पाहिजेत. जिनांना हें कळल्याशिवाय प्रगति अशक्यच आहे. ज्यांना ज्यांना कॉंग्रेस-लीग एकीबद्दल वरचेवर बोलावेसें वाटतें त्यांना त्यांना या सत्तत्वाचा विचार करावा लागेल. जर जिनांना पाकिस्तान पाहिजेच असेल तर हिंदी लोकांचें मन वळवून किंवा आपसांतील युद्धानें या दोन मार्गांनीं मिळवितां येईल. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास त्यांचे मार्ग मन वळविण्याचे नाहींत. म्हणूनच गांधीजी तुरुंगांत असतांनाच त्यांच्या मन वळविण्याच्या शक्तीकडे पाहून जिना त्यांना विनंति करीत असतात; परंतु जर जिनांना हें निश्चित पाहिजे असेल तर त्यांनीं स्वतःच या मार्गाचें अवलंबन कां करूं नये ? त्यांचें वय आतां इतकें झालें आहे कीं वागणुकीची पद्धति आतां त्यांना बदलणें शक्य नाहीं. अशी त्यांच्याकडून अपेक्षा करणें हेंही थोडेसें कठोरपणाचें होईल. परंतु वागणुकीची पद्धति म्हणजे आपल्या हेतुचें

बाह्य स्वरूप होय. त्यांचा हेतु खरंच मन वळविण्याचा आहे काय? मुसलमाना-इतकेंच त्यांचे हित साधणाऱ्या कार्यक्रमांत स्वतःचें सहाय्य पाहिजे अशी जर सर्वसामान्य हिंदी समाजाची त्यांना खात्री करून द्यावयाची असेल तर त्यांनीं हिसकून घेण्याच्या पद्धतिचा अवलंब केला पाहिजे. ते भुंकतात परंतु चावण्या-ऐवजीं ब्रिटीशांचे बूट चाटतात. यामुळेंच खरी अडचण निर्माण होते.

सिंधमध्यें ज्यावेळीं अल्लाबक्षानें सरसकट ब्रिटीश मुस्कटदाबीचा आणि ॲटलान्टिक चार्टर हिंदुस्थानला लागूं नाहीं या चर्चिलच्या घोषणेचा निषेध केला त्यावेळीं मुस्लीम लीगचें कांहीं नुकसान झालें असें नसतांनासुद्धां गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांनीं गव्हर्नरशीं जो अपवित्र करार केला त्याला जिनांनीं मान्यता दिली. हें त्यांच्या गर्जनेविरुद्ध आहे. हा जर कडू घोट असेल तर त्यांनीं आपण होऊनच मागितलेला होता. मग त्यांनीं तक्रार कां करावी ? ह्याच गोष्टीची पुनरावृत्ति बंगालमध्येंही झाली. मि. जिनांनीं ही गोष्ट जाणली पाहिजे कीं हल्ल्याच्यावेळीं ईशान्येकडील पाकिस्ताननें आपलें तात्पुरते सरकार वायव्येकडे स्थापलें पाहिजे. ही त्याची सामाजिक घटना झाली. पंजाबला ब्रिटीश राजसत्ता पाहिजे असें दिसतें. बाह्य अनुकूल चिन्हें असतांनासुद्धां जिनांना लीगची परिस्थिति अस्थिर दिसतें तें बरोबरच आहे शीख आणि जाट हे सहजासहजीं त्यांच्या गोटांत जाऊं शकणार नाहींत; आणि जिनांना आपली इच्छा पूर्ण करण्याचे अगोदर पंजाबांत अन्तर्गत सामने होतील.

मग त्यांनीं तुरुंगांत महात्मा गांधींच्या जवळ मागणी केली आहे तिचें काय ? आपल्या मुख्य उस्तादाकडून शिकलेला डाव असावा अशी शंका कोणीही शहाण्या माणसाला येणें स्वाभाविक आहे. उघड उघड कारणा-साठीं ब्रिटीश लोक त्यांच्या पाकिस्तानच्या बाबतींत स्वतःला गुंतवून घेत नाहींत.

त्यांना आपल्या हेतुसिद्ध्यर्थ एक प्रकारचा विस्कळितपणा पाहिजे, परंतु त्याच्याकडे ते वळणावळणांनीं जातात; कारण या युद्धकालांत त्यांना गंभीर परिस्थिति निर्माण करावयास नको आहे.

त्यांना गुरखे, शीख मराठे आणि हिंदी सैन्यांतील इतर हिंदु तुकड्यांची राजनिष्ठा पायाखालीं तुडविणें शक्य नाहीं. परंतु आतां अतिशय प्रेमळ व त्यांना बोलावणाऱ्या परंतु दुसऱ्याच क्षणीं दूर राहून निराळेपणानें वाग-

णाऱ्या अशा स्वभावाच्या त्यांच्या प्रियेकडून ते केव्हां केव्हां हैराण केले जातात. कित्येक वेळेस ते हिंदुस्थान हें एक छोटेसें खंड आहे व त्यांत महान् मुस्लीम राष्ट्राच्या बाता बोलतात तर दुसऱ्या वेळीं मानवी इच्छेच्या पलिकडे असलेल्या भौगोलिक ऐक्याबद्दल गप्पा मारतात. त्याचें काय करावयाचें हेंच त्यांना माहीत नाहीं. म्हणूनच त्यांना महात्माजीपासून पत्र पाहिजे. तें पत्र ब्रिटीशांच्या तोंडावर फेकून म्हणतील; " हें पहा ! मी हें काय मिळविलें आहे. तुम्ही हेंच वचन मला द्या. मला धीर आहे. परंतु न मोडण्याजोगें वचन तुम्ही मला द्या. आणि मग आम्ही कायमपणें व नंतरही सुखासमाधानानें नांदूं ! " अशा रीतीनें **दोन्हीही जगांतील उत्तम गोष्टींची त्यांना इच्छा आहे.**

जर युद्धाचे शेवटीं ब्रिटीश सत्ता कायम राहिलीच तर आम्ही ब्रिटीशांना युद्धकालांत त्रास दिला नाहीं असें तें म्हणतील. जर युद्ध परिस्थितिमुळें ब्रिटी-शांना सत्तात्याग करावा लागला तर ब्रिटीशांपासून आम्ही फुटून वागलों हें त्यांचें म्हणणें पुढें येईलच. **या युद्धांत कोणाचाही पराजय झाला तरी पाकिस्तानकरितां तें जिंकण्याची त्यांची मनिषा आहे.** जिना हे फार हुषार नाहींत. त्यांना धुळीशिवाय खजूर—युद्धाच्या धुळीशिवाय विजयाचा खजूर—पाहिजे. कारण एकदांच त्यांनीं चूकीचें मापन केलें आहे. जर हीच खरोखर त्यांची इच्छा असेल तर ती साध्य करण्याचा दुसराही मार्ग आहे. त्यांना पाकिस्तान पाहिजे अशी त्यांची खात्री आहे काय ? सत्ता मिळविण्याच्या मार्गांतील खरें संकट म्हणजे सत्ताधीशच असतो. **आज कोट्यावधी-लोकांचें भवितव्य ठरवितांना कोणत्याही एकाच मनुष्यानें सही करून भागणार नाहीं. मग गांधीजींनी पाकिस्तानला मान्यता द्यावी अशी त्यांची मनीषा कां असावी ?** या आश्चर्यजनक भूमींतून ब्रिटीशांना हांकलून दिल्यानंतर मग जिनांना दुसऱ्या कोणत्याही मार्गानें बाकीच्या हिंदुस्थानाकडून स्वखुषीची मान्यता मिळवितां येईल. प्रत्यक्ष अंमलांत येण्याच्या पूर्वींच कॉंग्रेस लीगचे कृतीच्या ठिकाणचें ऐक्य विचारांत तरी साधतां येईल. परंतु हेंसुद्धां सोपें काम नाहीं. बंगाल हा लष्करी प्रान्त आहे. पंजाब हा सुद्धां ब्रिटीशांचा लष्करी प्रान्त आहे. सिन्धमध्यें थोड्या महिन्यापेक्षां अधिक कालपर्यंत लष्करी कायदा होता. एकंदरींत परिस्थिती त्यांच्या उलट

आहे ? त्यांत कांहीं सत्यांश आहे काय ? त्यांनीं त्याबद्दलचा विचार फार थोड्या कसोशीनें गृहीत धरल्यासारखें दिसतें.

म्हणूनच मि. जिनांनीं आपल्या तरवारीचा आवाज करून जर गांधीजी-कडून मुत्सद्दीपणाचें उत्तर मिळण्याला परवानगी दिली नाहीं तर त्याचा परिणाम वाईट होईल अशी लिनलिथगो यांनीं यांना दहशत देण्याचें कारण नाहीं. व्यक्तींच्या दृष्टीनें राजकारणाचा विचार करण्याऐवजीं लोकांच्या दृष्टीनें विचार करण्याचा काल आतां आला आहे. महात्मा गांधी आणि महमद अली जिना यांनीं रंगभूमि सोडल्यावर बऱ्याच कालानंतर हिंदुस्थानांतील मुसलमान आणि इतर लोक यांना सुखासमाधानानें एकत्र राहाण्याच्या प्रश्नाचा विचार करावा लागेल. त्यांना आपला निश्चय फारच जलद ठरवावा लागेल. गेले पुष्कळ महिने आणि वर्षे जसे ते करत आले त्याचप्रमाणें या पुढेंही दुसऱ्याकडून भांडून घ्या व ब्रिटीशाकडून भीक मागा असेंच धोरण ते चालविणार आहेत काय ? तर मग ते परिस्थितीचा चांगला फायदा घेत आहेत म्हणावयाचें ! आणि हेंच धोरण त्यांनीं युद्ध संपेपर्यंत चालू ठेवावें. त्यांच्याच बोलण्यावरून हें स्पष्ट दिसत आहे. जर त्यांचा कडुपणाचा पेला खरोखर पूर्ण भरला असेल तर त्या कडुपणामुळें कृतीची सर्व शक्ति नष्ट होण्यापूर्वींच त्यांनीं आपली कृति पूर्ण केली पाहिजे. ज्या अर्थी मागणी करून उपयोग होत नाहीं. त्या अर्थी याच पायावर उभारलेलें ऐक्य कवडी किंमतीचें होईल हें कॉंग्रेस लीग ऐक्याचें तुणतुणें वाजविणाऱ्यांनीं पूर्णपणें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. म्हणूनच राज-गोपालाचार्यांच्या कांहींही झालें तरी एकी करण्याच्या आरडाओरडीला साथ देणारे फारसे लोक भेटत नाहींत. पाकिस्तान हें बऱ्याच मोठ्या लोकसमुदायाला नावडतें आहे. जर ब्रिटीश सत्तेच्या जोडीला ( ulsterisation ) मिळवावयाचें असेल तर लोकांनीं तरी हें तत्त्व कसें मान्य करावें ?

दुसऱ्या कोणत्याही लोकांप्रमाणेंच अखिल भारतांतील बहुसंख्य मुसलमान ब्रिटिशांच्या विरुद्ध आहेत यात कांहींच शंका नाहीं ! परंतु आज त्यांना दुःख होत आहे. लष्करी कायद्याच्या अंमलाखालील सिंधचें मुस्लीम आणि लष्करी हेतुमुळें उत्पन्न झालेल्या चमत्कारिक परिणाम भोगणाऱ्या पूर्वबंगालमधील मुसलमान यांना दुसऱ्यांनीं धडे शिकविण्याची जरूरी नाहीं. त्यांना काय पाहिजे असेल तर कृतीची हांकच होय. महात्मा गांधीं आणि जिना जेव्हां एकाचें

न्यासपीठावर उभे राहतील तो दिवस हिंदु आणि मुसलमान दोघांनाही सुखाचा होईल असें मि. जिना म्हणतात तें खरें आहे. आणि अशा प्रकारचें न्यासपीठ त्यांना त्यांच्या आयुष्याच्या शेवटीं खुणावीत आहे. त्यांनीं ताठ उभे राहून ब्रिटिशांना पाकिस्तानच्या बाहेर हांकून द्यावें. आम्ही त्यांचेकडे नकाशे मागत नाहीं ! किंवा लोकमताचीही मागणी करीत नाहीं ! जर ' हिंदुस्थान सोडा ' या पायावर आपली जोराची चळवळ केली असती तर मुसलमानेतर लोकांकडून मुसलमानांच्या हितसंबंधाला संमती मिळविण्याच्या बाबतींत फार मोठी प्रगति केली असती. तर्काच्या विसंगतीकडे दुर्लक्ष केलें असते; आणि भव्य अंतःकरणाच्या उदारतेनें तत्व अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें उत्पन्न होणाऱ्या अडचणी मिटविल्या असत्या.

सर्वसामान्य संकटें एकत्रपणानें भोगण्यामुळें उत्पन्न होणाऱ्या मैत्री-इतकी दुसरी अधिक मोठी अशी मैत्रीच नाहीं. त्यांना अशा तऱ्हेची मैत्री मुस्लीम आणि इतरांमध्यें स्थापन करतां येवो ! त्याशिवाय त्यांना योग्य संशय येतो त्याप्रमाणेंच पाकिस्तान हें ब्रिटिशांच्या सत्ता खेळांतील एक बाहुलें झालें आहे असें आढळून येईल. मि. जिनांनीं भारताच्या एका जमातीच्या मनांत फार उच्च स्थान प्राप्त करून घेतलें आहे यांत शंका नाहीं. त्यांना आपल्या जन्मभूमींत स्थिर आणि चिरकालीन पद प्राप्त करून घेतां येईल काय ?

फ्री प्रेस जर्नल, १४ मे, १९४३.

# परिशिष्ट १ लें

## गांधीजींचा गीतेचा अर्थ.

आतां गीतेच्या संदेशासंबंधीं.

१८८८-८९ मध्यें सुद्धां, ज्यावेळीं प्रथमच माझा गीतेशीं परिचय झाला त्यावेळीं मला असें वाटूं लागलें कीं गीता हा कांहीं ऐतिहासिक ग्रंथ नसून मानवी अन्तःकरणांत जें चिरकालीन द्वंद्व चालूं असतें त्याचें युद्धाच्या स्वरूपांत वर्णन केलेलें आहे. आणि बाह्य युद्धाचा उपयोग अन्तर्द्वंद्व अत्यंत स्पष्ट मनोरंजक स्वरूपांत दिसावें म्हणूनच केलेलें आहे. ही माझी प्रारंभींची अन्तःस्फूर्ति, जसा जसा धर्मांचा व गीतेचा निकट अभ्यास होऊं लागला तस तशी दृढतर होत गेली. महाभारताच्या अभ्यासानें तर त्याला आणखी दृढता आणली. सर्वमान्य अशा अर्थानें महाभारत हा इतिहास ग्रंथ आहे असें मी मानीत नाहीं. आदिपर्वांत माझ्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ फार जोराचा पुरावा आहे. मुख्य पात्रांचे उद्भव अतिमानुष किंवा अमानुष (मानुष्याच्या खालच्या पायरी वरील) आहेत असें दाखवून महान् व्यासांनीं राजांच्या व त्यांच्या राष्ट्रांचा इतिहास लिहिण्याचें काम जवळ जवळ कमी करून टाकलें आहे. महाभारतांतील व्यक्ति या ऐतिहासिक असतील; पण ग्रंथकर्त्यानें त्यांचा उपयोग आपलीं धार्मिक मतें स्पष्ट करण्याकरितां केला आहे.

महाभारताच्या ग्रंथकर्त्यानें युद्धाची जरूरी प्रतिपादन केली नसून उलट पक्षीं त्याचें वैय्यर्थ्यच सिद्ध केलें आहे. त्यानें जयी लोकांना दुःखमिश्रित पश्चात्तापाचे अश्रु गाळावयास लावले असून दुःखाशिवाय त्यांना कांहींही ठेवलेलें नाहीं.

या महान् ग्रंथाचा गीता हा मुकुट आहे. दुसऱ्या अध्यायांत युद्धाचें नियम सांगण्याऐवजीं स्थितप्रज्ञ मनुष्य कसा ओळखावा हें त्यांत सांगितलें आहे. स्थितप्रज्ञ मनुष्याच्या लक्षणामध्यें लढाईच्यासंबंधीं कांहीं आहे असें मला तरी आढळत नाहीं. गीतेची एकंदर रचना युद्धमान पक्षांच्या एकमेकामधील वागणुकीच्या नियमांना अगदींच विसंगत आहेत.

गीतेचा कृष्ण हा स्वयंपूर्ण व मूर्तिमान् सत्यज्ञान आहे; परंतु हें चित्र काल्पनिक आहे; याचा अर्थ असा नव्हे कीं आपल्या लोकांकडून पूजिला गेलेला कृष्ण कधीं झालाच नाहीं. परंतु त्याची पूर्णता काल्पनिक आहे. पूर्णावताराची कल्पना नंतर उद्भवली.

हिंदुधर्मांत मानवजातीची असामान्य सेवा करणाऱ्याला अवतार मानण्याची प्रथा आहे. सर्व मूर्तिमान जीव हे परमेश्वराचे अवतारच होत; परंतु प्रत्येक प्राणी हा अवतार मानला जात नाहीं. मागच्या पिढींत जो आपल्या वागणुकींत असामान्य रीतीनें धार्मिक असेल त्याला पुढील पिढी अतिशय मान देते. या प्रकारांत मला तरी कांहीं चूक दिसत नाहीं; परमेश्वराच्या मोठेपणापासून ते कांहींच काढून घेत नाहीं किंवा त्यांत सत्यापलापही नाहीं. ऊर्दुमध्यें अशी एक म्हण आहे व तिचा अर्थ "आदम हा ईश्वर नाहीं परंतु तो दिव्यत्वाची ज्योत आहे" असा आहे. आणि म्हणूनच जो अतिशय धार्मिकपणानें वागतो त्याच्या ठिकाणीं दिव्यत्वाची उज्ज्वल ज्योत आहे. या विचारसरणीनें पाहिल्यास कृष्ण हा हिंदुधर्मांतील पूर्णावतार मानला जातो.

अशा तऱ्हेच्या अवतारावरील विश्वासावरून मनुष्याची धार्मिक महत्वाकांक्षा कळून येते. मनुष्य परमेश्वरासारखा होईपर्यंत तो आहे तसाच संतुष्ट असूं शकत नाहीं. या पायरीला पोंचण्याचा प्रयत्न सर्वश्रेष्ठ आहे व ही महत्त्वाकांक्षा प्रत्येकानें बाळगण्यासारखी आहे. यालाच स्वयंज्ञान म्हणतात. हेंच स्वयंज्ञान सर्व शास्त्राप्रमाणें गीतेचा विषय आहे. परंतु तिच्या ग्रंथकारानें हें तत्त्व प्रस्थापित करण्याकरितांच गीता खात्रीनें लिहिली नाहीं. गीतेचा उद्देश या स्वयंज्ञानाचा उत्तम मार्ग कोणता हेंच दाखविण्याचा आहे असें मला दिसतें.

हिंदु धर्माच्या धार्मिक पुस्तकांतून इकडे तिकडे जें कांहीं स्पष्ट अगर अस्पष्ट पसरलेलें आहे तेंच शक्य तितक्या सुस्पष्ट भाषेंत पुनरावृत्तीचा दोष पत्करूनही गीतेंत सांगितलें आहे.

तो एकमेव अतुलनीय मार्ग म्हणजे कर्मफलत्याग होय.

याच मुख्य केंद्राभोंवतीं गीताजाल विणलेलें आहे. त्याग हा मध्यवर्ती सूर्य असून त्याच्याभोंवतीं भक्ति, ज्ञान आणि इतर गोष्टी ग्रहाप्रमाणें फिरत आहेत. शरीर हा एक तुरुंग आहे. कृतीशिवाय शरीर असूं शकत नाहीं. कर्म कोणालाही सुटलेलें नाहीं. आणि तरीसुद्धां सर्व धर्म असें सांगतात कीं हें शरीर हें परमेश्वराचें देऊळ समजून मनुष्याला मुक्ति मिळविणें शक्य असतें. आपलें प्रत्येक कर्म मग तें कितीही हलकें असलें तरी तें **लांच्छित** असतें. शरीर हें परमेश्वराचें देऊळ कसें बनूं शकेल? दुसऱ्या शब्दांत बोलावयाचें झाल्यास मनुष्य हा कर्मापासून कसा मुक्त होईल म्हणजेच पाप लांच्छनापासून कसा मुक्त होईल? गीतेनें या प्रश्नाचें निर्णयात्मक भाषेंत उत्तर दिलें आहे. " अनासक्ति कर्मानें; कर्मफलत्यागानें, सर्व कर्में ईश्वरार्पण केल्यानें म्हणजेच आपलें शरीर आत्मार्पण करून होय."

फक्त बोलून अनासक्ति किंवा कर्मफलत्याग अंगीं बाणत नाहीं; किंवा बुद्धीसामर्थ्याच्या जोरावरही तो आणतां येत नाहीं. तो अविरत हृदय-मंथनानेंच येतो. मोक्ष मिळविण्याकरितां सम्यग्ज्ञानाची जरूरी आहे. विद्वान् माणसांना कांहीं विशिष्ट ज्ञान असतें. ते स्मरणानें वेद म्हणतील; परंतु स्वार्थी-तच गुरफटलेले सांपडतील. ज्ञान हें उन्मार्गगामी होऊं नये म्हणून गीतेनें त्याच्या जोडीला भक्ति सांगितली असून तिला पहिलें स्थान दिलें आहे. भक्ति-शिवाय ज्ञान हा दुरूपयोगित अग्नि होईल. म्हणूनच गीता म्हणते, " भक्तिची कांस धरा कीं ज्ञान आपोआप येईल. " ही भक्ति म्हणजे फक्त तोंडपूजा नसून मृत्यूबरोबरचा झगडा आहे. म्हणूनच गीतेंतील भक्तीचीं लक्षणें हीं ऋषीच्या लक्षणाप्रमाणेंच आहेत.

अशा रीतीनें गीतेला पाहिजे असलेली भक्ति म्हणजे करुणार्द्र मनाचें स्पंदन नव्हे. अंधश्रद्धा तर नव्हेच नव्हे. गीतेच्या भक्तीचा बाह्य गोष्टींशीं फारच थोडा संबंध आहे. एखाद्या भक्तानें माळांचा गंध-

तिलकांचा उपयोग करावा, नैवेद्य दाखवावा, परंतु या गोष्टीवरून त्याच्या भक्तीची परीक्षा होणार नाहीं. तो निर्द्वेष, दयार्द्र, निरहंकारी, निरभिमानी, समशीतोष्णसुखदुःख, क्षमाशील, शांत, दृढनिश्चयी, ईश्वरार्पितमनचेता, भयाकर्ता, निर्भय, स्तुतिदुःखभीतिहीन, पवित्र, कर्मकुशल, असूनही निर्लिप्त, सुष्टदुष्टफलत्यागी, शत्रुमित्रांच्या ठिकाणीं समबुद्धी, आदरानादरास्पृष्ट, स्तुतीनें न फुगणारा, किंवा लोकनिंदेनें मान खालीं न घालणारां, एकान्तप्रिय व शासितबुद्धी असतो. अशा तऱ्हेची भक्ति ही आसक्तीशीं अंगदींच विसंगत असते.

अशारितीनें खरा भक्त होणें म्हणजेच स्वतःला ओळखणें होय हें आपण पाहिलेंच. स्वयंज्ञान हें यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. एक रुपयांत आपल्याला विष किंवा अमृत विकत घेतां येतें; परंतु ज्ञान किंवा भक्ति यापैकीं कशामुळेंही मोक्ष किंवा बंध विकत घेऊं शकत नाहीं, हे कांहीं विनिमयाचे माध्यम नाहींत. या आम्हांला पाहिजे असलेल्या गोष्टी आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास, जरी मार्ग आणि साध्य हे एकरूप नसले तरी ते बरेचसे सारखे असतात. या मार्गाचें अंतिय साध्य मोक्ष असतें. गीतेंत सांगितलेला मोक्ष म्हणजे पूर्ण शांति होय.

अशा प्रकारचें ज्ञान आणि भक्ति हीं जर कसोटीला टिकावयाचीं असतील तर कर्मफलानासक्ति पाहिजे हेंच खरें. सद्सदाचा विवेक असणें हेंच फक्त मुक्तीला योग्य करतें असें नाहीं. सामान्य मताप्रमाणें विद्वान् मनुष्य पंडित म्हणून गणला जाईल. त्याला कोणतीही सेवा करण्याची जरूरी नाहीं. एखादा लहानसा लोटा उचलणं हेंही त्याला बंधन वाटेल. ज्या ठिकाणीं ज्ञानाची एक कसोटी सेवा न करणें हीच आहे; त्या ठिकाणी लोटा उचलण्यासारख्या कामाला जागाच नाहीं.

किंवा भक्ति घ्या. लोकांच्या मनाप्रमाणें भक्ति म्हणजे मन मऊ असणें, माळ घेऊन जप करणें, व या जपांत खंड पडूं नये म्हणून आवडती सेवाही न करणें ही होय. या भक्तीमध्यें तो मनुष्य खातो, पितो, किंवा इतर अशाच क्रिया करतो, परंतु तो धान्य दळणार नाहीं किंवा रुग्णांची परिचर्याही करणार नाहीं.

परंतु गीता सांगते " कर्माशिवाय कोणालाही सिद्धि प्राप्त झालेली नाहीं. जनकासारख्यांनाही कर्मानेंच मोक्ष मिळाला. मी सुद्धां आळसानें जर कर्मत्याग करीन तर जग नाश पावेल. मग सर्वसामान्य लोकांना कर्म करणें किती जरूरीचें आहे बरें ? "

एका बाजूनें कर्म हें बंधनस्वरूप आहे तर दुसऱ्या बाजूनें सर्व प्राणि-मात्रांना त्यांची इच्छा असो अगर नसो कर्म हें केलेंच पाहिजे हें तितकेंच खरें आहे. येथें कर्मामध्यें मानसिक किंवा शारिरीक दोन्हीही हालचालींचा अन्तर्भाव होतो. जरी कर्म करीत असला तरी कर्मबंधापासून तो कसा मुक्त होईल ? गीतेनें ज्या पद्धतीनें हा प्रश्न सोडविला ती पद्धत मात्र माझ्या ज्ञानाप्रमाणें अद्वितीय आहे. गीता सांगते–" आपलें नियमित कर्तव्य करा; पण फलासक्तीचा त्याग करा. अनासक्तीनें कर्म करा. कामासंबंधीं बक्षीसाची अपेक्षा करूं नका. "

हीच गीतेची अचूक शिकवण आहे. जो कर्मत्याग करतो त्याचें पतन होतें; व जो फलाचा त्याग करतो तो चढतो. परंतु फलत्यागाचा अर्थ साध्या-कडे दुर्लक्ष्य असा नव्हे. प्रत्येकाला आपल्या कर्माचें फळ, तें प्राप्त होण्याचे मार्ग व हें जाणण्याची ताकद असली पाहिजे. अशा रितीनें साधनसंपन्न असलेला मनुष्य जर आपलें काम यथायोग्य रितीनें करण्यांत गढून गेला असेल व त्याचवेळीं फलाची आसक्ति त्याच्या मनांत नसेल तर त्याला कर्मफल-त्याग म्हणतात.

फलत्याग करणाऱ्यास फल न मिळणें असा फलत्यागाचा अर्थ कोणीही समजूं नये. गीतेच्या वाचनामुळें असा अर्थ निघूं शकत नाहीं. अनासक्ती म्हणजे फलाची इच्छा टाकणें होय. खरोखर जो त्याग करतो त्याला हजारों मार्गांनीं लाभ होतो. गीतेंतील त्याग म्हणजे श्रद्धेची कसोटीच होय ! जो कोणी फलाबद्दल विचार करतो त्याची कार्यशक्तीच कमी होते. तो उतावीळ बनून क्रोधाविष्ट होतो व अयोग्य गोष्टी करूं लागतो; कर्म सोडून देतो व कशाशींही प्रामाणिक राहूं शकत नाहीं. परिणामाबद्दल विचार करणारा मनुष्य हा विषयोपभोगी पुरुषाप्रमाणें असतो. त्याचें मन कधींही विचलित होत नाहीं. तो सर्व नीतिनियम झुगारून देतो आणि आपलें साध्य गांठण्यासाठीं बऱ्या वाईट मार्गांचा अवलंब करतो.

फलवांच्छेपासून झालेले दुष्परिणाम पाहूनच गीतेच्या कर्त्यानें फलत्याग मार्ग शोधिला व अत्यंत खात्रीलायक पद्धतीनें जगाच्या पुढें मांडलेला आहे. धर्म हा ऐहिक कल्याणाच्या विरुद्ध असतो अशी कल्पना आहे. आम्ही पुष्कळसे ऐहिक शहाणे लोक असें म्हणतांना ऐकतो कीं—" व्यापारविषयक किंवा तशा दुसऱ्या प्रकारच्या ठिकाणीं धर्मप्रमाणें वागतां येत नाहीं. अशा प्रकारच्या मार्गांत धर्माला स्थान नाहीं. फक्त मोक्षाकरितांच आहे. " माझ्या मनाप्रमाणें गीतेच्या कर्त्यानें हा भ्रम दूर केला आहे. त्यानें मोक्ष आणि ऐहिक व्यवहार यांत कांहीं फरक केला नाहीं. उलटपक्षीं त्यानें असें दाखविलें आहे कीं, आपल्या व्यवहारांतही धर्माचें अधिष्ठान अवश्य पाहिजे. धर्म कशाला म्हणूं नये हें गीता सांगतें असें मला वाटतें.गीतेप्रमाणें अनासक्तीशिवाय जीं कर्में करतां येत नाहींत ती होत. या सुवर्णनियमामुळें पुष्कळशा लोकांचा खांच खळग्यापासून बचाव झालेला आहे. या अर्थाप्रमाणें खून, खोटें बोलणें, तामसीपणा आणि तत्सम प्रकार हे सर्व पापयुक्त म्हणून अधर्म आहेत. मानवी जीवित नंतर साधें होतें व साधेपणापासूनच शांतीची निर्मिति होते.

अशा तऱ्हेनें विचार करीत असतां मला असें वाटूं लागलें कीं, गीतेचें मध्यवर्ति तत्त्व आपल्या आयुष्यांत आणावयाचें झाल्यास आपल्याला सत्य अहिंसा यांचें पालन केलेंच पाहिजे. जेथें फलाकांक्षाच नाहीं, तेथें असत्याचा व्यामोह किंवा हिंसा असूंच शकणार नाहीं. असत्य किंवा हिंसा यांचें कोणतेंही उदाहरण घ्या म्हणजे तुम्हांला असें आढळून येईल कीं, त्याच्या पाठीमागें आपल्या आवडत्या इच्छा तृप्त करण्याची आकांक्षा असते. परंतु हेंही मोकळेपणानें मान्य केलें पाहिजे कीं, गीता कांहीं अहिंसा स्थापित करण्याकरितां लिहिलेली नव्हती. गीतायुगापूर्वींही ( अहिंसा ) हें सर्वमान्य आणि प्रथम कर्तव्य होते. गीतेला फक्त फलत्यागाचा संदेश द्यावयाचा होता. हें २ऱ्याच अध्यायांत स्पष्टपणें सांगितलें आहे.

मग जर गीतेचा अहिंसेवर विश्वास होता; किंवा त्यांत अनासक्तीचा अन्तर्भाव झालेला आहे, तर मग कर्त्यानें लढाईचें उदाहरण कां घेतलें ?

कवि ज्यावेळीं कोणतेंही तत्त्व लोकापुढें मांडतो त्यावेळीं त्याला तें तत्त्व किंवा त्याचे परिणाम माहीत असतात किंवा माहीत असूनही तो ते पूर्णपणें

सांगूं शकतोच असें नाहीं. यांतच कदाचित् कवि आणि कविता यांचा मोठे-पणा असूं शकेल. कवीचा अर्थ अमर्याद असतो. मानवाप्रमाणेंच मोठ्या लोकांच्या लिखाणांची अर्थांत उत्क्रांति होत असते. भाषांचा इतिहास आपण पाहिला तर महत्त्वाच्या शब्दांचा अर्थ बदलला आहे; किंवा विस्तृत झाला आहे असें आढळून येईल. गीतेबद्दलसुद्धां हेंच खरें आहे. खुद्द गीताकारानेंच कांहीं चालू शब्दांचे अर्थ विस्तृत केले आहेत, हें आपणांला वरवर पाहिलें असतांहि कळून येण्यासारखें आहे. गीतापूर्वकालांत पशूंचे हवनाला मान्यता असणें संभवनीय आहे. परंतु त्याचा गीतेच्या अर्थानें जें हवन आहे त्यांत अंशसुद्धां नाहीं. गीतेमध्यें परमेश्वराचें अविरत ध्यान हा यज्ञांचा राजा आहे. तिसऱ्या अध्यायांत विशेषतः यज्ञ म्हणजे सेवेकरितां शरीरकष्ट करणें असा आहे असें दिसते. तिसरा आणि चौथा अध्याय मिळून वाचल्यास त्यांतून यज्ञाचा दुसराच अर्थ निघतो. परंतु पशुयज्ञ हा अर्थ कधींच निघूं शकत नाहीं. त्याच-प्रमाणें गीतेमध्यें संन्यास या शब्दाचा अर्थही बदललेला आहे. गीतेच्या संन्याशाला संपूर्ण कर्मत्याग मान्य नाहीं. गीतेचा संन्यास म्हणजे सर्व कर्म करून अकर्मी होणें होय. याप्रमाणें गीताकारांनीं शब्दांचे अर्थ विस्तृत करून आपलें अनुकरण करण्यास आम्हांला शिकविलें आहे. गीतेच्या शब्दाप्रमाणें फलत्याग आणि युद्ध हें सुसंगत आहेत असें म्हणतां येईल हें आपण मान्य करूं शकूं. परंतु गीतेची शिकवणूक पूर्णपणें आयुष्यांत आणण्या-संबंधीं जो माझा ४० वर्षांचा अविरत भगीरथ प्रयत्न झाला त्यावरून अत्यंत आदरपूर्वक मी असें सांगतो कीं जर आपल्याला पूर्ण फलत्याग घ्यावयाचा असेल तर त्यासाठीं सर्व प्रकारची अहिंसा स्वीकारलीच पाहिजे.

गीता हा ग्रंथ नसून ते एक महान् धार्मिक काव्य आहे. जितके जितके अधिक खोल आपण जाऊं तितका अधिकाधिक संपन्न अर्थ आपणांस मिळेल. ती सर्वसामान्य लोकांसाठीं असल्यामुळें त्यांत अत्यंत गोड अशी पुनरुक्ति आहे. युगायुगाबरोबर शब्दांना नवनवीन व विस्तृत अर्थ प्राप्त होतो; परंतु त्याची मध्यवर्ति कल्पना कधींच बदलत नाहीं. मध्यवर्ति कल्पना आपल्या आचरणांत आणण्याकरितां या अमूल्य ठेव्यामधून कोणताही अर्थ संशोधकानें शोधून काढावा.

गीता कार्य आणि अकार्य सांगण्याकरितां नाहीं. जें एकाद्याला कायदेशीर असेल तेंच दुसऱ्याला बेकायदेशीर वाटेल. जे आज करणीय असेल तेंच उद्यां अकरणीय ठरेल. फलाकांक्षा हीच सार्वत्रिक अकरणीय आहे. अनासक्ति अनिवार्य आहे.

गीतेनें ज्ञानाचें पोवाडे गायले आहेत. परंतु तें बुद्धीच्या पलीकडे असून अन्तःकरणाला उद्देशून आहेत; व अन्तःकरणाला समजण्यासारखें आहेत. म्हणूनच गीता अश्रद्धांकरितां नाहीं. कृष्ण म्हणतो–

**इदं ते नात पस्काय नाभक्ताय कदाचन।**
**न चाशुश्रूषवे वाच्यं नच मां योऽभ्यसूयति॥**
**यः इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।**
**भक्ति मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः॥**
**श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः।**
**सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान् प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम्॥**

यंग इंडिया ऑगस्ट ६, १९४२.

# परिशिष्ट २ रें

## मौलाना अझाद यांनीं केलेला कुराणाचा अर्थ

कॉंग्रेसमधील सर्व प्रकारच्या लोकांमध्यें मौलाना अबुल कलाम अझाद यांच्याइतका राजकारणी पुरुष नाहीं आणि एकदां त्यांनीं पाहून एकाद्या परिस्थितीचा स्वीकार केला कीं शक्य तितक्या सर्व दृष्टीकोनांनीं व सर्व बाजूंनीं ती समजून सांगण्याइतकें बुद्धीचें कौशल्य दुसऱ्या कोणामध्येंही नाहीं. म्हणूनच मोठ्या कसोटीच्या वेळीं त्यांच्याकडे वळण्याचा महात्माजींचा प्रघात आहे असें प. वा. महादेव देसाई यांनीं लौकरच प्रसिद्ध होणाऱ्या मौलाना अझादवरील पुस्तकांत नमूद करून ठेविलें आहे. त्यामधील उतारा " हिंदुस्थान टाईम्स " च्या विशेष वर्षाङ्कांत प्रसिद्ध झालेला आहे.

मी एकदां 'तुम्हांला गांधीजीबद्दल इतकें उत्कट प्रेम कां वाटतें?' असें मौलानांना विचारलें होतें असें कै. देसाई लिहितात. तेव्हां ते म्हणाले,

"त्यांच्या बुद्धिमत्तेशिवाय त्यांच्या निष्कलंक सत्यामुळें मी त्यांच्याकडे आकर्षित झालों आहे. परंतु १९२६ पर्यंत मी थोडा फार चिकित्सक होतो. नंतर एकदां यंग इंडियामधील सौ. गांधींच्या एका लहानशा चुकीवर टीका करीत असतांना आपलें स्वतःचें अन्तःकरण उघडें केलेला असा त्यांचा लेख माझ्या वाचनांत आला. आश्रमासाठीं त्यांच्याकडे आलेली एक देणगी त्या मॅनेजरला देण्याचें विसरल्या होत्या. " हा असा मनुष्य आहे कीं ज्याच्या सत्याबद्दल त्याचे शत्रूसुद्धां शंका घेऊं शकणार नाहींत " असें मी माझ्या मनाशीं म्हटलें आणि त्यांचें सत्य त्यांना कोठपर्यंत नेऊं शकतें याचें मला आश्चर्य वाटलें."

मौलानांच्या धर्मभावनेबद्दल विचार करतांना एक दोन मुद्दे लक्ष्यांत ठेवले पाहिजेत.

## तर्कशुद्ध उपन्यास

जरी त्यांचे पूर्वज धार्मिक वृत्तीचे व आचारशील असले तरी त्यांनीं आपलें मन जुन्या धार्मिक परंपरेपासून व सनातनी शिक्षणापासून मुक्त केलें असून निरनिराळ्या प्रश्नांच्या उपन्यास करण्याची स्वतःची अशी एक चिकित्सक पद्धत शोधून काढली आहे.

मौलानांनीं ' इलमे–इ–कलाम ' या नांवाची इस्लामी धर्माचा बुद्धिग्राही अर्थ करण्याची नवीन पद्धत अंमलांत आणिली आहे.

त्यांनीं प्रत्येक प्रश्नाकडे बुद्धिग्राही तर्कशुद्ध मनानें पाहाणेस सुरवात केली आणि कांहींही गृहीत धरण्याचें नाकारलें. त्याचप्रमाणें एकादा अर्थ तो जुना आहे म्हणून किंवा त्यांच्यामागें मोठमोठीं नांवें आहेत म्हणून तो अविचारणीय असें ( Sacrosant ) त्यांनीं कधींच मानलें नाहीं.

## एकाच ईश्वराची पूजा

त्यांच्या मताप्रमाणें असणारीं धर्माचीं आवश्यक मूलतत्त्वें व त्यांच्या असंख्य शाखापल्लव यामध्यें ते भेद करतात.

या बाबतींत अधिकृत असें ( Source ) उद्गम पुस्तक म्हणजे त्यांचें कुराणाचें भाषांतर भूषणभूत तर्जुमनुल आणि कुराणावरील टीका होय. त्यांतील उपोद्घातांत आपल्या उपन्यासाची पद्धत काय आहे याबद्दल सविस्तर प्रास्ताविक चर्चा केलेली आहे.

या पुस्तकाची त्यांनीं सर्व धर्मांचें मूळ एकच आहे या महत्त्वाच्या सिद्धान्तानें सुरवात केली आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक युगाला एक धर्माचार्य व धर्मशिक्षक निर्माण होत असतो; त्यांच्या शिकवणुकीचीं मूलतत्त्वें एकच असतात हाही त्यांचा एक महत्वाचा सिद्धान्त आहे.

" कुराणात असें सांगितलें आहे कीं देश अगर युग कोणतेंही असो परमेश्वरप्रेषित जे धर्माचार्य असतात ते सर्व मानवजातीच्या कल्याणाकरितां तेंच जागतिक सत्य सांगतात. तें सत्य म्हणजे श्रद्धा आणि चांगलीं

कृत्यें ( एक ईश्वराची पूजा आणि सद्वर्तन ) हेंच होय. याच्याविरुद्ध सांगणारा तो खरा धर्मच नव्हे " असें मौलाना म्हणतात.

## दीनदुबळ्याकरितां झटा

" प्रार्थना म्हणतांना कोणत्या दिशेकडे–पूर्वेकडे कीं पश्चिमेकडे–तोंड करावें यांत धर्म नाहीं. एका ईश्वराची पूजा व सद्वर्तन यांतच धर्माचें बीज आहे. आणि पुढें कुराण त्यांच्या व्याख्या देतें; तुम्ही पूर्वेकडे तोंड करतां कीं पश्चिमेकडे तोंड करतां हें सद्वर्तन नव्हे; तर ईश्वरावर, शेवटच्या दिवसावर विश्वास ठेवणें; परमेश्वराच्या प्रीतिकरितां आपल्या सर्वस्वाचा व्यय करणें; आपल्या आप्तेष्टाकरतां, पोरक्या बालकाकरितां, गरजवंताकरितां, युद्धाकरितां जे मागतील त्यांच्याकरितां, गुलामांच्या मुक्ततेकरितां स्थिरपणें प्रार्थना करीत राहाणें; नियमित दानधर्म करणें; केलेले करार पाळणें; सर्व दुःखें व संकटें आणि संकटकालांत स्थिर आणि शांत राहाणें; हें सद्वर्तन आहे. आणि सत्यनिष्ठ व ईश्वराला भिणारे लोक असेच असतात.

कुराणांतील या महान् उताऱ्याशीं भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटच्या १९ श्लोकांची किंवा १२ व्या अध्यायांत सांगितलेल्या भक्ताच्या लक्षणांशीं किंवा ६ ( Beatitudes ) ची तुलना केली असतां मौलानांच्या टीकेचा मुख्य अर्थ लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं.

" आणि मग तुम्ही या महान् धड्याकडे पहा. तुमच्यापैकीं ( प्रत्येक धर्माच्या अनुयायांना ) प्रत्येकाकरितां मी विशिष्ट कायदा व मार्ग सांगितलेला आहे. जर परमेश्वराची तशी इच्छा असती तर त्यानें तुम्हां सर्वांना सारखेंच केले असतें. ( म्हणजे धर्मविधींचा कांहींच फरक राहिला नसता.) परंतु आपण दिलेल्या आज्ञा पाळण्याच्या कामीं कसोटी पहाण्याकरितां त्यानें तुम्हांला भिन्न भिन्न केलें आहे. म्हणून सच्चरित वंशांतील लोकांप्रमाणें प्रयत्न करीत रहा. ( हे फरक वाढविण्याचा प्रयत्न करूं नका ) " असें मौलाना पुढें सांगतात.

## धर्माचें नित्य अंग

" ज्यावेळीं जगाला कुराण दिलें गेलें त्यावेळीं इतर निरनिराळ्या धर्मांचे उपासक बाह्य आचारावर भर देऊन तोच खरा धर्म असें प्रतिपादन

करीत होते. प्रत्येकाला आपल्याशिवाय इतर धर्मांच्या अनुयायांना त्यांच्या त्यांच्या धर्मकृत्यामुळें त्याच्या अगोदर मोक्ष मिळणार नाहीं असें वाटत होतें. कुराणाप्रमाणें हा खरा धर्मच नव्हे. खरा धर्म एकाच ईश्वराच्या पूजेंत आहे."

कुराण असें कंठरवानें सांगत आहे कीं, मनुष्यस्वभाव असाच बनविला आहे कीं बाह्य आचार भिन्न असणारच आणि प्रत्येकाला आपला मार्ग दुसऱ्याच्यापेक्षां श्रेष्ठतर आहे असें वाटतें व तो आपला मार्ग आपल्या विरोधकाच्या दृष्टीनें पाहूं शकत नाहीं. परंतु ज्याप्रमाणें तुमचा मार्ग तुमच्या दृष्टीनें उत्तम आहे त्याचप्रमाणें दुसऱ्यांचाही त्यांच्या दृष्टीनें उत्तम आहे. सहिष्णुता हाच एकमेव मार्ग आहे.

## एकमेव संदेश

तर मग निरनिराळ्या युगांत व निरनिराळ्या लोकांत होऊन गेलेल्या धर्माचार्यांच्या शिकवणुकीचें सार काय? निरनिराळ्या काळीं मानवजातींना त्यांचा कोणता संदेश होता? तो एक होता कीं अनेक होते?

थोडक्यांत ९२ व्या श्लोकामध्यें तो संदेश एकच होता असें सांगितलें आहे. तो संदेश "तुम्ही सर्वजणांचे बंधू आहांत; तुम्हां सर्वांचा हितकर्ता किंवा रक्षणकर्ता एकच आहे, तेव्हां तुम्ही आपापसांत भेद पाहूं नका व त्याचीच पूजा करा."

परंतु लोक ही शिकवण विसरतात आणि धर्मांचे असंख्य तुकडे करून त्याचे निरनिराळे धर्म बनवितात आणि एक समूह दुसऱ्यापासून फुटून निराळा निघतो.

आणि मग एकीऐवजीं बेकी, एकत्रपणाऐवजीं विभक्तपणा हें भांडणाचें कारण होते. परंतु शेवटीं प्रत्येकानें त्याच्याकडे गेले पाहिजे. तेथें सर्व गोष्टी दिसतील आणि प्रत्येक समूहाला आपल्या विस्मृतीच्या परिणाम काय झाला तें स्पष्ट दिसून येईल.

ठाणे

# परिशिष्ट २ रें

## मौलाना अझाद यांनीं केलेला कुराणाचा अर्थ

कॉंग्रेसमधील सर्व प्रकारच्या लोकांमध्यें मौलाना अबुल कलाम अझाद यांच्याइतका राजकारणी पुरुष नाहीं आणि एकदां त्यांनीं पाहून एकाद्या परिस्थितीचा स्वीकार केला कीं शक्य तितक्या सर्व दृष्टीकोनांनीं व सर्व बाजूंनीं ती समजून सांगण्याइतकें बुद्धीचें कौशल्य दुसऱ्या कोणामध्येंही नाहीं. म्हणूनच मोठ्या कसोटीच्या वेळीं त्यांच्याकडे वळण्याचा महात्माजींचा प्रघात आहे असें प. वा. महादेव देसाई यांनीं लौकरच प्रसिद्ध होणाऱ्या मौलाना अझादवरील पुस्तकांत नमूद करून ठेविलें आहे. त्यामधील उतारा "हिंदुस्थान टाईम्स" च्या विशेष वर्षाङ्कांत प्रसिद्ध झालेला आहे.

मी एकदां 'तुम्हांला गांधीजीबद्दल इतकें उत्कट प्रेम कां वाटतें?' असें मौलानांना विचारलें होतें असें कै. देसाई लिहितात. तेव्हां ते म्हणाले,

"त्यांच्या बुद्धिमत्तेशिवाय त्यांच्या निष्कलंक सत्यामुळें मी त्यांच्याकडे आकर्षित झालों आहे. परंतु १९२६ पर्यंत मी थोडा फार चिकित्सक होतो. नंतर एकदां यंग इंडियामधील सौ. गांधींच्या एका लहानशा चुकीवर टीका करीत असतांना आपलें स्वतःचें अन्तःकरण उघडें केलेला असा त्यांचा लेख माझ्या वाचनांत आला. आश्रमासाठीं त्यांच्याकडे आलेली एक देणगी त्या मॅनेजरला देण्याचें विसरल्या होत्या. "हा असा मनुष्य आहे कीं ज्याच्या सत्याबद्दल त्याचे शत्रूसुद्धां शंका घेऊं शकणार नाहींत" असें मी माझ्या मनाशीं म्हटलें आणि त्यांचें सत्य त्यांना कोठपर्यंत नेऊं शकतें याचें मला आश्चर्य वाटलें."

मौलानांच्या धर्मभावनेबद्दल विचार करतांना एक दोन मुद्दे लक्ष्यांत ठेवले पाहिजेत.

## तर्कशुद्ध उपन्यास

जरी त्यांचे पूर्वज धार्मिक वृत्तीचे व आचारशील असले तरी त्यांनीं आपलें मन जुन्या धार्मिक परंपरेपासून व सनातनी शिक्षणापासून मुक्त केलें असून निरनिराळ्या प्रश्नांच्या उपन्यास करण्याची स्वतःची अशी एक चिकित्सक पद्धत शोधून काढली आहे.

मौलानांनीं ' इलमे–इ–कलाम ' या नांवाची इस्लामी धर्माचा बुद्धिग्राही अर्थ करण्याची नवीन पद्धत अंमलांत आणिली आहे.

त्यांनीं प्रत्येक प्रश्नाकडे बुद्धिग्राही तर्कशुद्ध मनानें पाहाणेस सुरवात केली आणि कांहींही गृहीत धरण्याचें नाकारलें. त्याचप्रमाणें एकादा अर्थ तो जुना आहे म्हणून किंवा त्यांच्यामागें मोठमोठीं नांवें आहेत म्हणून तो अविचारणीय असें ( Sacrosant ) त्यांनीं कधींच मानलें नाहीं.

## एकाच ईश्वराची पूजा

त्यांच्या मताप्रमाणें असणारीं धर्मांचीं आवश्यक मूलतत्त्वें व त्यांच्या असंख्य शाखापल्लव यामध्यें ते भेद करतात.

या बाबतींत अधिकृत असें ( Source ) उद्गम पुस्तक म्हणजे त्यांचें कुराणाचें भाषांतर भूषणभूत तर्जुमनुल आणि कुराणावरील टीका होय. त्यांतील उपोद्घातांत आपल्या उपन्यासाची पद्धत काय आहे याबद्दल सविस्तर प्रास्ताविक चर्चा केलेली आहे.

या पुस्तकाची त्यांनीं सर्व धर्मांचें मूळ एकच आहे या महत्त्वाच्या सिद्धान्तानें सुरवात केली आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक युगाला एक धर्माचार्य व धर्मशिक्षक निर्माण होत असतो; त्यांच्या शिकवणुकीचीं मूलतत्त्वें एकच असतात हाही त्यांचा एक महत्वाचा सिद्धान्त आहे.

" कुराणांत असें सांगितलें आहे कीं देश अगर युग कोणतेंही असो परमेश्वरप्रेषित जे धर्माचार्य असतात ते सर्व मानवजातीच्या कल्याणाकरितां तेंच जागतिक सत्य सांगतात. तें सत्य म्हणजे श्रद्धा आणि चांगलीं

REFBK-0006365